# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

## अंक - ३६

**दिनांक- ७/०९/२०२६ ते दिनांक- ११/०९/२०२६**

## राजपत्रातील ०६ भाग -

| | |
|---|---|
| भाग - ०१ | बदली / नेमणुक / पदोन्नती |
| भाग - ०२ | रजा / बिनपगारी रजा |
| भाग - ०३ | वेतन / भत्ते / रोखिकरण |
| भाग - ०४ | बक्षिस / मानधन |
| भाग - ०५ | शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती |
| भाग - ०६ | प्रशिक्षण व इतर |

( राजेशकुमार गाठे )
पोलीस उप अधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ

प्रति,

**प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ -**

सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे **www.yavatmalpolice.gov.in** या अधिकृत संकेत स्थळावर **GAZETTE** या मथळ्याखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक शाखा / पो.स्टे./ उपविपोअ.यांचे **E- Mail** वरती पाठवावे.

प्रत,

नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा, पो.अधि.कार्या. यवतमाळ.

# भाग - ०१

# बदली / नेमणुक / पदोन्नती

निरंक

## भाग - ०२

# रजा / बिनपगारी रजा

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email-
sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्रमांक : पोअय/कक्ष-११/किरकोळ रजा/आदेश ६।५१ /२०२६ दिनांक 09 SEP [illegible]

-: आदेश :-

खालील नमुद मंत्रालयीन लिपीक यांना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आल्याप्रमाणे किरकोळ रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे.रजा कालावधी संपताच त्यांनी वेळेवर कर्मव्यावर हजर रहावे.

| अ. क्र | लपीक कर्मचारी नाव व शाखेचे नाव | रजा कालावधी | रजेचे कारण | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १ | प्रमुख लिपीक अनिल खुशाल पेंदोर नेमणुक पत्रव्यवहार शाखा | दि.९.९.२०२६ एकुण ०१ दिवस | चार्ज हस्तांतरण करण्या करिता | प्रमुख लिपीक महमद वाजीद शेख नेमणुक लेखा शाखा |
| २ | क.श्रे.लि. स्नेहा धुर्वे नेमणुक -आस्थापणा शाखा | दि.९/०९/२०२६ एकुण ०१ दिवस | तब्बेत ठिक नसल्याने | श्री.चंद्रकांत पाल नेमणुक आस्थापणा शाखा |

(राजेशकुमार गाठे)
पोलीस उप अधीक्षक,(मुख्या.)
पोलीस अधीक्षक,कार्यालय ,यवतमाळ

प्रति,

उपरोक्त वरील संबंधित मंत्रालयीन लिपीक

प्रत - पोलीस उप अधीक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक /प्रमुख लिपीक आस्थापणा शाखा /कक्ष १४ /प्रभारी अधिकारी डायल ११२ यांना माहितीस व योग्य कार्यव

# कार्यालय पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

एल.आय.सी.चौक,
जिल्हा - यवतमाळ, पिनकोड:४४५००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

जा क्र. : पोअय/आस्था शाखा/कक्ष ९(६)/कर्तव्यावर हजर /७०७४/२०२६- यवतमाळ दिनांक:- ०७ SEP

## कार्यालयीन आदेश

----ooo---

१)पोशि/९४० श्रीनिवास चंद्रय्या गोन्लवार, हे दिनांक २४/०१/२०२६ ते दिनांक ०७/०९/२०२६ रोजी पर्यंत वैद्यकिय कारणास्तव कर्तव्यावर अनउपस्थित होते. त्यांचा वैद्यकिय रजा कालावधी हा एकुण २२० दिवस आहे. २)मपोशि/२६२२ रिना किशोर चटपल्लीवार हे दिनांक ११/१२/२०२५ ते ०७/०९/२०२६ पर्यंत कर्तव्यावर गैरहजर होते. त्यांचा गैरहजर कालावधी हा एकुण २७० दिवस आहे. नमुद १) व २) पोलीस अंमलदार आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी आज्ञांकित कक्षात उपस्थित झाले असता दिनांक ०७/०९/२०२६ रोजी त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे.

**नमुद पोलीस अंमलदार यांचा वैद्यकिय रजा कालावधी हा निश्चित करण्याबाबतचा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधिल नियम क्र. (६३) व (५०) नुसार खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पोलीस अंमलदार नाव पदनाम व बन | नेमणुक | वैद्यकीय कालावधी | दिवस | मंजुर करण्यात आलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोशि/९४० श्रीनिवास चंद्रय्या गोन्लवार | पो. स्टे.वणी | दि.२४/०१/२०२६ ते २६/०४/२०२६<br>दि २७/०४/२०२६ ते ०७/०९/२०२६ | ९०(१८० )दिवस<br>१३० दिवस | परावर्तीत रजा<br>अर्जीत रजा |
| ०२ | मपोशि/२६२२ रिना किशोर चटपल्लीवार | पो. स्टे.वणी | दि ११/१२/२०२५ ते ३१/०३/२०२६<br>दि १/०४/२०२६ ते ०७/०९/२०२६ | ११०(२२०)दिवस<br>१६० दिवस | परावर्तीत रजा<br>अर्जीत रजा |

(कुमार चिंता) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

पोशि/९४० श्रीनिवास चंद्रय्या गोन्लवार, मपोशि/२६२२ रिना किशोर चटपल्लीवार, पो. स्टे.वणी

मार्फत - प्रभारी अधिकारी , पो. स्टे.वणी

प्रत : वेतन लिपीक कक्ष -१८(१-२-३)/ सेवापट नोंदणी लिपीक डिपीजी लिपीक कक्ष १४ योग्य कार्यावाहीस्तव सादर.

प्रत कार्यवाहीस्तव: प्रभारी अधिकारी, पोस्टे सायबर(e-HRMS)

क्रमांक: पोअय/कक्ष-११/ रंजिता चव्हाण /विनावेतन/ ९१२२ /२०२६
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 08 SEP 2026

कार्यालयीन आदेश -

**विषय** :- रंजिता चव्हाण कनिष्ठ श्रेणी लिपीक नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ यांचे गैरहजेरीबाबत.

---ooo---

**रंजिता चव्हाण कनिष्ठ श्रेणी लिपीक नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ** येथे नेमणुकीस असुन हया दिनांक २५.०८.२०२६ रोजी ०१ दिवस कर्तव्यावर परस्पर अनधिकृतपणे गैरहजर कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६३ अन्वये **विनावेतन** करण्यात येत आहे.

(कुमार चिंता)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ.

प्रति,

रंजिता चव्हाण कनिष्ठ श्रेणी लिपीक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.

**प्रत -** पोलीस उप अधीक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक/प्रमुख लिपीकलेखा शाख/प्रमुख लिपीकपत्रव्यवहार शाखा, कक्ष-१७ वेतन लिपिक/ कक्ष १४ /प्रभारी अधिकारी डायल ११२ यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

**प्रत -** पोशि/अमित पसले, नेमणुक -डायल ११२, पो.अ.कार्यालय यवतमाळ यांना माहितीस व योग्य त्या कार्यवाहीस.

कार्यालय पोलीस अधिक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक,
जिल्हा - यवतमाळ, पिनकोड:४४५००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

जा क्र: पोअय/आस्था.कक्ष ९(१)/सिक आदेश /पोशि१९३.पोना३२२ निव्रड,चापोहवा२३५/ 9159 / २०२६- दिनांक

9 SEP 2026

## कार्यालयीन आदेश

----ooo---

खालील नमुद पोलीस अंमलदार यांचा सिक कालावधी हा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधिल नियम क्र.(६१) नुसार,खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस अंमलदार नाव पदनाम व बन | नेमणुक | वैद्यकीय कालावधी | एकुण दिवस | मंजुर करण्यात आलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोशि/१९३ कल्पेश चांदेकर | पोस्टे-शिरपुर | दि.३०/११/२०२५ ते दि.०९/१२/२०२५ | १०(२०) | परावर्तीत(अर्धवेतनी) |
| २ | पोना/३२२ सुरेश निव्रड | पोस्टे-शिरपुर | दि.१८/०५/२०२६ ते दि.३१/०५/२०२६ | १४(२८) | परावर्तीत(अर्धवेतनी) |
| ३ | चापोहवा/२३५ अतुल फेंडर | वाहतुक शाखा,यवतमाळ | दि.२१/०४/२०२६ ते दि.०५/०५/२०२६ | १६(३२) | परावर्तीत(अर्धवेतनी) |

(राजेशकुमार गाठे)
पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)
पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ

प्रति, १) पोशि/१९३ कल्पेश चांदेकर,नेम-पोस्टे शिरपुर
२) पोना/३२२ सुरेश निव्रड, नेम- पोस्टे शिरपुर
३) चापोहवा/२३५ अतुल फेंडर, नेम-जिल्हा वाहतुक शाखा,यवतमाळ

मार्फत - प्रभारी अधिकारी, पोस्टे शिरपुर, जि.वा.शाखा,यवतमाळ

प्रत : वेतन लिपीक कक्ष -१८/ डिपीजी लिपीक कक्ष १४/सेवापट नोंदणी लिपीक यांना योग्य कार्यावाही करीता

प्रत: प्रभारी अधिकारी, पोस्टे सायबर(e-HRMS)

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email-
sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्रमांक : पोअय/कक्ष-११/अर्जित रजा/आदेश / ९२१७ /२०२६ दिनांक 10 SEP 2026

कार्यालयीन आदेश -

**श्रीमती माधवी महादेव तडसे, वरिष्ठ श्रेणी लिपीक** नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ यांना **बाळाच्या संगोपनाकरिता दिनांक १५.०९.२०२६ पासुन ते दिनांक १३.११.२०२६ पावेतो ६० दिवस अर्जित रजा** म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम ५० अन्वये मंजुर करण्यात येत आहे.
**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने.)**

( राजेशकुमार गाटे)
पोलीस उप अधीक्षक,(मुख्या.)
पोलीस अधीक्षक,कार्यालय यवतमाळ

**प्रति,**

श्रीमती माधवी महादेव तडसे, वश्रेलि नेमणुक पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ
कक्ष-१७ वेतन लिपिक /कक्ष-१४ राजपत्र लिपिक /प्रभारी अधिकारी डायल ११२ यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

**प्रत -** पोशि/अमित पसले, नेमणुक -डायल ११२, पो.अ.कार्यालय यवतमाळ यांना माहितीस व योग्य त्या कार्यवाहीस




**कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**
**एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.**
**पिन कोड: ४४५ ००१.**
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्रमांक : पोअय/कक्ष-११ वैधकिय रजा/आदेश / 9218 /२०२६ दिनांक 10 SEP 2026

-: आदेश :-

**प्रमुख लिपीक नितीन रामदास गेडाम नेमणुक आस्थापणा शाखा** पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ हे दि.०७/०९/२०२६ पासून वैद्यकीय कारणास्तव रजेवर असल्याने ते कर्तव्यावर हजर होईपर्यंत त्यांच्या **कार्यासनाचा** अतिरीक्त कार्यभार प्रमुख लिपीक विनोद झाडे नेमणुक प्रबंधक शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

(मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये.)

( राजेशकुमार गाठे)
पोलीस उप अधीक्षक,(मुख्या)
पोलीस अधीक्षक,कार्यालय यवतमाळ

प्रति,
१. प्रमुख लिपीक नितीन रामदास गेडाम नेमणुक आस्थापणा शाखा, पो.अ.कार्यालय यवतमाळ
२. प्रमुख लिपीक विनोद झाडे नेमणुक प्रबंधक शाखा पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ

प्रत:- पो.उप.अधीक्षक (मुख्या) यवतमाळ / कार्यालय अधीक्षक/ कक्ष -१४/ प्रभारी अधिकारी सायबर पो.स्टे.यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

प्रत :- पोशि/अमित पसले, नेमणुक -डायल ११२, पो.अ.कार्यालय यवतमाळ यांना माहितीस व योग्य त्या कार्यवाहीस.

# कार्यालय पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

एल.आय.सी.चौक,
जिल्हा - यवतमाळ, पिनकोड: ४४५००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्र. (०७२३२) २५६७०० / फॅक्स क्र (०७२३२) २५६७१० / समाधान क्रमांक ९४०३८६३२८२.


जा. क्र.:पोअय/आस्था. शाखा/कक्ष-९ (४)/परावर्तीत रजा/२०२६/72 08 यवतमाळ, दि. 10 SEP 2026

## --००कार्यालयीन आदेश ००--

संदर्भ :- १) उपविभाग - पुसद यांचे जावक क्र. २१४७, दि. २६/०८/२०२६.
२) नियंत्रण कक्ष यांचे जावक क्र. ११८, दि. २४/०८/२०२६.

**विषय :-** परावर्तीत रजेबाबत. . .

--- ००० ---

पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ आस्थापनेवर कार्यरत असलेले खालील नमुद पोलीस अंमलदार हे आजारपणाचे कारणास्तव कर्तव्यावर गैरहजर होते. संदर्भाधीन अहवालानुसार त्यांचा सदरहु कालावधी नियमित होणेबाबत वैद्यकिय कागदपत्रांसह या कार्यालयास प्राप्त झाले. प्रभारी अधिकारी, जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा, यवतमाळ यांची शिफारस तसेच सादर केलेले वैद्यकिय कागदपत्रांचे आधारावर त्यांचा आजारपण कारणास्तव कर्तव्यावरील गैरहजर कालावधी हा खालील प्रमाणे नियमित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे पदनाम, नाव व नेमणूक | कर्तव्यावर अनाधिकृत अनुपस्थित कालावधी | एकूण कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | महिला पोलीस हवालदार ११४८<br>वर्षा पाईकराव<br>पोस्टे पसुद शहर | १६/०२/२०२६ ते<br>०२/०३/२०२६ | १५ | ३० दिवस<br>परावर्तीत रजा. |
| २ | महिला पोलीस शिपाई १५११<br>दिपाली चव्हाण<br>पोस्टे पसुद शहर | २१/०३/२०२६ ते<br>०१/०४/२०२६ | १२ | २४ दिवस<br>परावर्तीत रजा. |
| ३ | ग्रेड पोउपनि १५६८<br>अल्का निस्ताने<br>नियंत्रण कक्ष | १०/०८/२०२६ ते<br>१९/०८/२०२६ | १० | २० दिवस<br>परावर्तीत रजा. |

(मा. पोलीस उप अधिक्षक (मुख्या.) मान्यतेने )

(सुशिला पवार)
कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ.

प्रति,
उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार **मार्फत**:- प्रभारी अधिकारी, पोस्टे पुसद शहर/ नियंत्रण कक्ष.

प्रत: उपविभाग - पुसद/ पोस्टे पुद शहर/ नियंत्रण कक्ष.

**प्रतिलिपी** : प्रमुख लिपीक, लेखा शाखा, वेतन लिपीक कक्ष-18, राजपत्र लिपीक/नोंदणी लिपीक, यवतमाळ.

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email-
sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्रमांक : पोअय/कक्ष-११/किरकोळ रजा/आदेश /६२२५/२०२६ दिनांक 11 SEP 20

-: आदेश :-

खालील नमुद मंत्रालयीन लिपीक यांना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आल्याप्रमाणे किरकोळ रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे.रजा कालावधी संपताच त्यांनी वेळेवर कर्मव्यावर हजर रहावे.

| अ. क्र | लपीक कर्मचारी नाव व शाखेचे नाव | रजा कालावधी | रजेचे कारण | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १ | व.श्रे.लि पांडुरंब राठोड नेमणुक -लेखा शाखा | दि.१०/०९/२०२६ दि.११/०९/२०२६ एकुण ०२ दिवस | मुळ गावी जाणे करीता | क.श्रे.ली. निता जाधव नेमणुक लेखा शाखा |
| २ | क.श्रे.लि -जितेश उपरकार नेमणुक -लेखा शाखा | दि.१०/०९/२०२६ अर्धा दिवस दि.११/०९/२०२६ एकुण ०१ दिवस | पोळा सणाकरिता गावी जाणे करिता | ----- |
| ३ | अतुल चव्हाण कार्यालयीन शिपाइ नेमणुक -पो.अ.कार्या. यवतमाळ | दि.११/०९/२०२६ एकुण ०१ दिवस | पोळा करिता | श्री.एम.एस.शेजुळकर कार्यालयीन शिपाई नेमणुक पो.अ.कार्यालय यवतमाळ |

( राजेशकुमार गाठे)
पोलीस उप अधीक्षक,(मुख्या.)
पोलीस अधीक्षक,कार्यालय ,यवतमाळ

प्रति,

उपरोक्त वरील संबंधित मंत्रालयीन लिपीक /कार्यालयीन शिपाइ पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत - पोलीस उप अधीक्षक (मुख्या)/कार्यालय अधिक्षक /प्रमुख लिपीक आस्थापणा शाखा /कक्ष १४ /प्रभारी अधिकारी डायल ११२ यांना माहितीस व योग्य कार्यव

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

**कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

E-mail ID - sp.yavatmal@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्र. ०७२३२ - २५६७०१

क्रमांक- पोअय/कक्ष-११/अर्जित रजा-मंजूर/मंत्रालयीन कर्मचारी/9227/२०२६ यवतमाळ, दिनांक- ११/०९/२०२६ 11 SEP 2026

**- आदेश -**

खालील नमुद कार्यालय अधीक्षक यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करिता दर्शविलेल्या कारणास्तव दि. १२, १३ व १४ सप्टेंबर २०२६ च्या शासकीय सुट्टया तसेच दि. १८, १९ व २० सप्टेंबर २०२६ च्या शासकीय सुट्टीस जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे.

त्यांचे सदर रजेचे कालावधीत त्यांचे कार्यासनाचा कार्यभार नावासमोर दर्शविलेले प्रमुख लिपीक यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | लिपीक कर्मचारी यांचे नाव | रजा कालावधी | रजा कारण | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती सुशिला पवार<br>कार्यालय अधीक्षक,<br>पो.अधी. कार्या. यवतमाळ | दि. १५/०९/२०२६ ते<br>दि. १७/०९/२०२६<br>(एकुण - ३ दिवस) | महत्वाचे कामास्तव<br>बाहेरगावी जाणे<br>असल्याने | श्री. विनोद झाडे<br>प्रमुख लिपीक<br>पो.अधी. कार्या. यवतमाळ |

**(मा. पो.अ. यांचे मान्यतेने)**

11/9

**( सतीशकुमार गोठे )**
**पोलीस उप अधीक्षक(मुख्यालय)**
**पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ**

**प्रति,**

**(१) श्रीमती. सुशिला पवार, कार्यालय अधीक्षक, पो.अधी. कार्या. यवतमाळ**

**(२) श्री. विनोद झाडे] प्रमुख लिपीक, पो.अधी. कार्या. यवतमाळ**

**प्रत :- प्र.लि. - अर्ज शाखा / आस्थापना शाखा / पत्रव्यवहार शाखा / लेखा शाखा**
**डि.पी.जि. लिपीक /वेतन लिपीक -१ (कक्ष-१७) / ई-ऑफीस कक्ष**

## भाग - ०३

# वेतन / भत्ते / रोखिकरण

e-office

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्रमांक-पोअय/आस्थापना/कक्ष-९(६)विशेष पोषण अनुदान/600/२०२६ यवतमाळ दिनांक :- 07 SEP 2026

## -:कार्यालयीन आदेश:-

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/२८अ/४९३७/महिला पोलीस विशेष पोषण अनुदान/३३(०२)/२०१८ दिनांक २३/०२/२०१८ अन्वये शासनाच्या धोरणानुसार महिला पोलीस अंमलदार यांच्या पहिल्या प्रसुतीच्या काळात तिचा व तिच्या होणाऱ्या बाळाच्या आरोग्याचा दर्जा वाढविण्याच्या हेतुने विशेष पोषण आहार घेता यावा या करिता पोलीस कल्यान निधीतून महिला पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक या पदावरील पोलीसांना देय आहे. तरी खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना " पहिल्या प्रसुतीच्या काळात रु. ५०००/- इतके विशेष पोषण आहार अनुदान पोलीस कल्याण निधीमधुन मंजुर करण्यात येत आहे."

| अ. क्र. | नाव पदनाम व ब.नं. | नेमणुक पो. स्टे. | प्रसुतीची वेळ |
|---|---|---|---|
| १. | मपोशि/२६६१ वैष्णवी सहदेव दिवटे | मोटर परिवहन विभाग यवतमाळ | पहिली |

( कुमार चिंता)भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

मपोशि/२६६१ वैष्णवी सहदेव दिवटे, मोटर परिवहन विभाग यवतमाळ.

मार्फत :- पोलीस निरीक्षक, मोटर परिवहन विभाग यवतमाळ.

प्रत :- (कक्ष-२३) रोखपाल/ (कक्ष-१४) डीपीजी लिपीक यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.

प्रत :- पोलीस कल्याण निधी लिपीक (कक्ष-१४) यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

# कार्यालय पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

एल.आय.सी.चौक,
जिल्हा - यवतमाळ, पिनकोड: ४४५००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in


जा.क्र.:पोअय/आस्था शाखा/कक्ष ९(६)/पोशि२६५८ बालाजी कदम-अंतिम रजा रोखीकरण/ 9210 २०२६ य. दि.  /  /

## -ooo कार्यालयीन आदेश ooo-

10 SEP 2026

संदर्भ : १) पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथिल सेवानिवृत्तीचे अदेश
क्रमांक :पोअय/आस्थापना/कक्ष-९/नि.व.से.नि./जुन -२०२६/५६७४, दि. २९/०६/२०२६.

---ooo---

पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथून खालील नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे सेवानिवृत्त आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६८ मधील तरतुद तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक:अ.रजा-२४०१/८/सेवा-९, दि. १५/०१/२००१ चें तरतुदीप्रमाणे खालील नमुद पोलीस अंमलदार यांचे अर्जित रजा रोखिकरणास (कमाल मर्यादा ३०० दिवस) मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस अंमलदार यांचे पदनाम, नाव. | सेवानिवृत्त प्रकार | सेवानिवृत्त दिनांक | शिल्लक अर्जित रजा | अंतिम वेतन, वेतन स्तर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पोशि 2658 बालाजी राजाराम कदम<br>नेमणुक- पो.स्टे. बिटरगाव<br>सेवार्थ आय.डी.-DGPBRKM6802 | नियम वयोमानाने सेवानिवृत्त. | 30/06/2026 | 249 | रु. 32,000/-<br>एस ७ 07<br>1 जुलै 2026 ची काल्पनिक वेतनवाढ |

उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांचे सेवाकालावधीतील शिल्लक अर्जित रजेचे रोख सममुल्य रक्कम सन २०२६-२७ या वित्तीय वर्षातील लेखाशिर्ष २०७१ निवृत्ती वेतन लाभ अर्जित रजेचे रोखीकरण या लेखा शिर्षाखाली अनुदानातून भागविण्यात तसेच खर्च करण्यात याद्वारे " मंजुरी " देण्यात येत आहे.

(कुमार चिंता)भा.पो. से
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

1) कक्ष-18 (वेतन लिपीक), लेखा शाखा, यवतमाळ (दोन प्रतीत).
2) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा यवतमाळ 445001.

प्रतिलिपी : 1) कक्ष - 24 (निवृत्ती वेतन लिपीक), लेखा शाखा, यवतमाळ
2/- सदरहु आदेशाची प्रत संबंधितांचे सेवापटा जतन करुन ठेवावे.

प्रत : १) श्री. बालाजी राजाराम कदम पो.शि २६५८, मार्फत प्रभारी अधिकारी, पोस्टे बिटरगाव, यवतमाळ.
२) राजपत्र लिपीक (कक्ष-१४), पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ.

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in


9003

क्र:पोअय/कक्ष-१०/सेनि-पोनि-शमुवेल वानखडे /अंतिम रजा रोखीकरण/ /२०२६ दिनांक : - 4 SEP 2026

## कार्यालयीन आदेश

विषय :- पोलीस निरीक्षक, श्री. शमुवेल दत्तुराव वानखडे, तात्कालीन नेमणूक-पोलीस नियंत्रण कक्ष, यांना सेवानिवृत्तीचे दिनांकापर्यंत अंतीम शिल्लक अर्जित रजा रोखीकरणास मंजूरी प्रदान करण्याबाबत.

--oooo--

**पोलीस निरीक्षक, श्री. शमुवेल दत्तुराव वानखडे**, तात्कालीन नेमणूक- पोलीस नियंत्रण कक्ष हे दि. ३१/०८/२०२६ रोजी म. नं. नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

त्यांचे सेवानिवृत्तीचे दिनांकास मूळ सेवापुस्तकात त्यांच्या अर्जित रजेच्या लेख्यात एकूण २७० दिवस अर्जित रजा शिल्लक आहेत

पोलीस निरीक्षक, श्री. शमुवेल दत्तुराव वानखडे, तात्कालीन नेमणूक पोलीस नियंत्रण कक्ष यांचे मूळ सेवापुस्तकानुसार त्यांचे खाती जमा असलेल्या एकूण २७० दिवस अर्जित रजा वेतनाच्या सममुल्य रोख रक्कम मिळविण्यासाठी त्यांना म.ना.सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम क्रमांक ६८ (१) व शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-अरजा-२४०१/८/सेवा-९, दिनांक १५/०१/२००१ तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक-अरजा-२०१९/प्र.क्र.१२/सेवा-६, दिनांक २४/०५/२०१९ मधील तरतुदीनुसार अंतीम अर्जित रजा रोखीकरणास या आदेशाव्दारे मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

सदर खर्च लेखाशिर्ष-२०७१ सेवानिवृत्ती व इतर अनुज्ञेय लाभ या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा

श्री. शमुवेल दत्तुराव वानखडे यांना रजेच्या रोखीकरणाचे सममुल्य, त्यांचे सेवानिवृत्तीचे दिनांकास असलेले मूळ वेतन रु. ६४२००/- व त्यावर अनुज्ञेय असलेला प्रचलीत महागाई भत्ता मिळून देय राहील.

प्रमाणित करण्यात येते की, पोलीस निरीक्षक, श्री. शमुवेल दत्तुराव वानखडे, तात्कालीन नेमणूक पोलीस नियंत्रण कक्ष हे शासन सेवेतून दि.३१/०८/२०२६ रोजी म.नं.सेवानिवृत्त झाले आहेत.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

कक्ष- १७-वेतन लिपीक-२/कक्ष-१४-राजपत्र लिपिक/कक्ष-१६-पेन्शन लिपीक

प्रत -कोषागार अधिकारी, यवतमाळ

पोलीस निरीक्षक, श्री. शमुवेल दत्तुराव वानखडे, तात्कालीन नेमणूक- पोलीस नियंत्रण कक्ष, यांना माहितीस्तव.

## भाग - ०४

# बक्षिस / मानधन

E-office

क्रमांकः पोअप/कक्ष-१२/निलंबन/पोहवा-१८६९ नालमवार/ 9080 /२०२६
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 07 SEP 2026

## निलंबन आदेश

तुम्ही कसुरदार पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार तुम्ही पो.स्टे. वसंतनगर येथे नेमणुकीस असुन पो.स्टे. वसंतनगर येथे दाखल अप.क्र. ५४६/२०२६ कलम १०९(१), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४/२५ आर्म अॅक्ट अन्वये दिनांक ०३/०९/२०२६ रोजी गुन्हा नोद असुन सदर गुन्हयातील आरोपी शेख बिलाल शेख मुसा, वय २० वर्ष, रा. मधुकर नगर, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ यास ताब्यात घेवुन त्यांची अटकपुर्व वैदयकीय तपासणी करुन दिनांक ०३/०९/२०२६ चे ०३.२७ वा. अटक करण्यात आले. तसेच सदर गुन्हयाचा तपास पोउपनि/ शिवप्रसाद आवळकर यांचेकडे देण्यात येवुन आरोपीस वि. न्यायालयात हजर करण्यात आले असता, मा. न्यायालयाने आरोपीचा दिनांक ०५/०९/२०२६ पावेतो पि.सी.आर. मंजुर केला.

कसुरदार पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर तुम्ही दिनांक ०४/०९/२०२६ रोजी १०.४२ वा. तपास अधिकारी पोउपनि/शिवप्रसाद आवळकर यांचे आदेशान्वये आरोपी शेख बिलाल शेख मुसा. याला पो.स्टे. वसंतनगर येथे तपासकामी आणले. तपास अधिकारी यांनी आरोपीची गुन्हयासंबधाने विचारपुस करुन त्यास उपजिल्हा रुग्णालय, पुसद यांचे नावे आरोपीचा रक्त नमुना काढुन सिलबंद करुन मिळणेबाबतचे पत्र तुमच्या ताब्यात दिले. त्यावरुन तुम्ही पो.स्टे. वसंतनगर स्टेशन डायरी नोंद क्र. ११ वेळ १२.५४ वा. आरोपीसह शासकीय वाहनाने रवाना होवुन उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे गेले.

कसुरदार पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर तुम्ही दिनांक ०४/०९/२०२६ चे १३.१६ वा. तुमचे ताब्यातील आरोपी नामे शेख बिलाल शेख मुसा, हा उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे वैदयकीय तपासणी करीत असतांना त्यांचे कायदेशिर रखवालीतुन पळुन गेल्याचे फोनव्दारे पोउपनि/ शिवप्रसाद आवळकर यांना माहिती दिली. अशा माहितीवरुन सदर रुग्णालायाचे पो.नि. दिनेश झांबरे, सपोनि/ सुगत पुंडगे, पोउपनि/ शिवप्रसाद आवळकर व पो.स्टे. वसंतनगर चा स्टाफ रवाना झाला.

कसुरदार पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर तुम्हाला पो.स्टे. वसंतनगर येथे दाखल अप.क्र. ५४६/२०२६ कलम १०९(१), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४/२५ आर्म अॅक्ट अन्वये दाखल गंभीर गुन्हयातील आरोपी शेख बिलाल शेख मुसा, वय २० वर्ष, रा. मधुकर नगर, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ यांचे महत्वाचे सुरक्षा गार्ड डयुटीकरीता नेमण्यात आले असतांना तुम्ही नेमलेल्या कर्तव्यात अत्यंत निष्काळजीपणा हलगर्जीपणा व अक्षम्य गंभीर कुचराई केल्यामुळे सदर आरोपी कायदेशिर रखवालीतुन पळुन गेल्याने सदर घटनेस तुम्ही जबाबदार ठरले आहात. अशाप्रकारे तुम्ही तुमचे नेमलेल्या कर्तव्यात बेशिस्त, बेजबाबदार, गंभीर कुचराई व अक्षम्य कर्तव्यच्युती केली आहे. तसेच पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले आहे.

तुम्ही कसुरदार पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर तुमच्या अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार, व अक्षम्य गंभीर कर्तव्यच्युतीमुळे शिस्तबध्द पोलीस दलाची प्रतिमा जनमानसामध्ये मलीन झाली आहे. तुमच्या कर्तव्यातील गंभीर कुचराई व अक्षम्य कर्तव्यच्युतीच्या अनुषंगाने तुमचेविरुध्द शिस्तभंग विषयक विभागीय कार्यवाहीचे अधिन राहुन तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ च्या नियम ३(१)(अ-२) मधील तरतुदीनुसार त्वरीत प्रभावाने शासकीय सेवेतुन निलंबीत करण्यात येत आहे.

असेही आदेश देण्यात येत आहेत की, प्रस्तुत आदेश अस्तित्वात असे पर्यंतच्या कालावधीत कसुरदार पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर यांचे निलंबन कालावधीतील मुख्यालय पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे ठेवण्यात येत असुन तेथे त्यांनी दररोज सकाळ संध्याकाळचे गणनेवर हजेरी दयावी. नमुद कसुरदार यांना निलंबन कालावधीत पोलीस अधीक्षक यवतमाळ यांची पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

निलंबन कालावधीत कसुरदार पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फ व सेवेतुन काढुन टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ६८(१)(ए) नुसार (५०%) निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहील. निर्वाह भत्ता घेण्यापुर्वी नमुद कसुरदार यांनी आगोदरच्या महिन्यात कोणत्याही प्रकारची खाजगी नौकरी अथवा धंदा केला नाही याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

तुम्ही कसुरदार पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर यांनी निलंबन कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची खाजगी नौकरी अथवा धंदा केल्यास त्यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम १६ अन्वये गैरवर्तणुक समजण्यात येईल व त्यामुळे शिस्तभंगाच्या कारवाईस ते पात्र ठरतील. याशिवाय सदर कृतीमुळे देय असलेला निर्वाहभत्ता मिळणेस ते अपात्र ठरतील.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

पोहवा/१८६९ विष्णु दत्तात्रय नालमवार,
नेमणुक पो.स्टे. वसंतनगर.

मार्फत :- प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वसंतनगर. (व्दीप्रतीत)
२/- सदर आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत उलट टपाली या कार्यालयास परत करावी.

प्रत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.
२/ सदर पोलीस अंमलदार हे निलंबन काळात मुख्यालयी हजर झाल्याबाबतची माहिती या कार्यालयास सादर करण्यात यावी तसेच हजर असल्याबाबतचा हजेरीपटाची छायांकीत प्रत दर महिन्याला या कार्यालयास सादर करावी.

प्रतिलिपी :-उपविपोअ पुसद/ठाणेदार, पो.स्टे.वसंतनगर/कर्म.आस्थापना लिपीक(कक्ष-०९)/सहा आस्था.लिपीक (कक्ष-०९-०४)/कर्म. वेतन लिपीक (कक्ष-१८)/भनिनि लिपीक (कक्ष-१५) /राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/नोंदणी लिपीक/वस्त्रभंडारपाल यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस.

प्रत माहितीस :- अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ/पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ.

| | | |
|---|---|---|
| | पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.<br>एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.<br>पिन कोड : ४४५ ००१.<br>Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in | |
| क्र. पोअय/कक्ष -१२/पोनि-नंदकिशोरे काळे/कसुरी/अंतिम आदेश/ ७०२१/२०२६ | | दिनांक - 07 SEP 2026 |

महत्वाचे

संदर्भ :- १) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अंतिम आदेश क्र. अप/कक्ष-५/ यवतमाळ/पोनि-काळे/कसुरी/अं.आ/२०२६/१६५०, दिनांक १४/०८/२०२६.

विषय :- अंतिम आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.

---०००---

उपरोक्त संदर्भकीत विषयान्वये कळविण्यात येते की, पो.नि. नंदकिशोर काळे, नेमणुक डायल ११२ यवतमाळ हे प्रभारी अधिकारी म्हणुन पो.स्टे अवधुतवाडी येथे कार्यरत असतांना त्यांचे पोलीस स्टेशन अंतर्गत सिसिटीएनएस प्रणालीमध्ये गुन्हयाचा आढावा घेण्यात आला असता, ६० दिवसावरील ०२ गुन्हे प्रलंबित असल्याचे कसुरी प्रकरणी त्यांना भविष्यात अशा चुका होणार नाही याकरीता त्यांना "समज" देण्यात आली आहे.

त्यान्वये पो.नि. नंदकिशोर काळे, तत्का. नेमणुक प्रभारी अधिकारी पो.स्टे अवधुतवाडी यांना "समज" देण्यात येत असल्याबाबतचा अंतिम आदेशाची प्रत अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

सहपत्र :- अंतिम आदेश

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक यवतमाळ

प्रति,
पोलीस उप अधीक्षक (मुख्या),
यवतमाळ.

प्रत :- कक्ष-१०/कक्ष-१७/कक्ष-१४, यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.

e-517543

कार्यालय: विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
माल टेकडी रोड, कॅम्प एरिया, अमरावती-४४४ ६०६ (महाराष्ट्र)
दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६, ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/
www.igpamravatirange.gov.in

जा.क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-काळे/कसुरी/अं.आ./२०२६/ 1650 अमरावती, दिनांक :- 14 AUG 2026

वाचा :- १) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र. पोअय/कक्ष-१२/पो.नि. नंदकिशोर काळे/कसुरी अहवाल/४२६१/२०२६, दि१९.०५.२०२६

२) या कार्यालयाचे कादानो क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-नंदकिशोर काळे/कसुरी/का.दा.नो./ २०२६/१०४७, दिनांक ०५.०६.२०२६

३) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र. पोअय/कक्ष-१२/पो.नि.-नंदकिशोर काळे/कादानो/ स्पष्टीकरण/६२७५/२०२६, दिनांक ०८.०७.२०२६ अन्वये सादर केलेला खुलासा

Addl. S.P. / Dy. S.P.H.Q. / O.S. / H.C. / Branch / In. No. 1049

## -: अंतिम आदेश :-

पोलीस निरीक्षक नंदकिशोर महोदवराव काळे तत्कालीन नेमणुक, पो.स्टे. अवधुतवाडी जि. यवतमाळ येथे कार्यरत असतांना खालीलप्रमाणे कसुरी केल्याचे दिसुन येत आहे.

कसुरी :-

तुम्ही पो.स्टे. अवधुतवाडी येथे प्रभारी अधिकारी म्हणुन कार्यरत असतांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिनांक २३.०३.२०२६ रोजी सि.सि.टी.एन.एस. प्रणालीमध्ये प्रलंबित असलेल्या गुन्ह्याचा आढावा घेण्यात आला असता खालीलप्रमाणे ६० दिवसावरील ०२ गुन्हे प्रलंबित असल्याचे आढळुन आले आहे.

| अ.क्र. | प्रथम खबर क्रमांक | गुन्हा दाखल तारीख व वेळ | अधिनियम व कलम | गुन्ह्यास शिक्षा | गुन्ह्याची सद्यस्थिती | तपासी अधिकारी नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०५२२/२०२५ | ३/२२/२०२५ ४.४५.५८ AM | THE BHARATIYA NYAY SANHITA (BNS) २०२३-११८(१), ३५१(३), ३५२ | BELOW १० YEARS | Pending | Purushottam Marotrao Sodagir (पोलीस हवालदार) |
| २ | ००६४/२०२६ | १/२०/२०२६ ३.०५.३० AM | ARMS ACT १९५९-२५, THE MAHARASHTRA POLICE ACT१९५१-१४२ THE BHARATIYA NYAY SANHITA (BNS) २०२३-१०९, १२६(२), १८९(२), १९१(२) | BELOW १० YEARS | Pending | Kapil Shankar Budhewar (पोलीस उप निरीक्षक) |

आपणांस मा. अपर पोलीस महासंचालक, (का.व सु.) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/२३/५४/नविन तिन कायदे/८५/२०२४, दि. ०१/०९/२०२५ नुसार १० वर्षापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्ह्यात ६० दिवसाचे आत तर १० वर्षापेक्षा अधिक शिक्षा असलेल्या गुन्हयात ९० दिवसांचे आत दोषारोपपत्र/ अंतरिम दोषारोपपत्र दाखल करणेबाबत पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ यांचे पत्र क्र. पोअय/वाचक/नवीन तिन कायदे/दोषारोप/३०६२/२०२५ दि. ०८/०९/२०२५ अन्वये स्पष्ट लेखी सुचना देण्यात आल्या आहेत.

तसेच आपणास पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी वेळोवेळी व्हिडिओ कॉन्फरन्सींग द्वारे व मासिक गुन्हे सभेमध्ये सदरचे गुन्हे तात्काळ निकाली काढणेबाबत आवश्यक उपाययोजना करुन गुन्ह्याची निर्गती करणेबाबत स्पष्ट सुचना/निर्देश देण्यात आले असतांना सुध्दा पोलीस स्टेशन अवधुतवाडी येथे ६० दिवसावरील गुन्हे प्रलंबित असल्याचे आढळुन आले आहे. यावरुन तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या सुचना/निर्देशाची गांभीर्यपुर्वक दखल घेत नसुन सदर बाब प्रशासकीय दृष्टया अत्यंत गंभीर आहे.

यावरुन तुम्ही पो.स्टे. प्रभारी अधिकारी या महत्वाचे पदावर कार्यरत असतांना तुमचे अधिनस्त पोलिस अधिकारी व अंमलदार यांना गुन्हे निर्गती करतांना आवश्यक मार्गदर्शन करुन त्यांचेकडुन विहीत कालावधीत गुन्हयाची निर्गती करुन घेवुन दोषारोपत्र पत्र दाखल करणे अपेक्षित होते. तथापि तुम्ही त्याप्रमाणे कार्यवाही केलेली दिसुन आली नाही. यावरुन तुमचे पो.स्टे. अधिनस्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेवर नियत्रंण नसल्याचे व पर्यवेक्षणात कमी पडत असल्याचे दिसुन येत आहे. तसेच तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या सुचना/निर्देशाची गांभीर्यपुर्वक दखल घेत नसुन कर्तव्यात निष्काळजीपणा व बेजबाबदारपणाचे वर्तन केले आहे.

## -: कार्यवाहीचा तपशिल :-

२. उपरोक्त कसुरीच्या अनुषंगाने कसुरदार पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे यांना या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. ०२ मधील दिनांक ०५.०६.२०२६ अन्वये "पुढील देय वार्षिक वेतनवाढ ०१ (एक) वर्षाकरिता (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा का देण्यात येवु नये ?" या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आली होती.

३. सदर कारणे दाखवा नोटीस पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे यांना दिनांक २४.०६.२०२६ रोजी बजाविण्यात आली. त्यानुसार त्यांनी दिनांक २९.०६.२०२६ रोजी अभिवेदन पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेमार्फतीने वरील संदर्भीय पत्र क्र. ०३ अन्वये या कार्यालयास सादर केले आहे.

## -: कसुरदार यांचे अभिवेदन :-

४. मा. अपर पोलीस महासंचालक (का. व सु.) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/२३/५४/नवीन तीन कायदे/८५/२०२४ दि. ०१.०९.२०२५ अन्वये १० वर्षापेक्षा कमी शिक्षा असल्याने गुन्ह्यात ६० दिवसांत तर १० वर्षापेक्षा अधिक शिक्षा असलेल्या गुन्ह्यात ९० दिवसात दोषारोपपत्र/अंतरिम दोषारोपपत्र दाखल करण्यात यावे, असे स्पष्ट सुचना/निर्देश दिलेले आहे. सदर पत्राचे अनुषंगाने पोलीस अधीक्षक, यवतमाळ या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/वाचक/नविन तीन कायदे/दोषारोपपत्र/३०६२/२०२५ दि. ०८.०९.२०२५ अन्वये आवश्यक कार्यवाही करणेबाबत सुचित करण्यात आले आहे. दि. २३.०३.२०२६ रोजी CCTNS प्रणाली मध्ये पो.स्टे. ला गुन्हयाचा आढावा घेतला असता अप.क्र. ०५२२/२०२५ व अप क्र. ००६४/२०२६ असे ६० दिवसावरील ०२ गुन्हे प्रलंबित असल्याचे नमुद आहे.

त्यावरुन उपरोक्त करण्यात आलेले गुन्हयापैकी अप क्र. ०५२२/२०२५ कलम ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ BNS हा गुन्हा दि. २२/०३/२०२५ रोजी दाखल असुन सदर गुन्हा हा पोहवा/१६८२ सागर वानखडे यांचे कडे तपासावर होता. नमुद पोहवा/१६८२ हे आजारी रजेवर गेले होते व त्यांचे कडील प्रलंबित प्रकरणांची कागदपत्रे पोस्टे. अभिलेखावर जमा केलेले नव्हते. सदर गुन्हा हा तत्कालीन ठाणेदार नरेश रणधीर यांनी पोहवा/१६८२ सागर वानखडे यांचेकडे तपासावर दिले होते. पोहवा/सागर वानखडे यांनी सदर गुन्हे त्यांचेकडे दिर्घ काळा पासुन प्रलंबित ठेवलेले असल्यामुळे आम्ही मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दि. ०३.०१.२०२६ रोजी पो.स्टे. ला दिलेल्या भेटी दरम्यान दिलेल्या तोंडी आदेशानुसार सर्व गुन्हे पंचनामा करुन ताब्यात घेतले. प्राप्त झालेले एकुण भाग-५ भाग-६ मर्ग असे ३१ प्रकरणे पो.स्टे. चे इतर तपास अधिकारी व अमलदार यांना पुढील तपास कामी वाटून देण्यात आले होते. त्यावरुन सदर अप.क्र. ०५२२/२०२५ हा गुन्हा पोहवा/२२४६ गुजर यांचेकडे तपासावर देऊन सदर गुन्हयामध्ये दोषारोपपत्र तयार करुन वि.न्यायालयात दाखल करण्यात आलेले असुन सदर गुन्हा दि. २३.०३.२०२६ रोजी CCTNS मध्ये फिडींग करण्यात आला आहे. सदर गुन्हा हा आम्ही पोस्टे. चार्ज घेण्यापुर्वी सुमारे ९ महिन्यापासुन प्रलंबित होता. आम्ही १३.१२.२०२५ रोजी चार्ज घेतल्यानंतर प्रलंबित गुन्हे निर्गती केली आहे.

तसेच अप क्र. ०६४/२०२६ कलम १०९, १२६(२), १८९(२), १९१(१), BNS सह क. ४/२५ आर्म अॅक्ट सह क. १४२ मपोका प्रमाणे नोंद असुन सदर गुन्हा दि. २०.०१.२०२६ रोजी दाखल करण्यात आला असुन सर गुन्हयात BNS १०९ कलम असल्याने त्याला दोषारोप दाखल करण्याची मुदत ९० दिवस होती. ज्यावेळी पोलीस अधीक्षक, कार्यालयाकडुन सदर गुन्हयाचा आढावा घेण्यात आला त्यावेळी सदर गुन्हा मुदत तपासावर होता.

सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/कपिल बुध्देवार यांचेकडे देण्यात आला होता. सदर गुन्हयातील सन्हाईत आरोपी यांना आम्ही लागलीच गुन्हयात अटक केली होती. दि. १९.०२.२०२६ रोजी सदर गुन्हयामध्ये कलम ३ (१)(ii), व ३(४) अन्वये वाढीव कलम लावणे करीता महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ कलम-२३(१)(अ) प्रमाणे प्रस्ताव मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परीक्षेत्र, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आला होता व दि.२५.०२.२०२६ रोजी सदर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम-१९९९ चे प्रस्तावाला मंजुरी मिळाली व त्यावरुन सदर गुन्हयाचा पुढील तपास मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांना दिलेला होता.

आम्ही उपरोक्त प्रकरणासंबंधाने स्वत: जातीने लक्ष देऊन उचीत कारवाई केलेली आहे. तसेच संबंधीत वर नमुद गुन्हयापैकी अप. क्र. ५२२/२०२५ हा गुन्हा निकाली काढला असुन अप. क्र. ००६४/२०२६ चे गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ कलम वाढ करुन सदर गुन्हा मा. सहायक पोलीस अधीक्षक, पांढरकवडा तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पांढरकवडा यांचेकडे तपासावर देण्यात आला होता व सदर गुन्हयात मा. पोलीस महासंचालक, कार्यालयाकडुन मंजुरी मिळालेली आहे. यवतमाळ जिल्हयात मकोका अंतर्गत सन

२०२६ मध्ये मंजुरी मिळालेली ही एकच प्रकरण आहे. अशा प्रकारे गुन्हया संबंधाने व कायदेशीर कारवाई करुन तसेच पोहवा/१६८२ सागर वानखडे यांचेकडे तपासावर असलेले गुन्हे मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे जप्ती पंचनामा करुन ताब्यात घेतले होते. त्यानंतर आम्ही स्वत: सदर गुन्हा जातीने लक्ष देऊन निकाली काढुन घेतलेला आहे. सदर दोन्ही गुन्हे ६० दिवसापेक्षा जास्त काळ आम्ही प्रलंबित ठेवले नाहीत. त्यावरुन उपरोक्त विषयासंबंधाने आम्हास दिलेली विशेष पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) हि शिक्षा देण्यात येवू नये ही विनंती केली आहे.

**-: निष्कर्ष :-**

५. अपचारी यांना कसुरीसंबंधाने त्यांचे म्हणने मांडण्यासाठी आज्ञांकित कक्षात आमचे समक्ष दिनांक ११.०८.२०२६ रोजी बोलाविण्यात आले होते. पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे हे समक्ष हजर आहेत लेखी अभिवेदनामध्ये दिलेल्या खुलाशाप्रमाणे खुलासा करीत आहेत. त्यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक आहे. अपचारी यांचा पुर्व सेवा अभिलेख विचारात घेता सहानुभूतीपुर्वक विचार करुन, प्रस्तुत कसुरीची भविष्यात पुनरावृत्ती होणार नाही या दृष्टीकोणातून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ (सुधारणा-२०१३) चे कलम २५ प्रमाणे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन **"सक्षम प्राधिकारी"** म्हणुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**-: आदेश :-**

मी **डॉ. महेश पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती** याव्दारे पोलीस निरीक्षक नंदकिशोर काळे तत्कालीन नेमणुक, अवधुतवाडी जि. यवतमाळ यांना या कार्यालयाचे पत्र क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-नंदकिशोर काळे/कसुरी/का.दा.नो./२०२६/१०४७, दिनांक ०५.०६.२०२६ अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस **"दप्तरी दाखल"** करण्यात येत आहे. यापुढे सर्व गुन्हयांची मुदतीमध्ये निर्गती करण्याबाबत व यापुढे अशा चुका होणार नाही याची दक्षता घेणेबाबत त्यांना **"समज"** देण्यात येत आहे.

(डॉ. महेश पाटील)
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

पोलीस निरीक्षक नंदकिशोर महोदवराव काळे सध्या नेमणुक, डायल ११२ जि. यवतमाळ.

प्रत व मार्फत:-

पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

२/- सोबत आदेशाच्या ०३ प्रती पाठविल्या असुन पोलीस अधीक्षक, यांनी कृपया सदर आदेशाची मुळ प्रत कसुरदार पोलीस निरीक्षक नंदकिशोर महोदवराव काळे सध्या नेमणुक, डायल ११२ जि. यवतमाळ यांना तामील/अदा करुन सोबतच्या दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत या कार्यालयास पाठवावी.

E-office

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२/श्री. शेख नफीस शेख हबीब/शासन आदेश/ 9029 /२०२६ दिनांक - 07 SEP 2026

महत्वाचे

संदर्भ :- अवर सचिव, महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचे आदेश क्र. पीडीईग-१२२५/प्र.क्र. १२१/पोल-६. दिनांक १४/०८/२०२६.

विषय :- शासन अपील आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भकीत विषयान्वये कळविण्यात येते की, माजी पोशि/९४० शेख नफीस शेख हबीब, रा. पुसद यांनी त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/डिपी/३१-बी/अं.आ/सफौ-१०९४ डोगंरे+७/१०३५/२०१८, दिनांक २९/०१/२०१८ अन्वये देण्यात आलेल्या "सेवेतुन काढुन टाकणे" या शिक्षेसंदर्भात महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ चे नियम क्र. १८ नुसार शासनास अपील अर्ज सादर केला असता, त्यांची शिक्षा कायम करुन त्यांचा अपील अर्ज अमान्य करण्यात आला आहे.

त्यान्वये माजी पोशि/९४० शेख नफीस शेख हबीब, रा. किदवई मेडकल जवळ, वसंतनगर, पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ मो.न. ९८५०४५००७८ सदर शासन अपील आदेशाची एक प्रत अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत विनाविलंब या कार्यालयास सादर करण्यात यावी.

सहपत्र :- शासन अपील आदेश

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक यवतमाळ

प्रति,

प्रभारी अधिकारी,
पोलीस स्टेशन वसंतनगर.

प्रत :- कक्ष-०९/कक्ष-०९-०२/कक्ष-१८/कक्ष-१४, यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.

D. 31 AUG 2026
S.P. ....
Addl. S.P. ....
Dy. S.P.H.Q. ....
O.S. ....
H.C. ....
Branch ....
In. No. ....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग, मुख्य इमारत,
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई४००-०३२.

Email ID: pol6a.home@nic.in

क्रमांक : पीडीई-१२२५/प्र.क्र.१२१/पोल-६

दिनांक : १४ ऑगस्ट, २०२६.

प्रति,
पोलीस अधिक्षक,
यवतमाळ.

DE
9887

विषय :- शिक्षेविरूध्द अपिलावरील सुनावणीचे आदेश.
(अर्जदार- श्री.शेख नफीस शेख हबीब (मा.पोना.), तत्का.नेम.पुसद शहर पोलीस ठाणे.)

संदर्भ :- आपल्या कार्यालयाचे आदेश क्र.पोअय/डिपी/३१-बी/अं.आ./सफौ.-१०१४ डोंगरे+७/१०३५/२०१८, दि.२९.०१.२०१८.

अपिलार्थी श्री.शेख नफीस शेख हबीब (मा.पोना.), तत्का.नेम.पुसद शहर पोलीस ठाणे यांनी संदर्भीय आदेशाविरूध्द शासनाकडे दाखल केलेल्या अपिल अर्जावर दि.२०.०५.२०२६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचेसमोर सुनावणी संपन्न झाली. सदर सुनावणीअंती अपिलीय प्राधिकारी तथा मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांनी दिलेल्या निर्णयाची प्रमाणित प्रत सोबत संलग्न केली आहे.

अपिलार्थी श्री.शेख नफीस शेख हबीब (मा.पोना.), तत्का.नेम.पुसद शहर पोलीस ठाणे यांचे अपिल अर्जासंदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांनी दिलेल्या निर्णयाचे अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा, ही विनंती.

प्र.उ.पडोळे

(प्रदिप पडोळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
गृह विभाग.

सहपत्र – वरीलप्रमाणे

प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीस्तव-

१) मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
२) अपिलार्थी श्री.शेख नफीस शेख हबीब (मा.पोना.), (पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांच्या कार्यालयामार्फत)
३) निवडनस्ती (पोल - ६)

मा.राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) महाराष्ट्र राज्य यांचे समोर

क्रमांक पीडीई १२२५/प्र.क्र.९२१/पोल-६

| | |
|---|---|
| अपिलार्थीचे नांव | श्री. शेख नफीस शेख हबीब, माजी पोलीस नाईक, यवतमाळ |
| विरुध्द | |
| शिस्तभंग विषयक प्राधिकारी | पोलीस अधिक्षक, यवतमाळ |
| मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील तरतुदी अन्वये दाखल केलेल्या अपील अर्जावर सुनावणी | |

अपिलार्थी श्री. शेख नफीस शेख हबीब, माजी पोलीस नाईक, तत्का. नेम. पुसद शहर पोलीस ठाणे येथे नेमणुकीस असताना केलेल्या कसुरीबाबत शिस्तभंग प्राधिकारी तथा पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांनी त्यांच्या दिनांक २९.०१.२०१८ रोजीच्या आदेशान्वये "सेवेतुन काढुन टाकणे" ही शिक्षा दिली. सदर शिक्षेच्या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपील केले असता दिनांक ०३.१०.२०१९ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आले. तद्नंतर अपिलार्थी यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे फेरअपिल केले असता त्यांच्या दिनांक १३.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये फेटाळण्यात आले आहे. आता अपिलार्थी श्री. शेख यांनी शासनाकडे सादर केलेल्या विनंती अपील अर्जावर दिनांक २०.०५.२०२६ रोजी माझ्यासमोर सुनावणी झाली. सदर सुनावणीस अपिलार्थी, शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांचे कार्यालयातील प्रतिनिधी तसेच गृह विभाग, मंत्रालय येथील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांचे वरील दोषारोप :-

पो.ना.श्री. शेख नफीस शेख हबीब यांनी खालील प्रमाणे कसूरी केलेली आहे.

१. तुम्ही पो.स्टे. पुसद शहर अप.नं. २६०/२००३ कलम ३०७, ३५३, ३४ भादवि चा गुन्हा आरोपी इंद्रजीतसिंह अंनतसिंह ठाकुर यांचे विरुध्द दि.२४.१०.२००३ चे २०.१० वाजता नोंदविण्यात आला व इंद्रजीतसिंह ठाकुर यास गुन्ह्यात दि. २४.१०.२००३ चे २०.५० वाजता अटक करण्यात आली. अटकेपुर्वी ग्रामीण रुग्णालय, पुसद येथे त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असता त्याचे शरीरावर २ किरकोळ जखमा असल्याचे नमुद केले. इंद्रजीतसिंहने गुन्ह्याकरिंता वापरलेली तलवार व फरार आरोपी शोधण्याकरिता इंद्रजीतसिंहचा दि. २८.१०.२००३ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला.

२. पोलीस कस्टडी रिमांडचे काळात इंद्रजीतसिंहच्या दि.२५.१०.२००३ चे २३.३० वा., दि.२६.१०.२००३ चे १८.०० वा. व दि.२७.१०.२००३ चे १४.१० वा. वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्यामध्ये इंद्रजीतसिंहचे शरीरावर नवीन जखमा नसुन त्याची एकंदरीत परिस्थिती सामान्य असलेबाबत नमुद आहे.

३. तथापि दि. २७.१०.२००३ चे मध्यरात्री इंद्रजीतसिंहची प्रकृती बिघडल्याने त्यास ग्रामीण रुग्णालय, पुसद येथे पाठविण्यात आले असता मानसोपचार तज्ञाचे इलाजासाठी त्यांना रेफर करण्यात आले. त्यानुसार दि.२८.१०.२००३ चे ००.२५ वाजता यवतमाळ करिता रवाना करण्यात आले. यवतमाळ येथे पोहोचल्यावर श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील वैद्यकीय अधिका-यांनी इंद्रजीतसिंहला पुन्हा तपासुन ०४.०० वा. मृत घोषित केले. याबाबत प्रथम यवतमाळ शहर येथे अ.मृ.क्र.००/०३ कलम १७४ फौ.प्र.सं. व नंतर पुसद शहर पो. स्टे. अ.मृ.क्र ३१/०३ कलम १७४ फौ.प्र.सं अन्वये दाखल करण्यात आला. कार्यकारी दंडाधिकारी, यवतमाळ ह्यांनी दि.२८.१०.२००३ चे १०.०० वाजता इंद्रजीतसिंहच्या अंगावर दोनपेक्षा वाढीव जखमा असल्याचे नमुद केले. इंद्रजीतसिंहच्या प्रेतावर करण्यात आलेल्या पोस्टमार्टम अहवालात एकूण ०९ किरकोळ जखमा असल्याचे नमुद केले. कॉ. क्र.१९ व २० मध्ये डोक्यास व छातीवर गंभीर स्वरुपाच्या जखमांची नोंद आहे. या गंभीर जखमा कठीण व बोथट वस्तुच्या आघाताने झाल्या असुन मृत्यूपुर्वी २४ तासातील असल्याचा अभिप्राय दिला आहे. डोक्यातील व छातीवरील जखमांच्या वेदनामुळेच मृत्यु या आशयाचा मृत्युच्या कारणाचा अभिप्राय देण्यात आला.

४. एकंदरीत वरील परिस्थितीच्या आधारे इंद्रजीतसिंहचा मृत्यु पोलीस कोठडीत झाला असून मृत्युस कारणीभुत असणाऱ्या जखमा दि. २७.१०.२००३ चे दुपारी १४.३० ते दि.२७/२८.१०.२००३ चे मध्यरात्री दरम्यान मृतकास मारहाण केल्याने झाल्याचे स्पष्ट होते.

५. यावरुन तुम्ही आरोपी इंद्रजीतसिंह अनंतसिंह ठाकुर ह्यांना शस्त्र व फरारी आरोपीची माहिती मिळणेकरिता त्यांना यातना दिल्या व या यातनांमुळेच आरोपी इंद्रजीतसिंह चा मृत्यु झाला असे स्पष्ट होते.

६. वरील घटनेवेळी तुमची गार्ड ड्युटी असताना व तुम्हाला याबाबत कल्पना असताना आरोपीला झालेल्या मारहाणीबाबत कोणतीही माहिती दिली नाही. यावरुन तपासी अंमलदाराने आरोपीस केलेल्या मारहाणीच्या कृत्यास तुमचा दुजोरा होता, असे दिसून आल्याने आपले विरुध्द कलम ३०२, २०१ भा.द.वि.चा गुन्हा दाखल करण्यात आला. अशाप्रकारे तुम्ही अत्यंत बेजबाबदार व निष्काळजीपणाचे वर्तन केले आहे.

७. या तुमच्या निष्काळजीपणामुळे मृतक इंद्रजीतसिंह यांचे नातेवाईकांनी नुकसान भरपाई मिळण्याबाबत केलेल्या दाव्यामध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार नुकसान भरपाई म्हणून रु.५,०५,०००/- (रु.पाच लाख पाच हजार फक्त) शासनास भरावे लागेल, यासाठी तुम्ही स्वत: जबाबदार असल्याचे स्पष्ट होते.

**अपिलार्थी यांचे म्हणणे :-**

सविनय सादर आहे की, मी यवतमाळ जिल्हा पोलीस दलात नेमणुकीस असताना पो.स्टे. पुसद शहर जिल्हा यवतमाळ येथे पोलीस कोठडी मृत्यु प्रकरणात सेशन कोर्ट, पुसद यांनी कलम ३०४ (अ) भा.द.वी. प्रमाणे

करुन मी व माझेसोबतचे ९ आरोपी अशा १० आरोपीपैकी पैकी ४ पोलीस अंमलदार यांना सन २०१४ मध्ये २ वर्षाची शिक्षा सुनावली होती. त्या शिक्षेच्या विरोधात मी व माझेसोबतचे ३ पोलीस अंमलदार यांनी मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ येथे अपील दाखल केली. त्यानंतर मी सन २०१४ ते सन २०१८ पर्यंत यवतमाळ जिल्हा पोलीस दलात पो.अं पदावर कार्यरत राहुन नोकरी केली.

सन २०१८ मध्ये तत्कालीन मा. पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांनी ह्याच प्रकरणात मला सेवेतुन बडतर्फ केले असुन माझे सोबतचे इतर तीन पोलीस अंमलदार हे सेवानिवृत्त झाले आहे. सदर बडतर्फ आदेशाच्या विरुध्द विशेष पोलीस महानिरीक्षक साहेब, अमरावती परीक्षेत्र, अमरावती तसेच मा. पोलीस महासंचालक साहेब, म.रा. मुंबई यांच्याकडे सेवेमध्ये रुजु करुन घेणेबाबत अपील अर्ज सादर केला होता. परंतु माझ्या फेरअपील अर्जाचा नैसर्गीक न्यायतत्वाचा विचार न करता माझा अपील अर्ज फेटाळण्यात आला. सदर अन्यायकारक कार्यवाही मी अतिशय व्यथीत होवुन मी सदरचे अपील आपलेकडे सविनय सादर करीत आहे. याचा विशेष बाब म्हणुन मानवीय दृष्टीकोणातुन विचार करुन मला नैसर्गीक न्यायतत्वाच्या आधारे न्याय करणेस नम्र प्रार्थना वजा विनंती आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहुन सेवेत पुनःस्थापीत करणेस सदरचा अनुकंपा अपील सादर करीत आहे.

महोदय, सविनय विनंती की, माझ्यावर ठेवण्यात आलेल्या 'कृताकृत' दोषारोप प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सकृत दर्शनी सिध्द झालेले नाही. मुख्यत्वे करुन लोकसेवकाविरुध्द न्यायालयीन प्रकरण सुरु असलेले किंवा त्याचे अपील वरीष्ठ न्यायालयात सुरु असेल तर त्यांच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे अभिप्रेत नाही. तथापि, न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असेल तर त्यांच्या विरुध्द खात्यातुन काढुन टाकण्याची कार्यवाही संयुक्तीक नाही. पोलीस विभागात दिर्घकाल निष्कलंक नोकरी केल्यानंतर पोलीस शिस्तीचा बडगा उगारुन माझेवर व माझ्या कुटुंबावर जीवन उध्वस्त करणारी कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच पोलीस महानिरिक्षक, म.रा., मुंबई यांनी प्रत्येकी ७२१५०/- रु वसुल करणे योग्य होणार नाही, असे दिनांक २५.०४.२०१८ ला अपर मुख्य सचिव, गृह विभाग, म.रा., मुंबई यांना लेखी कळविले आहे. त्यामुळे एकाच प्रकरण संबंधाने दोन वेगवेगळया दंडाची वसुली करणे संविधानाच्या विरुध्द व नैसर्गीक न्यायाच्या विसंगत आहे व हीच वस्तुस्थीती आहे. सदर घटना ही शासकीय कर्तव्य करीत असताना उद्‌भवल्याने अशा प्रसंगी पोलीस विभागाने त्यांच्या कर्मचाऱ्याला मदत करणे अभिप्रेत आहे. परंतु माझ्या संदर्भात कुठलीच सहानुभुती न दाखवता मला व माझ्या कुटुंबाला उपासमारीच्या खाईत लोटुन निराधार केले. सदरबाब मानवतेच्या दृष्टीने नैसर्गीक न्याय तत्वानुसार घटनाबाह्य आहे.

त्यानुसार विनंती की, सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई (खंडपीठ नागपुर) येथे सुरु आहे. त्यानुसार न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत पोलीस विभागाने केलेली कार्यवाही स्थगित करुन मला पोलीस दलात पुनः स्थापीत

करुन माझा मला बडतर्फ केल्यापासुन ते आजपर्यंतचा कार्यकाळ कर्तव्यकाळात समाविष्ठ करुन मला माझे आजपर्यंतचे वेतन इतर भत्यासह मिळणेस या अपील व्दारे नम्र विनंती आहे.

महोदय, मला माझे मौखीक निवेदन सादर करणेकरीता आपले आज्ञांकीत कक्ष मिळणेस विनंती आहे. करीता शिक्षा रद्द करण्याकरीता ही कठोर शिक्षा रद्द करण्याच्या विनंतीसह अपील अर्ज सविनय सादर आहे.

शिस्तभंग प्राधिकारी यांचे म्हणणे :-

सदरची शिक्षा ही कसुरदार यांनी केलेल्या कसुरीच्या मानाने योग्य असल्याने अपिलार्थी यांचा विनंती अपील अर्ज फेटाळण्याच्या शिफारशीसह सादर करण्यात येत आहे.

निष्कर्ष :-

सदर प्रकरणी अपिलार्थी श्री. शेख नफीस शेख हबीब, माजी पोलीस नाईक, तत्का. नेम. पुसद शहर पोलीस ठाणे यांनी सुनावणी दरम्यान केलेले अभिवेदन आणि अपिल अर्जात उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेतले. चौकशी संबंधित कागदपत्रे, चौकशीचा अहवाल निष्कर्षासहित तपासण्यात आला आहे. सुनावणी दरम्यान उपस्थित केलेले मुद्दे व विभागाकडून दाखल केलेल्या कागदपत्रांची सूक्ष्मपणे तपासणी असुन त्यानुसार खालीलप्रमाणे दिसुन येते की,

सदर प्रकरणात पुसद शहर पोलीस ठाणे येथे आरोपी इंद्रजीतसिंह अनंतसिंह ठाकुर ह्यांना शस्त्र व फरारी आरोपीची माहिती मिळणेकरिता त्यांना यातना दिल्यामुळेच त्यांचा मृत्यु झाला. सदर घटनेवेळी अपिलार्थी यांची गार्ड ड्युटी असताना व त्यांना याबाबत कल्पना असताना आरोपीला झालेल्या मारहाणीबाबत त्यांनी कोणतीही माहिती दिली नाही. यावरुन तपासी अंमलदाराने आरोपीस केलेल्या मारहाणीच्या कृत्यास त्यांचा दुजोरा होता, असे दिसून आल्याने त्यांचेविरुध्द कलम ३०२,२०१ भा.द.वि.चा गुन्हा दाखल करण्यात आला असा दोषारोप अपिलार्थी यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

सदर प्रकरणाबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या अपील अर्जात नमुद केले आहे की, अपिलार्थी हे पुसद शहर पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना पोलीस कोठडी मृत्यु प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायालय,पुसद यांनी १० आरोपींपैकी ४ पोलीस अंमलदार यांना सन २०१४ मध्ये २ वर्षाची शिक्षा सुनावली होती. त्या शिक्षेच्या विरोधात अपिलार्थी आणि इतर ३ पोलीस अंमलदार यांनी मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ येथे अपील दाखल केले आहे. सदर शिक्षेच्या अनुषंगाने सन २०१८ मध्ये तत्कालीन पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांनी अपिलार्थी यांना सेवेतुन बडतर्फ केले आहे. सदर बडतर्फ आदेशाच्या विरुध्दचे अपील विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती तसेच पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांनी फेटाळला आहे. त्यानुषंगाने न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ असेल तर त्यांच्या विरुध्द खात्यातुन काढुन टाकण्याची कार्यवाही संयुक्तीक नाही. तसेच पोलीस महानिरिक्षक, म.रा., मुंबई यांच्याकडून प्रत्येकी ७२१५०/- रु वसुल करणे योग्य होणार नाही, असे दिनांक

१५.०४.२०१८ ला अपर मुख्य सचिव, गृह विभाग, म.रा., मुंबई यांना कळविले आहे.त्यामुळे एकाच प्रकरण संबंधाने दोन वेगवेगळया दंडाची वसुली करणे संविधानाच्या विरुध्द व नैसर्गीक न्यायाच्या विसंगत असल्याने नैसर्गीक न्याय तत्वाच्या आधारे न्याय करणेस विनंती केली आहे.

सदर प्रकरणाबाबत विभागीय चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी, पांढरकवडा यांनी केली असुन त्याबाबतचा अहवाल पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांना सादर केला आहे. सदर अहवालामध्ये चौकशी अधिकारी यांनी नमुद केले आहे की, मृतक नामे इंद्रजितसिह अनंतसिंह चव्हाण यांना दिनांक २४.१०.२००३ चे २०.५० वा पासुन अप क. २६०/०३ कलम ३०७, ३५३, ३४ भा.द.वि.चे गुन्हयात अटक करण्यात आली होती. त्याच्या तपासकामी दिनांक २५.१०.२००३ ते २८.१०.२००३ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मध्ये पो.स्टे. पुसद शहर येथे बंद होते. यादरम्यान त्यांची तब्येत खराब झाल्याने त्यांना यवतमाळ येथे उपचाराकरीता नेले असता ते दिनांक २८.१०.०३ चे सकाळी ०३.०० वा चे सुमारास मरण पावले. सदर काळात आरोपी इंद्रजितसिंह चव्हाण हे पोलीस रखवालीत होते. इंद्रजितसिंह अनंतसिंह चव्हाण यांच्या मृत्युच्या २४ तासापुर्वी झालेल्या डोक्यावर व छातीवरील झालेल्या जखमा मुळेच मरण पावले आहेत, असा वैद्यकीय अहवाल कागदोपत्री सामील आहे. या जखमा यातील अपिलार्थी यांचे लॉकअप गार्ड डयूटीवर असताना झाल्याचे वैद्यकीय अहवालावरुन निष्पन्न होते. सदर चौकशीत व गुन्हयाचे तपासात मृतक यास कोणी व केव्हा मारहाण केली हे निष्पन्न झाले नाही. परंतु मृतकला झालेल्या जखमा यातील अपिलार्थी यांच्या कार्यकाळातच झाल्याचे दिसुन येते. तरी त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप हे वैद्यकीय अहवाल, ड्युटी रजिस्टर व ठाणे दैनंदिनी अशा परिस्थितीजन्य पुराव्यावरुन सिध्द होते, असे स्पष्ट केले आहे.

तसेच अपिलार्थी यांच्या विरुध्द पुसद शहर पोलीस ठाणे येथे दाखल अप.क्र.९४/०४ कलम ३०२,२०१,३४ भा.दं.वि. या गुन्ह्याच्या सुनावणीमध्ये अतिरिक्त सत्र न्यायालय, पुसद यांनी दिनांक २३.१२.२०१३ रोजीच्या आदेशात नमुद केले आहे की,

As pointed out above, the duty register or guard duty lock up register of the concerned date shows that the present accused no.10 was on lock up guard duty till at least 21-00 hours. On 21-00 hours he also is seen to have taken charge. Thus, at least from the evidence on record one can come to a conclusion that Nafis was in charge from 9 to 12 midnight. Such assault would certainly come under conduct of accused no 10 to as per Explanation 5 to Sec 108 of IPC. ....Hence prosecution has established the commission of offence u/s 304 part II and Sec 330 of IPC. As regards accused no 10 prosecution has established commission of offence u/s 304 part II r/w 109 of IPC.330 r/w 109 of IPC. असे नमुद करुन अपिलार्थी यांनी एक वर्षे सक्त मजुरी आणि रुपये १५,०००/- दंड तसेच दंड न भरल्यास आणखी तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाबाबत अपिलीय प्राधिकारी तथा अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या आदेशातील निष्कर्षात नमुद केले आहे की, अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचा पोलीस कोठडीत झालेला मृत्यु हे गंभीर प्रकरण आहे. तसेच सदर प्रकरणातील काही अपिलार्थी यांना मा. न्यायालयाने दोषी ठरविले आहे. यावरुन कर्तव्यावर असलेल्या काही पोलीसांच्या मारहाणीमुळे अटक आरोपीचा मृत्यु झाला असल्याचा पुरावा दर्शविते. अशा स्वरुपाच्या प्रवृत्तींना पोलीस विभागात कोणत्याही परिस्थितीत स्थान देता येणार नाही.

यावरुन श्री. ठाकूर यांना झालेल्या मारहाणीच्या घटनेच्या वेळी अपिलार्थी गार्ड ड्युटीवर होते. सदर मारहाण झाल्यामुळेच श्री. ठाकूर यांचा मृत्यु झाल्याचे निष्पन्न झाल्याने अपिलार्थी आणि इतर अमंलदार यांचेविरुध्द कलम ३०२, २०१ भादविचा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याबाबत मा. सत्र न्यायालयाने अपिलार्थींना शिक्षा सुनावली आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता मी महाराष्ट्र पोलीस अधिनियम,१९५१ मधील कलम २७ (अ) व महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिले) नियम, १९५६ च्या नियम १८ नुसार मला प्रदान असलेल्या अधिकारान्वये, अपिलार्थी श्री. शेख यांच्या विनंती अपील अर्जावर पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थी श्री. शेख नफीस शेख हबीब, माजी पोलीस नाईक, तत्का. नेम. पुसद शहर पोलीस ठाणे यांचा विनंती अपील अर्ज अमान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी श्री. शेख यांना शिस्तभंग प्राधिकारी यांनी दिलेली "सेवेतुन काढुन टाकणे" ही शिक्षा कायम करण्यात येत आहे.

३. वरील निर्णयाप्रमाणे संबंधितानी आवश्यक ती कार्यवाही करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

दिनांक :- ०७/०८/२०२६

ठिकाण :- मुंबई

(डॉ. पंकज भोयर)
राज्यमंत्री, गृह (ग्रामीण)

प्रमाणित प्रत

प्र. उ. पडोळे
अवर सचिव,
गृह विभाग, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

E-office.

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.**<br>**एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.**<br>**पिन कोड : ४४५ ००१.**<br>**Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in** | |
| **क्र. पोअय/कक्ष-१२/पोनि-केशव ठाकरे/अपील आदेश/दुय्यम प्रत/५०२/२०२६** | **दिनांक** | 07 SEP 2026 |

महत्वाचे

संदर्भ :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अपील आदेश क्र. पोमसं/११/२२/६/अपील अर्ज -ठाकरे/३८/२०२६, दिनांक १७/०७/२०२६.

विषय :- अपील आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये कळविण्यात येते की पोनि/ केशव ठाकरे, नेमणुक पो.स्टे. घाटंजी, यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अंतिम आदेश क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि केशव ठाकरे/कसुरी/अं.आ/३२०/२०२६, दिनांक १३/०२/२०२६ अन्वये दिलेली "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक)" या शिक्षेसंबधाने अपील अर्ज सादर करण्यात आला असता, सदर शिक्षेमध्ये बदल करुन त्यांना "ताशेरे ओढणे" (A Reprimand) ही शिक्षा देण्यात आली आहे.

त्याअन्वये पोनि/ केशव ठाकरे, नेमणुक पो.स्टे. घाटंजी, यांना "ताशेरे ओढणे" (A Reprimand) ह्या देण्यात आलेल्या शिक्षेबाबतचे अपील आदेशाची प्रत अदा करुन दुय्यम प्रतीवर **(पृष्ठांकन पत्रावर सही न करता)** त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन ती प्रत सत्वर या कार्यालयास सादर करावी.

सहपत्रः- अपील आदेश

(कुमार चिंता)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,

उपविभागीय पोलीस अधिकारी, पांढरकवडा.

प्रत :- प्र.लि.आस्था/कक्ष-१०/कक्ष-१७/नोदंणी लिपीक, पो.अ.कार्या. यवतमाळ यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता.

SM [New Other Corr.

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक : पोमसं/११/२२/६-अपिल अर्ज-ठाकरे/३८/२०२६. दिनांक : ई-स्वाक्षरी दिनांक.

संदर्भ :- १) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे पत्र क्र: विपोमनि /अप/कक्ष-५/पोनि-केशव ठाकरे/अपीलअर्ज/२०२६/११३३. दि.१५/०६/२०२६.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अंतिम आदेश क्र : अप/कक्ष-५/पोनि-केशव ठाकरे/कसुरी/अं.आ./३२०/२०२६, दि.१३/०२/२०२६
३) अपीलार्थी पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांचा दि.०४/०५/२०२६ चा अपील अर्ज.

* * * * * * * *

## -: अपिल आदेश :-

पोलीस निरीक्षक केशव ठाकरे हे पो. स्टे. आर्णी जि. यवतमाळ येथे कार्यरत असताना खालीलप्रमाणे कर्तव्यात कसुरी केलेली आहे.

कसुरी :-

आपण पोनि / केशव ठाकरे, नेमणूक पो. स्टे. आर्णी, येथे एक जबाबदार अधिकारी म्हणून कर्तव्यावर कार्यरत असतांना अर्जदार श्री. अभिजीत नानवटकर, जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना, यवतमाळ यांचे दिनांक ०५.०३.२०२५ चे तक्रार अर्जाचे अनुषंगाने आपण डिलीव्हरी बॉय यांला मारहाण केल्याप्रकरणी आपणावर कारवाई करण्याबाबत तक्रार दिली आहे. त्यावर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा यांचेकडुन चौकशी केली असता चौकशी अहवालात खालीलप्रमाणे बाबी निष्पन्न केल्या आहे.

पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या कडुन आलेल्या तक्रार अर्जाबाबत चौकशी करुन पिडीत यांचे बयाण नोंदविले असता त्यांचे म्हणने असे की, दिनांक २३.०२.२०२५ रोजी अंदाजे दुपारी १२.०० वाजता चे दरम्यान मी केशव ठाकरे नावाने आलेल्या पार्सल बाबत त्यांना त्याच्या मोबाईलवर माझ्या मोबाईल मधुन कंपनीच्या ॲप वरुन मी त्यांना फोन करून सांगितले की तुमचे पार्सल आले आहे मी कुठे घेऊन येऊ तर त्यांनी मला सांगितले की मी सध्या बाहेर आहे, मी आल्यानंतर तुझे पार्सल घेतो तरी मी त्यांना म्हटले की तुम्ही कुरिअर ऑफीसला येणार काय तर त्यांनी म्हटले मी दुपारी परत आल्यानंतर ऑफीस मधुन पार्सल घेऊन जाईल तर मी त्यांना म्हटले तुम्ही दुपारी ०४.०० वाजताच्या अगोदर या नाही तर आमचे कुरिअर ऑफीस दुपारी ०४.०० वाजता नंतर बंद होते असे सांगितले व नंतर मी दुपारी अंदाजे ०३.३० वाजताच्या दरम्यान केशव ठाकरे यांना पुन्हा फोन केला व त्यांना मी विचारले की तुम्ही केशव

ठाकरे आहेत का असे विचारले असता व केशव ठाकरे नावाने पार्सल आहे तुम्ही आले आहेत का, तुम्ही पार्सल घेणार आहेत का असे विचारले असता त्यांनी एकदम मला तु कोण आहे तुला चांगले विचारता येत नाही काय तुला सर म्हणता येत नाही काय असे म्हटले असता मी त्यांना म्हटले की आम्हाला आलेल्या पार्सलची त्याच नावाचे आहे किंवा कसे अशी खात्री करणे आवश्यक असल्यामुळे मी त्यांना सांगितले तर त्यांनी तुझे नाव काय, कुठे आहे तुझे कुरिअर सर्व्हिस कुठे आहे असे म्हणुन त्यांनी शिवीगाळ केली व नंतर केशव ठाकरे हे आमच्या कुरीअर ऑफीसमध्ये आले व धिरज कोण आहे असे विचारले असता मी त्यांना म्हटले की मी धिरज आहे तर केशव ठाकरे यांनी मला शिवीगाळ करुन तेरे को गायब कर दूंगा तेरे को मालुम नही क्या मैं कौन हु असे त्यांनी म्हटल्यावर मी त्यांना म्हटले की मी तुम्हाला ओळखत नाही तर केशव ठाकरे यांनी मला म्हटले की मी येथील ठाणेदार आहे असे म्हणुन त्यांनी मला कानपटात दोन थापडा मारुन माझा गळा पकडला व नंतर आमचे मैनेजर साजीद शहा हे आले व त्यांनी आमचे भांडण सोडविले व त्यांनी काय झाले असे विचारले असता त्यांनी साजीद शाहा यांना सुध्दा शिवीगाळ करुन तुम सबको गायब कर दूंगा असे म्हणुन त्यांनी त्यांचे पार्सल घेऊन ते तेथुन निघुन गेले. असे तो आपल्या बयाणात सांगत असुन यातील गैरअर्जदार ठाणेदार केशव ठाकरे, पोलीस स्टेशन, आर्णी यांना पोलीस दलाचे संपूर्ण ज्ञान असतांना कायदयाचे परिपुर्ण प्रशिक्षण घेतले असुन, सुध्दा सर न म्हटल्यामुळे पिडीत याला गालावर दोन थापडा मारुन, गळा पकडला अशाप्रकारे पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदारपणाचे गैरवर्तन केल्यामुळे पोलीसांची प्रतिमा जनमाणसात मलीन झालेली आहे. यावरुन पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांनी कर्तव्यात बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केले असुन त्यांच्या अशा बेशिस्त गैरवर्तनाचा विपरीत परिणाम इतर पोलीस अधिकारी यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील सर्व बाबीचा विचार करीता आपण ठाणेदार या जबाबदार पदावर कार्यरत असतांना कर्तव्यात निष्काळजीपणा, बेजबाबदारपणाचे वर्तन केले असुन, तुमच्या अशा बेशिस्त गैरवर्तनाचा विपरीत परिणाम इतर पोलीस अधिकारी यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपले वर्तन शिस्तप्रिय पोलीस खात्याला अशोभनीय असल्याचे दिसुन येते.

-: कार्यवाहीचा तपशील :-

पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांनी केलेल्या कसुरीच्या अनुषंगाने त्यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे दि.२४/११/२०२५ च्या कारणे दाखवा नोटीसव्दारे "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा का देण्यात येऊ नये ? " ही शिक्षा प्रस्तावित केली होती. त्यास अनुसरून त्यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असल्याने विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे दि.१३/०२/२०२६ च्या अंतिम आदेशान्वये पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांना प्रस्तावित केलेली "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे " हि शिक्षा कायम केलेली आहे. सदर शिक्षेविरुध्द पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांनी दि. ०४/०५/२०२६ अन्वये या कार्यालास सादर केलेला अपील अर्ज असून, तो विहित मुदतीत सादर केलेला आहे. अपीलार्थी यांनी त्यांचे अर्जात खालील प्रमाणे मुद्दे मांडलेले आहेत.

-: अपिलार्थीचे विवेचन :-

१. वेतनवाढ रोखणे ही गौण शिक्षा असली तरी त्यात बोलका (Speaking) अंतिम आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, त्यात मी कारणे दाखवा नोटीसचे जबाबात मांडलेले मुद्दे का पटतात व का पटत नाही याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. तसा बोलका अंतिम आदेश पारित करण्यात आलेला नाही. या संबंधात मी आपले लक्ष खालील नमुद न्यायनिवाडयाकडे वेधु इच्छितो. Increment Stoppage of, Speaking Order be passed Speaking order should be passed Dr. B.K. Talwar V. State of Haryana १९७० Cur LJ ५७९: १९७० SLR ७३२: Ram Das Chaudhary V State of Punjab १९६८ SLR ७९२: Bhagat Raja V. Union Of India, AIR DR. P.K. Mittal V. State of Punjab १९८२ (२) SLR २६७

२. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा यांनी अर्जदार श्री अभिजीत नानवटकर, जिल्हा अध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण सेना, यवतमाळ यांच्या दिनांक ०५/०३/२०२५ च्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने अर्जदार श्री. धिरज गेडाम, डिलीव्हरी बॉय याला एक थापड मारल्याप्रकरणी केलेल्या चौकशी अहवालाच्या आधारे मला वेतनवाढ रोखण्याची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती व ती शिक्षा मा. पोलीस महानिरीक्षक अ.प. अमरावती यांनी कायम केली. कार्यवाही केवळ राजकीय दबावामुळे करण्यात आली.

३. एका राजकीय पक्षाच्या पदाधिका-यांच्या अर्जाचा महत्व देऊन याप्रकरणाची चौकशी केली गेली. दुसरे असे की, तथाकथित पिडीत धिरज गेडाम याने व्यक्तिगत येवुन तक्रार दिलेली नाही. तर अभिजीत नानवटकर, जिल्हा अध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण सेना, यवतमाळ यांचेशी संगणमत करुन हि तक्रार दाखल करण्यात आली आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, तथाकथित पिडीत धिरज गेडाम याने कलम १२, मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ अन्वये मा. अध्यक्ष, मानवी हक्क आयोग, मुंबई तसेच मा. अध्यक्ष, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई व महाराष्ट्र तक्रार प्राधिकरण, १. मुंबई यांचेकडे यांचे तक्रार दाखल केली आहे. यावरुन हे स्पष्ट दिसत आहे की, अर्जदाराला कोण्याही एका प्राधिकरणावर अथवा न्यायीक संस्थेवर विश्वास नाही. दुसरे असे की, अर्जदाराच्या अर्जाचे बारकाईने अवलोकन केले तर आपणास दिसुन येईल की, सर्व तक्रारीतील शब्द न शब्द सारखा आहे. यामुळे तक्रार कर्ता तथाकथित पिडीत ईसम शुध्द अथवा प्रामाणिक हेतुने कुठल्याही प्राधिकरणाकडे अथवा न्यायसंस्थेकडे न्याय मागत नाही आहे.

४. निवेदक आर्णी पोलीस स्टेशनला ठाणेदार म्हणून कार्यरत असता दि. २३.०२.२०२५ ला साधारणतः त्यांना दुपारी ३.३६ वाजता त्याच्या मोबाईल फोन क्र. ९८८१००३९९३ वर फोन आला, त्यावर Gurgaon HR असे डिस्ले आले होते. नोएडा व गुरगांव हे दोन्ही प्रभाग फेक कॉल करिता बदनाम आहेत आणि जेव्हा Gurgaon HR असे लिहुन आले तेव्हा तो कॉल आहे असे समजुन निवेदकाने तो घेतला, तर कॉलवरुन समोरुन एक व्यक्ती असभ्य भाषेमध्ये "केशव ठाकरे बोलतं का" असे एकेरीत बोलला. वारंवार त्याला त्याचे नाव विचारुन कोठुन बोलत आहे हे विचारले असता त्याने नाव व पत्ता सांगितला नाही. पहीलेच Gurgaon HR असे डिस्प्ले झाल्याने निवेदकामधला पोलीस जागा झाला होता व निवेदकाने त्याला दमानेच म्हटले, "तुला सर वगैरे म्हणुन काही बोलता येत नाही का व मी तुझ्या कामावरचा गडी आहे कां., "असे म्हटले, निवेदकाने त्याला वारंवार नाव पत्ता विचारला. पण तो त्याने सांगितला नाही. तो फक्त एवढेच म्हणाला की, "तुमचे पार्सल आहे," असे उध्दटपणे बोलला. त्यावेळी निवेदक त्याचे ठाण्याच्या क्षेत्रांत पेट्रोलिंग वर होता व पेट्रोलिंग करुनच नंतर साधारणतः दुपारी ४ वाजता निवेदक व त्याचा सहकारी चालक पोलीस हवालदार योगेश गिरी त्याचे ऑफीसमध्ये साध्या वेशात पोहोचले. इथे निवेदक नमुद करुन इच्छितो की, त्याच दिवशी निवेदकाला

सकाळी दोन फोन कॉल आले होते जे निवेदकाने घेतले होते. त्यात त्याला पार्सल घ्यायला एका व्यक्तीने टिव्हीएस शोरुम जवळ, त्याच्या कुरीयर ऑफीसला बोलाविले होते. शंका आल्याने निवेदकाने मोबाईल फोनमधील सकाळचे आलेले फोन कॉल्स व दुपारी ३.३६ वाजता आलेल्या कॉलचा मोबाईल नंबर चेक केला असता तो एकच निघाला. सर्व कॉल एकाच नंबर वरुन आल्याचे निदर्शनास आले म्हणून निवेदक त्या अनोळखी व्यक्तीने सकाळी सांगितलेल्या पत्यांवर गेला. त्या अनोळखी व्यक्तीने निवेदकाचे पार्सल होम डिलीवरी न करता त्यांचे कार्यालयात पार्सल घ्यायला बोलाविल्याने व एकेरी सुरात बोलल्याने निवेदकाला अपमानीत झाल्याचे वाटत होते. ऑफीस मध्ये हजर असलेल्या एकमेव व्यक्तीस तुम्ही ठाकरे साहेबांना कॉल केला होता काय असे विचारले. त्यावर त्याने होकार दिल्याने निवेदकाने त्याला विचारले की, "तुम्ही मला एकेरी भाषेत कसे काय बोलले व मला वारंवार फोन का करता, समोरील व्यक्ती कोणीही असु शकते त्याला सर म्हणुन बोलायंच" असे बोललो तेव्हा त्या व्यक्तीने निवेदकाला सॉरी म्हणावे एवढेच अपेक्षित होते.

५. नंतर पार्सलवर जेव्हा निवेदकाचे नाव पोलीस ठाण्याचा संपुर्ण पत्ता लिहीलेला निवेदकाने पाहिला तेव्हा ऑफीस मध्ये उपस्थित असलेला तो एकमेव व्यक्ती नामे धिरज गेडाम यास निवेदकाला ओळखत नाही का असे विचारले असता त्याने निवेदकाला ओळखत नसल्याचे म्हटले. एवढा स्पष्ट नाव पत्ता असतांनाही धिरज गेडाम याने जाणीवपूर्वक निवेदकास ओळखत नाही असे बोलुन पुन्हा अपमानीत केले. मग धिरज गेडाम यास निवेदकाने जरा उंच आवाजात विचारले आणि म्हटले की, "जेव्हा पार्सलवर निवेदकाचा नाव व पत्ता लिहीलेला आहे, तेव्हा ते पार्सल तुला तेथे सहज पोहचविता आले असते, त्यामुळे निवेदकाला ऑफीसमध्ये बोलावण्याची गरज नव्हती" त्यावर त्याचेजवळ काहीही उत्तर नव्हते हे खरे आहे की अर्जदार स्वतः तेथे धिरज गेडानचे सकाळचे कॉलवरुन गेला, स्वतःहुन गेलेला नाही. उलट धिरज गेडाम निवेदकाशी उध्दटपणे वागला व बोलला. डिलीव्हरी बॉयने नेहमी विनम्र असावे व ही विनम्रता त्याने राखली नसल्यामुळे निवेदकाने त्याला फटकारले पण निवेदकाने त्याला शिव्या दिल्या नाही. जातीवाचक शिव्या तर अजिबातच दिल्या नाही. कारण धिरजचे नाव आणि जात कोणती आहे हे कथीत घटनेवेळी निवेदकाला माहित नव्हते. परंतु आता जेव्हा तक्रारीचे अवलोकन केले तेव्हा त्याची जात बौध्द असल्याचे दिसुन येते. निवेदकाने त्याला जातीवरुन शिव्या दिल्या नाही व जातीवरुन फटकारले. निवेदक प्रामाणिकपणे सांगु इच्छितो की, घटनेवेळी पासुन ते ही तक्रार वाचेपर्यंत धिरज गेडाम हा अनुसूचित जाती जमातींचा आहे हे माहित नव्हते व नाही. यासर्व बाबी निवेदकाने मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग दारव्हा, जि. यवतमाळ यांचे समक्ष मांडल्या परंतु निवेदकाचे म्हणने लक्षात न घेता धिरज गेडाम यांच्या तक्रारीतील मी त्याला चापट मारली व शिवीगाळ केली हे मान्य केले व तसा अहवाल आपणांकडे सादर केला. मा. एसडीपीओ दारव्हा साहेबांनी जो चौकशी अहवाल आपणांकडे दाखल केला त्याची एक प्रत मला देवुन माझे म्हणने ऐकुन घ्यायला हवे होते पण तसे झाले नाही.

६. तथाकथित पिडीत ईसमाला हाताशी पकडुन एका राजकीय पक्षाच्या ईसमाने हि तक्रार सादर केली व त्याचा पाठपुरावा केला. माझा पोलीस खात्यामधील नोकरीचा लेखा जोखा व अभिलेख अतिशय प्रामाणिकतेचा व कर्तवगारीचा राहिलेला आहे. अर्जदार या ठिकाणी आवर्जुन लक्ष वेधु इच्छितो की अर्जदाराने त्याचे अधिकार क्षेत्रांतील वाळु माफीया विरुध्द अवैध वाळु माफीया विरुध्द अवैध वाळु उत्खननाविरुध्द अभियान उघडले होते. व २२ प्रकरणे उघडकीस आणुन १, ७८, ९६, ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन त्यांचेवर कठोर कार्यवाही करुन गुन्हे नोंदविले होते. व माहिती अशी आहे की, या वाळु माफीयांनीच संगणमत करुन निवेदकाविरुध्द तक्रार दाखल करण्यास सांगितली. हि बाब निवेदकाने मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग दारव्हा, जि. यवतमाळ यांच्या लक्षात

आणून दिली परंतु त्यांनी याकडे लक्ष दिल्याचे दिसत नाही. पोलीस सेवेत नोकरी करीत असताना माझे वरिष्ठांनी सक्षम व कर्तव्यनिष्ठ अधिकारी व अंमलदार यांना नेहमी प्रेरित करायला हवे व त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहायला हवे अशी माझी रास्त अपेक्षा आहे. एका खोटया तसेच रंग फासलेल्या तक्रारीला अवास्तव महत्व देवुन व वस्तुस्थिती दुर्लक्षुन जी शिक्षा महोदय आपण मला प्रस्तावित केलेली आहे व ती माझे करिता अतिशय क्लेशकारक व मला कर्तव्यापासुन नामोहरण करणारी आहे.

७. मुळ तक्रारकर्ता धिरज राजु गेडाम यांनी मा. अध्यक्ष, राज्य मानीव हक्क आयोग, मुंबई, मा. अध्यक्ष, अनुसूचित जाती जमाती आयोग, मुंबई व मा. अध्यक्ष महाराष्ट्र पोलीस तक्रार प्राधिकरण, मुंबई यांचेकडे एकाच मजकुरांच्या तक्रारी दाखल केलेल्या आहेत. हे तिनही संवैधानिक आयोग आहेत यातील मा. अध्यक्ष, मानवी हक्क आयोग, मुंबई यांनी याच तक्रारीची दखल घेतलेली आहे. त्यांच्या दि. ०७.१०.२०२५ च्या प्रोसिडींगची प्रत व मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या दिनांक १९.१२.२०२५ च्या समन्सची पत्रांची प्रत सहपत्र क्र. २ प्रमाणे आपले अवलोकनार्थ सादर केली आहे. यासंबंधात तक्रारकर्ता यांनी माझेविरुध्द राज्य मानीव हक्क आयोग, मुंबई व राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग, मुंबई यांच्या तक्रारी केल्या आहेत. त्यावर रितसर सुनावणी सुरु आहे. या दोन्ही आयोगांनी मला आजपर्यंत दोषी ठरविले नाही. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अ.प. अमरावती यांनी मला विषयात नमुद शिक्षा ठोठावल्यामुळे येथे भारतीय संविधानाचे अनुच्छेद क्र. २० (०२) तसेच भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३३७ मधील तत्वांचे स्पष्ट उल्लंघन होत आहे. तरी वरील संविधानिक व कायदेशिर परिस्थितीवर विचार करुन मा. विशेष पोलीस महानिरीक्षक अ.प.अमरावती यांचा संदर्भित सदोष, अन्यायी व नियमबाह्य अंतिम आदेश रद्द करण्याची कृपा करावी. मला पोलीस विभागात २६ वर्षांची सेवा झालेली आहे. या सेवाकाळात माझेविरुध्द कोणतीही फौजदारी किंवा विभागीय कार्यवाही करण्यात आलेली नाही. मला आजपर्यंत कोणतीही गंभिर शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही. मला आजपर्यंत कोणताही प्रतिकुल शेरा प्राप्त झालेला नाही. उत्कृष्ठ कर्तव्य पार पाडण्याकरिता बरीचशी बक्षिसे मिळालेली आहेत. या माझे उत्कृष्ठ अभिलेखावर म.पो.म. भाग १ चे नियम क्र. ४४९ मधील तरतुदीनुसार विचार करण्याची कृपया करावी.

## -: निष्कर्ष :-

अपीलार्थी पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांचा अपिल अर्ज, कसुरीची कागदपत्रे व त्या पुष्टयर्थ असणारे दस्ताऐवज तसेच, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांच्या निराकरण टिप्पणीचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलार्थी यांच्या विरूध्द योग्य ती प्रक्रिया राबवून त्यांना शिक्षा देण्यात आलेली आहे. तथापि अपीलार्थी पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांनी अपील अर्जात उपस्थित केलेले मुद्दे अंशतः समाधानकारक असून त्यांचा पुर्व सेवाभिलेख पाहता त्यांना दिलेल्या शिक्षेत सौम्यता आणणे न्यायोचित होईल. सबब मी " अपिलीय प्राधिकारी " म्हणून खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

-: आदेश :-

मी, मधुकर पाण्डेय, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई, याव्दारे अपिलार्थी पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी दि.१६/०२/२०२६ च्या अंतिम आदेशान्वये दिलेल्या "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे" या शिक्षेऐवजी त्यांना "ताशेरे ओढणे (A Reprimand) (ज्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेतली जाईल)" ही शिक्षा देत आहे.

२. सदर शिक्षेच्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) नियम, १९५६ मधील नियम क्र.७ नुसार अपिलार्थी यांना अपील अनुज्ञेय नाही.

Digitally signed by
Madhukar Pandey
Date: 17-07-2026
17:48:09

(मधुकर पाण्डेय)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस निरीक्षक केशव ठाकरे, पो. स्टे. घाटंजी, जि. यवतमाळ
(मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ)

प्रत :-

विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

२/- पोलीस अधीक्षक यांनी सदर डिजीटल स्वाक्षरी केलेल्या आदेशांची प्रत पोलीस निरीक्षक योगेश कामाले यांना त्वरीत अदा करुन, दुय्यम प्रतीच्या प्रत्येक पृष्ठावर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून, ती दिनांकित स्वाक्षरीची दुय्यम प्रत सत्वर या कार्यालयास पाठवावी. तसेच त्यांच्या शिक्षेची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करावे.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, ३ व ९

E-office.

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२(१)/अपिल आदेश/पोशि-९३५ सचिन कांबळे/ 9033 /२०२६ दिनांक- 07 SEP

महत्वाचे/ तात्काळ

संदर्भ:- विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अपील आदेश क्रं. अप/कक्ष-५/यवतमाळ /अपिल आदेश/पोशि-९३५ कांबळे/१६३७/२०२६, दि.१४/०८/२०२६.

विषय :- अपील आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते की, पोशि/९३५ सचिन कांबळे, नेमणुक पोलीस स्टेशन, पोफाळी जि. यवतमाळ यांनी या कार्यालयाचे आदेश क्रं.पोअय/कक्ष-१२(१)/अं.आ./पोशि-९३५ कांबळे/I/५२४४१/२०२६, दिनांक ०५/०८/२०२६ अन्वये दिलेल्या शिक्षेसंबंधाने अपील अर्ज सादर करण्यात आला असता, " रुपये ५०००/- अर्थिक दंड " या शिक्षेत अंशतः बदल करुन " रुपये २०००/- अर्थिक दंड " ही शिक्षा देण्यात आली आहे.

त्यानुसार पोशि/९३५ सचिन कांबळे, नेमणुक पोलीस स्टेशन, पोफाळी जि. यवतमाळ यांना " रुपये २०००/- अर्थिक दंड " ही शिक्षा देण्यात आल्याबाबतचे अपील आदेशाची प्रत संबधीतास अदा करुन अपील आदेशाचे प्रतीवर (पृष्ठांकन पत्रावर सही न करता) त्यांची नावासह दिनांकीत स्वाक्षरी करुन आदेशाची दुय्यम प्रत तात्काळ कोणताही विलंब न करता या कार्यालयास सादर करण्यात यावी.

सहपत्र:- अपील आदेश

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

पोशि/९३५ सचिन कांबळे,
नेमणुक पोलीस स्टेशन, पोफाळी.

मार्फत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, पोफाळी.

२) सदर अपील आदेशाची मुळ प्रत संबंधिताना अदा करुन अपील आदेशाच्या दुय्यम प्रतीवर नावानिशी त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- प्र.लि. आस्था. शाखा/कक्ष-०९/कक्ष-०९-(०२)/कक्ष-१८/कक्ष-१४/नोंदणी लिपीक, पो.अ.कार्यालय यवतमाळ यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीकरिता.

## कार्यालय :- विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

माल टेकडी रोड, कॅम्प एरिया, अमरावती-४४४ ६०६ ( महाराष्ट्र )
दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६, ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/
www.igpamravatirange.gov.in

क्रमांक :- अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल आदेश/पोशि-९३५ कांबळे/२०२६ 1637 अमरावती, दि. 14 AUG 2026

वाचा :- १) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र. पोअय/कक्ष-१२(१)/अपिल अर्ज/पोशि ९३५ कांबळे/३९१६/२०२६ दि.१२.०५.२०२६
२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ क्र.पोअय/कक्ष १२(१)/अं.आ./पोशि ९३५ कांबळे/५२४४१/२०२५ दि.०५.०८.२०२४
३) पोशि/९३५ सचिन कांबळे यांचा दि. ०१.१०.२०२५ रोजीचा अपील अर्ज

****

अपिलार्थी पोशि/९३५ सचिन कांबळे, नेमणुक पोस्टे पोफाळी, जि.यवतमाळ येथे कार्यरत असतांना त्यांचेवर पुढीलप्रमाणे कसुरी ठेवण्यात आली आहे.

### -: कसुरी :-

पोशि/९३५ सचिन कांबळे, नेमणुक पोस्टे पोफाळी, जि.यवतमाळ हे सन-२०१४ मध्ये अनुकंपावर भरती झाल्यानंतर प्रथम पोलीस स्टेशन,महागाव येथे तैनातीस असतांना ०६ वर्ष सेशन कोर्ट पुसद येथे कोर्ट पैरवी डयुटी केली. सन-२०२२ मध्ये पोलीस स्टेशन पोफळी येथे आमद आले व आमद आल्यानंतर सदर अंमलदार यांनी सेशन कोर्टात काम केल्याने गुन्ह्याबाबतचे कामकाज येत असल्याने अपिलार्थी यांनी डोंगरगाव बिट मध्ये पोहेकॉ/१०० ज्ञानेश्वर मस्के यांचे सोबत लेखनिक म्हणुन देण्यात आले. डोंगरगांव बिट मध्ये ५ ते ६ महिने काम केल्यानंतर "मी कोठेही जनरल काम करता पण बिट रायटर म्हणुन काम करत नाही" असे सांगितलेने त्यांना बिट मधुन काढून जनरल डयुटी करीता ठेवण्यात आले.

दि.३१.०५.२०२४ रोजी पोस्टे हददीतील मुळावा येथे राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या रॅलीवर दगडफेक होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर तनावाचे वातावरण निर्माण झाल्याचे वरिष्ठांचे आदेशान्वये पोस्टे पोफाळी अंतर्गत येत असलेल्या मुळावा चौकीवर फिक्स पॉईट नेमण्याबाबत आदेश झाल्याने अपिलार्थी हे जनरल डयुटी करीता असल्याने त्यांना चौकीवर फिक्स पॉईट करीता नेमण्यात आले. अपिलार्थी यांनी ०८ दिवस डयुटी केल्यानंतर प्रभारी अधिकरी यांना भेटुन सांगितले की " मी मुळावा चौकी येथे डयुटी करीत नाही मला पोलीस स्टेशनला डयुटी लावा " तेव्हा प्रभारी अधिकारी यांनी सांगितले की मुळावा येथे डयुटी करावी लागेल. तेव्हा अपिलार्थी यांनी सांगितले की. "मला मुळावा चौकीवर डयुटी लावले तर मी फाशी घेतो." अशी धमकी प्रभारी अधिकारी यांना दिल्याने त्याबाबत पोलीस स्टेशन डायरीला साना क्र.२२/२०२४, दि.०९.०९.२०२४ अन्वये नोंद करुन अपिलार्थी यांचा खुलासा घेण्यात आला. व त्यानंतर त्यांना पोलीस स्टेशनलाच ठेवण्यात आले. अपिलार्थी हे मनमर्जी स्वभावाचे असून त्यांना दिलेल्या कोणत्याही आदेशाला न स्विकारता ' मी म्हणेन तीच डयुटी मला द्या ' या स्वभावाचे आहे. दिलेली डयुटी वारंवार नाकारुन पोलीस स्टेशनला नकारात्मक बाबी पसरविण्याचे सवयीचे आहेत.

अपिलार्थी पोलीस स्टेशनला कर्तव्यावर तैनातीस असलेल्या मपोकॉ/७७९ निलम श्रीवास यांच्याशी जवळीक निर्माण केली असून कर्तव्यावर असतांना दोघे अंमलदार हे तासंतास एकत्र बसून बोलत असतांना दिसतात. त्यामुळे पोलीस स्टेशनचे वातावरण गढुळ होत असून इतर अंमलदार यांचे सोबत समक्ष होत असलेला प्रकार हा इतर कर्मचारी यांचेवर परिणाम करणारा आहे.

पोलीस स्टेशन तैनातीस असतांना अपिलार्थी यांना सेशन कोर्ट पुसद येथे सहा वर्ष काम केल्याने क्राईम रायटरचे काम करु शकता या उद्देशाने प्रभारी अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०१.०४.२०२५ रोजी क्राईम रायटरचे कामकाज करण्याबाबत लेखी स्वरुपात आदेश दिले. परंतु यावेळी सुध्दा अपिलार्थी यानी प्रभारी अधिकारी यांना भेटून सांगितले की "मला क्राइम रायटरचे काम करावयाचे नाही. " मला जनरल डयुटी करावयाची आहे. असे सांगून दिलेल्या आदेशाचे स्पष्टपणे नकार दिला व दिलेल्या आदेशावर स्वहस्तक्षरात लिहुन दिले की श्रीमानजी मला क्राईमचे कोणतेही ज्ञान नसल्याने इतर कोणत्याही डयुटी करण्यास तयार आहे. असे लिहुन देवून कर्तव्य बजावण्यास नकार दिला, याबाबतची नोंद पोस्टे च्या स्टेशन डायरी साना क्र.१२/२०२५ दि.०४.०४.२०२५ विस्तृत नोंद केली आहे.

## -: कार्यवाहीचा तपशील :-

उपरोक्त कसुरीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचेकडील अंतीम आदेश दि.०५.०८.२०२४ अन्वये अपीलार्थी पोशि/९३५ सचिन कांबळे यांना " **रु.५०००/- आर्थीक दंड** " हि शिक्षा देण्यात आलेली आहे.

सदर शिक्षेविरुध्द पोशि/९३५ सचिन कांबळे यांनी या कार्यालयास दि. ०१.१०.२०२५ अन्वये अपिल अर्ज विहीत मुदतीत सादर केला असुन, सदर अपिल अर्जात त्यांनी पुढील प्रमाणे मुद्दे नमुद केले आहे.

## -:अपिलार्थीचे विवेचन:-

१. पोकॉ/९३५ सचिन कांबळे हे पोलीस स्टेशन पोफाळी जिल्हा यवतमाळ येथे तैनातीस आहे. आम्हास मा.पोलीस अधीक्षक यवतमाळ यांनी वरील संदर्भाकित कार्यालयाचे पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस दिली होती पत्रान्वये त्या कारणे दाखवा नोटीस चे स्पष्टीकरण आम्ही लेखी स्वरुपात पोलीस अधीक्षक, कार्यालय यवतमाळ येथे जावक क्रमांक क्र.६७०/२०२५,दि.२०.०७.२०२५ रोजी दाखल करण्यात आले होते.

दाखल करण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीस चे स्पष्टीकरण वरुन आम्हास पोलीस अधीक्षक साहेब यवतमाळ यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून आम्हास कारणे दाखवा नोटीस मध्ये नमूद करण्यात आलेली पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची शिक्षा अपरिणामकारक का रोखण्यात येवु नये त्या एवेजी कसुरदाराने सादर केलेले का.दा.नो. चे स्पष्टीकरण असमाधानकारक दिसून आले व तुम्ही तुमचे कर्तव्यात बेशिस्तपणा बेजबाबदारपणा केला आहे व तुमचे या प्रवृत्तीचा विपरीत परिणाम इतर कर्मचाऱ्यावर होऊन पोलीस खात्याच्या शिस्तीत बाधा नाकारता येत नाही असे निकष लावून कसूरदार यांना आमचे कसुरी बाबत अंतिम आदेश निर्गमित करण्यात आले त्या अंतिम आदेश मध्ये कसुरी बाबत मुंबई पोलीस शिक्षा आणि आपले नियम १९५६ मधील ३(२)(४) मधील तरतुदीनुसार रुपये ५०००/- आर्थीक दंड ही शिक्षा देण्यात येत आहे व अंतिम आदेश मधील शिक्षाही तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहित मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांक पासुन ६० दिवसाच्या आत मा. पोलीस महानिरीक्षक अमरावती परिक्षेत्र अमरावती याच्याकडे मार्फतीने अपील अर्ज करु शकता असे अंतिम आदेश मध्ये नमूद केले आहे.

२. पोकॉ/९३५ सचिन कांबळे, पोस्टे पोफाळी यांना प्रस्तावित केलेली शिक्षाही मान्य नसल्याने सदर रु.५०००/- आर्थीक दंड ही शिक्षा रद्द करणेबाबत आपले कार्यालयात अपिल केले आहे. आम्ही सन-२०२३ मध्ये पोलीस हेड कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर मस्के ब.नं.१०० यांच्यासोबत पोलीस स्टेशन अंतर्गत डोंगरगाव बीट मध्ये लेखनिक म्हणून व सोबत ATS चे काम करत होतो व दहा महिने काम केल्यानंतर तत्कालीन ठाणेदार ढोमणे साहेब यांचे लेखनिक यांची जिल्हा बदली झाल्याने ठाणेदार साहेब यांनी इतर कामे केली व आम्हास सेशन कोर्टात चालणारे गुन्हयाचे अनुभव नसल्याने तत्कालीन ठाणेदार यांनी अनुभवी लेखनिक पाहिजे असे सांगितल्याने सन-२०२४ मध्ये प्रशासकीय बदली मध्ये नविन अंमलदार बदलून आल्याने ठाणेदार साहेब यांनी आमचे जागेवर नविन लेखनिक घेतला तेव्हापासून आम्ही आज पावेतो नेमण्यात आलेल्या जनरल डयुटी सोबत एटीसी चे काम पाहत आहे.

३. दि.३१.०५.२०२४ रोजी पोलीस स्टेशन हददीत मुळावा येथे राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे रॅली दगडफेक होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा आमची डयुटी मुळावा चौकीवर फिक्स पॉईट लावण्यात आली.डयुटी दरम्यान ठाणेदार साहेब यांनी फोन करुन तुम्ही पोलीस स्टेशनला परत या असे तोंडी आदेश दिल्याने आम्ही मुळावा चौकीवरुन पोस्टे ला आलो व ठाणेदार साहेब यांनी पोलीस हेड कॉन्स्टेबल मस्के ब.न.१०० यांचे कडील प्रलंबित गुन्हे काढण्याबाबत तोंडी आदेश दिल्याने आम्ही आदेशान्वये प्रलंबित गुन्हे निकाली काढले व डयुटी मदतगार यांनी गणनेत डयुटी लावल्याप्रमाणे जनरल डयुटी लावले तर फाशी घेतो अशी धमकी दिली नाही. त्याबाबत ठाणेदार साहेब यांनी स्टेशन डायरीला सा ना टाकला किंवा काय याबाबत आम्हास काहीही माहिती नाही. डयुटीबाबत काधीच मी म्हणेन तीच डयुटी द्या किंवा आम्हास नेमुन दिलेली डयुटी नाकारली नाही किंवा पोलीस स्टेशनला व कर्मचाऱ्यांमध्ये नकारात्मक बाबी पसरविल्या नाही.

४. तसेच पोलीस स्टेशनला तैनातीस असलेल्या मपोशि/७७९ नीलम श्रीवास हया हिंदी भाषिक असून त्यांना मराठी भाषा पाहिजे त्या प्रमाणात पुरक व अवगत नसल्याने त्यांना अडचण असल्यास ती आम्हास विचारते त्यांची व माझी जवळीक नाही आम्हास

आदेशाची अवहेलना न करता आम्ही आदेशाचे पालन करुन आदेश घेतला व आदेशावर सही केली व त्यावर आम्हाला क्राईमचे कोणतेही ज्ञान नसून इतर कोणतीही डयुटी करण्यास तयार आहे असे लिहून दिले परंतु आदेश स्विकारण्यास नकार दिला नाही.

५. तरी माननीय महोदय आपणास विनंती करण्यात येते की, कसूरदार यांनी पोलीस अधीक्षक साहेब यवतमाळ यांना यापुर्वी सदर बाबत स्पष्टीकरण सादर केलेले असून स्पष्टीकरणामध्ये कसुरदार यांनी पुर्ण मुद्दे निहाय माहिती सादर केलेली आहे तरी सदर स्पष्टीकरण चे अवलोकन करुन कसुरदार यांना प्रस्तावित केलेली मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील (३) (४) मधील तरतुदी नुसार पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक वर्षाकरीता अपरिणामकारक हया शिक्षे ऐवजी माननीय पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ यांनी अंतिम आदेशामध्ये मुंबई पोलीस ( शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील (३)(४) मधील तरतुदी नुसार " रु.५०००/- आर्थीक दंड " हि शिक्षा दिली आहे. तरी प्रस्तावित शिक्षा रद्द करण्यात यावी.

## -: निष्कर्ष :-

अपिलार्थी पोशि/९३५ सचिन कांबळे, पोस्टे पोफळी, जि.यवतमाळ यांना दिनांक ०५.०८.२०२६ रोजी आमचे समक्ष अपिल सुनावणीची संधी देण्यात आली. अपिलार्थी यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यांचे व त्यावर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी सादर केलेल्या निराकरण टिप्पणीचे बारकाईने अवलोकन केले. लेखी अभिवेदनामध्ये दिलेल्या खुलाश्या प्रमाणे खुलासा करीता आहेत. त्यांनी मौखीक खुलाश्यामध्ये कोणताही नविन खुलासा केलेला नाही.त्यांनी त्यांना देण्यात आलेले कर्तव्य नाकारल्याचे व त्यांना पाहिजे ते कर्तव्य देण्यात यावे असे वर्तन केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यांनी सादर केलेले लेखी अभिवेदन व मौखीक खुलासा विचारात घेवुन त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे दिनांक ०५.०८.२०२४ चे आदेशान्वये दिलेल्या शिक्षेत अंशत: बदल करण्याचे निष्कर्षाप्रत मी आलो आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## -: अपील आदेश :-

मी, डॉ. महेश पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती याव्दारे अपिलार्थी पोशि/९३५ सचिन कांबळे, पोस्टे पोफळी, जि.यवतमाळ यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी "रु.५०००/- आर्थीक दंड" या शिक्षेऐवजी "रु.२०००/- आर्थीक दंड " ही शिक्षा देण्यात येत आहे.

अपीलार्थी यांची इच्छा असल्यास ते सदर आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन (६०) दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचेकडे योग्य मार्फतीने फेर अपील अर्ज सादर करु शकतात.

13/8/2025

( डॉ. महेश पाटील )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

पोशि/९३५ सचिन कांबळे, नेमणुक पो.स्टे. पोफाळी, जि. यवतमाळ.

**प्रत व मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत अपीलार्थी यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी.

E - office.

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२(१)/अपिल आदेश/पोहवा-४०८बेंद्रे + पोहवा-४९७ चव्हाण/ ५०३१ /२०२६ दिनांक 07 SEP 2026

महत्वाचे/ तात्काळ

संदर्भ:- विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अपील आदेश क्रं. अप/कक्ष-५/यवतमाळ /अपिल आदेश/पोहवा - ४०८ बेंद्रे + १/१६३८/२०२६, दि.१४/०८/२०२६.

विषय :- अपील आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते की, १) पोहवा/४०८ गिरीष बेंद्रे, नेमणुक पोलीस स्टेशन, उमरखेड २) पोहवा-४९७ अभिमन्यु चव्हाण, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर जि. यवतमाळ यांनी या कार्यालयाचे आदेश क्रं.पोअय/कक्ष-१२(१)/अं.आ./पोहवा-४०८ बेंद्रे + ४९७ चव्हाण + २४३८ पवार/I/१३९९०६/२०२६, दिनांक ०३/०२/२०२६ अन्वये दिलेल्या शिक्षेसंबंधाने अपील अर्ज सादर करण्यात आला असता, प्रत्येकी " रुपये ५००/- अधिक दंड " या शिक्षेत बदल करुन " सक्त ताकीद " ही शिक्षा देण्यात आली आहे.

त्यानुसार १) पोहवा/४०८ गिरीष बेंद्रे, नेमणुक पोलीस स्टेशन, उमरखेड २) पोहवा-४९७ अभिमन्यु चव्हाण, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर जि. यवतमाळ यांना " सक्त ताकीद " ही शिक्षा देण्यात आल्याबाबतचे अपील आदेशाची प्रत संबधीतास अदा करुन अपील आदेशाचे प्रतीवर **(पृष्ठांकन पत्रावर सही न करता)** त्यांची नावासह दिनांकीत स्वाक्षरी करुन आदेशाची दुय्यम प्रत तात्काळ कोणताही विलंब न करता या कार्यालयास सादर करण्यात यावी.

सहपत्र:- अपील आदेश

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

१) पोहवा/४०८ गिरीष बेंद्रे, नेमणुक पोलीस स्टेशन, उमरखेड.
२) पोहवा-४९७ अभिमन्यु चव्हाण, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर.

मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड/पुसद

२) सदर अपील आदेशाची मुळ प्रत संबंधिताना अदा करुन अपील आदेशाच्या दुय्यम प्रतीवर नावानिशी त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- प्र.लि. आस्था. शाखा/कक्ष-०९/कक्ष-०९-(०१)/कक्ष-१८/कक्ष-१४/नोंदणी लिपीक, पो.अ.कार्यालय यवतमाळ /पो.स्टे.उमरखेड/पुसद शहर यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीकरिता.

e- 171356

D.I. 9 AUG 2026 S.P. ... Add... Dy. S.P.H. ... O.S. ... H.C. ... Branch ... 12 ... In. No. 1051

कार्यालय, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
माल टेकडी रोड, कॅम्प एरिया, अमरावती-४४४ ६०६ ( महाराष्ट्र )
दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६, ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/
www.igpamravatirange.gov.in

क्रमांक :- अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल आदेश/पोहेकॉ ४०८ बेंद्रे+१/२०२६ 1638 अमरावती, दि. 4 AUG 2026

वाचा :- १) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र. पोअय/कक्ष-१२(१)/अपिल/पोहेकॉ/४०८ बेंद्रे+पोहेकॉ/४९७ चव्हाण/२०२६/३५९१ दि.०४.०५.२०२६

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे क्र.पोअय/कक्ष-१२(१)/अं.आ./४०८ बेंद्रे+४९७ चव्हाण+२४३८ पवार/१३९९०६/२०२६ दि.०३.०२.२०२६

३) पोहेकॉ/४०८ गिरीष बेंद्रे यांचा दि.०२.०४.२०२६ यांचा अपील अर्ज व पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण यांचा रोजीचा अपील अर्ज

****

अपीलार्थी पोहेकॉ/४०८ गिरीष बेन्द्रे, नेम., पोस्टे उमरखेड, जि. यवतमाळ व पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण नेम. पोस्टे पुसद शहर, जि.यवतमाळ येथे कार्यरत असतांना त्यांचेवर पुढीलप्रमाणे कसुरी ठेवण्यात आली आहे.

## -: कसुरी :-

अपीलार्थी पोहेकॉ/४०८ गिरीष बेन्द्रे, नेम., पोस्टे उमरखेड, व पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण नेम. पोस्टे पुसद शहर, जि.यवतमाळ दोघे पोलीस स्टेशन, पुसद (शहर) येथे कार्यरत असतांनी सदर पोलीस स्टेशन हे संवेदनशील असून पोलीस स्टेशनचे सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस स्टेशन हजर राहणे गरजेचे आहे. जेणेकरुन पोलीस स्टेशन हददीत एखादा अनुचीत प्रकार घडल्यास त्यावर तात्काळ नियंत्रण करुन परिस्थिती आटोक्यात आणने शक्य होते. तसेच वरिष्ठांकडुन मिळालेल्या महत्वाच्या सुचना पोस्टे हददीत होणारे महत्वाचे बंदोबस्त, उपोषण इ. महत्वाचे तपासाबाबत सुचना गणनेमध्ये एकत्ररित्या सर्वाना देण्यात येत असतात. सदर वेळी पोस्टे हददीत गणेशोत्सव सुरु असतांनी व पोस्टे पुसद शहर हे जातीय दृष्ट्या संवेदनशील असल्याने जास्तीत जास्त मनुष्यबळ पोलीस स्टेशनला उपस्थित राहणे गरजेचे आहे. त्यासंबंधाने आम्ही पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी असल्याने पोलीस स्टेशनचे सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना पोस्टे ला हजर राहणे तसेच गणनेमध्ये हजर दैनंदिन सकाळ व रात्र गणनेमध्ये हजर राहणेबाबत वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत.

वरील प्रमाणे महत्वाच्या सुचना देऊन सुध्दा दि.०९.०९.२०२४ रोजी १०:३० वाजता प्रभारी अधिकारी यांनी पोस्टे चे अधिकारी, अमंलदार व होमगार्ड यांची सकाळ गणना घेतली असता गणनेमध्ये पोलीस अमंलदार १) पोहेकॉ/४०८ गिरीष बेन्द्रे, २) पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण, ३) पोहवा/२४३८ बाबाराव पवर हे सर्व गैरहजर आढळून आले आहे. या सर्वाची पोलीस स्टेशन डायरी ला स्टे.क्र.१३/२०२४, दि.०९.०९.२०२४ चे ११:०१ वाजता अन्वये नोंद घेतली आहे.

वरील पोलीस अमंलदार यांना वारंवार सुचना देऊनही ते गणनेमध्ये कोणतीही पुर्वसुचना न देता गैरहजर राहीले. शिस्तब्ध अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असुन कर्तव्यात अक्ष्यम्य निष्काळजी, हलगर्जीपणा, बेजबाबदारपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरीत परिणाम इतर पोलीस अमंलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## -: कार्यवाहीचा तपशील :-

उपरोक्त कसुरीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचेकडील अंतीम आदेश दि.०३.०२.२०२६ अन्वये यातील अपीलार्थी पोहेकॉ/४०८ गिरीष बेन्द्रे व पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण यांना " प्रत्येकी रु.५००/- आर्थीक दंड " हि शिक्षा देण्यात आलेली आहे.

सदर शिक्षेविरुध्द पोहेकॉ/४०८ गिरीष बेंद्रे यांनी दि.०२.०४.२०२६ रोजी व पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी या कार्यालयास अपील अर्ज विहीत मुदतीत सादर केला असुन, सदर अपिल अर्जात त्यांनी पुढील प्रमाणे मुद्दे नमुद केले आहे.

## -:अपिलार्थीचे विवेचन:-

१. मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेश जा.क्र.पोअय/कक्ष१२(१)/अं.आ./४०८बेंद्रे+४९७ चव्हाण+२४३८ पवार /१३९९०६/२०२६, दि.०३.०२.२०२६ त्या अनुषंगाने दि.०९.०९.२०२४ रोजी सकाळी १०:३० वा चे पोस्टे पुसद शहर येथे सकाळी गणनेमध्ये कोणतेही पुर्वसुचना न देता मा.पोलीस अधीक्षक यांनी रु.५००/- आर्थिक दंडाची शिक्षा दिली आहे. मी मा. पोलीस अधीक्षक यांचेकडे खुलासा सादर केला होता. पोस्टे पुसद (शहर) येथे मागील २ वर्षापासुन बीट अमंलदार म्हणुन कामकाज करीत आहे. दि.०९.०९.२०२४ रोजी पोस्टे हददीत गणेशोत्सव साजरा केला जात होता. मी पोस्टे चे सकाळ गणना करीता येण्यासाठी निघालो असता मध्येच मला बोरी (खुर्द)येथील गणेश मंडळाचे कार्यकर्ते लाऊडस्पिकरचा आवाज वाढवितात. त्यामुळे हिंदु-मुस्लीम जातीय तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. अशी माहिती मिळाल्यावरुन मी व बिट अमंलदार पोहवा/४०८ गिरीष बेंद्रे असे दोघे लगेच बोरी (खुर्द) येथे गेलो. तेथे जावून आम्ही गावातील सर्व मंडळाच्या कार्यकर्त्यांना गावात तणाव निर्माण होईल अशी कृती न करण्याबाबत सुचना दिल्या. तसेच सर्व कार्यकर्त्यांना पोलीस स्टेशनला बोलावून पोलीस निरीक्षक उमेश बेसरकर यांचे समक्ष हजर करुन त्यांना क्र.१४९ जा.फौ. अन्वये नोटीस दिल्या. यामध्ये ११/४५ वा. त्यामध्ये बराच वेळ गेल्याने मी पोस्टे चे सकाळ गणनेत हजर राहु शकलो नाही. याबाबत मी पोलीस निरीक्षक यांना त्याच दिवशी अवगत केले होते. मी पोस्टे पुसद (शहर) येथे गोपनिय अमलदार म्हणुन कामकाज करीत असल्याने पोस्टे हददीत घडणाऱ्या घटनेवर प्रतिबंध करणे आवश्यक असते. पोस्टे पुसद (शहर) हे जातीय दृष्टया अत्यंत संवेदनशील असल्याने अशा प्रकरणामध्ये तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याने मी गणनेच्या वेळी ग्राम बोरी (खुर्द) येथे गेलो होतो. गावातील तणावाची परिस्थिती गोपनिय अमंलदार पोहवा/४९७ अभिमन्यु चव्हाण व पोहवा/४०८ गिरीष बेंद्रे यांचे मदतीने तात्काळ निवळली. मी विभागात सन-२००६ पासुन कार्यरत असुन आजपावेतो मला खात्याअंतर्गत कोणत्याही शिक्षा नाहीत. मी कर्तव्यात कोणताही हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केलेला नाही.
२. मी दि.०९.०९.२०२४ रोजी सकाळी गणनेमध्ये वरिल कारणास्तव गैरहजर राहीलो. माझ्या गैरहजेरीच्या वरिल कारणाचा सहानुभुतीपुर्वक विचार होवून माझी रु.५००/- आर्थीक दंडाची शिक्षा रदद होण्यास विनंती आहे.

**२)पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण, नेम. पो.स्टे. पुसद शहर, जि. यवतमाळ यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेले मुद्दे:**

१. दि.०९.०९.२०२४ रोजी १०:३० वाजता चे गणनेमध्ये गैरहजर राहले बाबत उपरोक्त का.दा.नो. अन्वये स्पष्टीकरण सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे. मी दि.०९.०९.२०२४ रोजीचे सकाळी १०:३० वा.चे गणनेमध्ये गैरहजर मा. पोलीस अधीक्षक यांनी रु.५००/- आर्थीक दंडाची शिक्षा दिली आहे.

२. मी पोस्टे पुसद (शहर) येथे मागील २ वर्षापासून गोपनिय अमंलदार म्हणुन कामकाज करीत आहे दि.०९.०९.२०२४ रोजी पोस्टे हददीत गणेशोत्सव साजरा केला जात होता. मी पोस्टे चे सकाळ गणना करीता येण्यासाठी निघालो असता मध्येच मला बोरी (खुर्द)येथील गणेश मंडळाचे कार्यकर्ते लाऊडस्पिकरचा आवाज वाढवितात. त्यामुळे हिंदु-मुस्लीम जातीय तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. अशी माहिती मिळाल्यावरुन मी व बिट अमंलदार पोहवा/४०८ गिरीष बेंद्रे असे दोघे लगेच बोरी (खुर्द) येथे गेलो. तेथे जावून आम्ही गावातील सर्व मंडळाच्या कार्यकर्त्यांना गावात तणाव निर्माण होईल अशी कृती न करण्याबाबत सुचना दिल्या. तसेच सर्व कार्यकर्त्यांना पोलीस स्टेशनला बोलावून पोलीस निरीक्षक उमेश बेसरकर यांचे समक्ष हजर करुन त्यांना क्र.१४९ जा.फौ. अन्वये नोटीस दिल्या. यामध्ये ११/४५ वा. त्यामध्ये बराच वेळ गेल्याने मी पोस्टे चे सकाळ गणनेत हजर राहु शकलो नाही. याबाबत मी पोलीस निरीक्षक यांना त्याच दिवशी अवगत केले होते.

मी पोस्टे पुसद (शहर) येथे गोपनिय अमंलदार म्हणुन साजरा करीत असल्याने पोस्टे हददीत घडनाऱ्या घटनेवर प्रतिबंध करणे आवश्यक असते. पोस्टे पुसद शहर हे जातीय दृष्टया अत्यंत संवेदनशील असल्याने अशा प्रकरणामध्ये तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याने मी गणनेच्या वेळी ग्राम बोरी (खुर्द) येथे गेलो होतो. गावातील तणावाची परिस्थीती बिट अमंलदार पोहवा/४०८ गिरीष बेंद्रे यांचे मदतीने तात्काळ निवळली.

२. मी दि.०९.०९.२०२४ रोजी सकाळी गणनेमध्ये वरिल कारणास्तव गैरहजर राहीलो. माझ्या गैरहजेरीच्या वरिल कारणाचा सहानुभुतीपुर्वक विचार होवून माझी रु.५००/- आर्थीक दंडाची शिक्षा रदद होण्यास विनंती आहे.

-: निष्कर्ष :-

अपिलार्थी पोहेकॉ/४०८ गिरीष बेन्द्रे, नेमणुक पोस्टे उमरखेड, व पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण, नेमणुक पो.स्टे. पुसद शहर, यांना दिनांक ०५.०८.२०२६ रोजी अपील संबंधाने समक्ष सुनावणीची संधी देण्यात आली. अपिलार्थी यांनी अपील अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यांचे व त्यावर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी सादर केलेल्या निराकरण टिप्पणीचे बारकाईने अवलोकन केले. अपिलार्थी आमचे समक्ष लेखी अभिवेदना प्रमाणे खुलासा सादर करीत आहेत. त्यांनी त्यांच्या खुलाश्या मध्ये ते बारी खुर्द या गावी गेलो होतो असे सांगत आहे. मात्र त्या बाबत ते कोणताही पुरावा देवू शकले नाहीत. त्यांचा खुलासा पुर्णतः समाधानकारक नाही. त्यांनी सादर केलेला लेखी व मौखीक खुलासा विचारात घेऊन तसेच त्यांनी केलेली कसुरी विचारात घेऊन त्यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिनांक ०३.०२.२०२६ चे आदेशान्वये दिलेल्या शिक्षेत अंशतः बदल करण्याच्या निर्ष्कषाप्रत मी आलो आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

-: अपील आदेश :-

मी, डॉ. महेश पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती याव्दारे अपिलार्थी पोहेकॉ/४०८ गिरीष बेन्द्रे व पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेली " **रु.५००/- आर्थीक दंड** " या शिक्षेऐवजी " **सक्त ताकीद** " ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर शिक्षेविरुध्द अपिल अनुज्ञेय नाही.

13.8.26

( डॉ. महेश पाटील )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

१) पोहेकॉ/४०८ गिरीष बेन्द्रे, नेम., पोस्टे उमरखेड, जि. यवतमाळ,

२) पोहेकॉ/४९७ अभिमन्यु चव्हाण, नेम. पो.स्टे. पुसद शहर, जि. यवतमाळ

**प्रत व मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत अपीलार्थी यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत याकार्यालयास सादर करावी.

E-office :-

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२(१)/पोशि-७२४ दुधे + पोशि-१२४२ इंगोले/अपिल आदेश/9032/२०२६ दिनांक - 07 SEP 2026

महत्वाचे/ तात्काळ

संदर्भ:- विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अपील आदेश क्रं. अप/कक्ष-५/ यवतमाळ/अपिल आदेश/पोशि-७२४दुधे, पोशि-१२४२ इंगोले/१६३४/२०२६, दि.१४/०८/२०२६.

विषय :- अपील आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये कळविण्यात येते की, १) पोशि/७२४ सुनिल दुधे, २) पोशि/१२४२ निखिल इंगोले दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन, दारव्हा जि. यवतमाळ यांनी या कार्यालयाचे आदेश क्रं.पोअय/कक्ष-१२(१)/अं.आ./पोशि-७२४ दुधे+पोशि-१२४२ इंगोले/२०२७/२०२५, दिनांक १२/०२/२०२५ अन्वये दिलेल्या शिक्षेसंबंधाने अपील अर्ज सादर करण्यात आला असता, "पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे" या शिक्षेत अंशतः बदल करुन "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे " ही शिक्षा देण्यात आली आहे.

त्यानुसार १) पोशि/७२४ सुनिल दुधे, २) पोशि/१२४२ निखिल इंगोले दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन, दारव्हा जि. यवतमाळ यांना "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे " ही शिक्षा देण्यात आल्याबाबतचे अपील आदेशाची प्रत संबधीतास अदा करुन अपील आदेशाचे प्रतीवर (पृष्ठांकन पत्रावर सही न करता) त्यांची नावासह दिनांकीत स्वाक्षरी करुन आदेशाची दुय्यम प्रत तात्काळ कोणताही विलंब न करता या कार्यालयास सादर करण्यात यावी.

सहपत्र:- अपील आदेश

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

१) पोशि/७२४ सुनिल दुधे,
२) पोशि/१२४२ निखिल इंगोले
दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन, दारव्हा

मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, दारव्हा.

२) सदर अपील आदेशाची मुळ प्रत संबंधिताना अदा करुन अपील आदेशाच्या दुय्यम प्रतीवर नावानिशी त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्रत :- प्र.लि. आस्था. शाखा/कक्ष-०९/कक्ष-०९-(०२)-(०३)/कक्ष-१८/कक्ष-१४/नोंदणी लिपीक, पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ/प्रभारी अधिकारी, पो. स्टे. दारव्हा यांना माहीती व योग्य त्या कार्यवाहीकरिता.

२-5171838

कार्यालय - विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
मालटेकडी रोड, कॅम्प एरिया, अमरावती-४४४ ६०६ (महाराष्ट्र)
दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६, ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/
www.igpamravatirange.gov.in

19 AUG 2026

S.P.

क्रमांक :- अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल आदेश/पोशि-७२४ दूधे, पोशि-१२४२ इंगोले/२०२६ 1634 अमरावती, दि. 14 AUG 2026

Dy. S.P.H.Q.

वाचा :- १) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पत्र क्र. पोअय/कक्ष-१२(१)/अपिल/पोशि ७२४ दुधे+पोशि १२४२ इंगोले/२०२६/३९५४ दि. १२.०५.२०२६

O.S. ..........

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे क्र.पोअय/कक्ष-१२(१)/अं.आ./७२४ दुधे+१२२४ इंगोले/२०२७/२०२५ दि.१२.०२.२०२५

H.C. ..........

३) पोकॉ/७२४ सुनिल दुधे व पोकॉ/१२४२ निखील इंगोले यांचा दि.०१.०४.२०२५ रोजीचा अपील अर्ज

Branch ..........

****

In. No. 1053 308

अपिलार्थी पोशि/७२४ सुनिल दुधे व पोशि/१२४२ निखिल इंगोले दोन्ही नेमणुक पोस्टे. दारव्हा, जि.यवतमाळ येथे कार्यरत असतांना त्यांचेवर पुढीलप्रमाणे कसुरी ठेवण्यात आली आहे.

## -: कसुरी :-

अपिलार्थी पोशि/७२४ सुनिल दुधे व पोशि/१२४२ निखिल इंगोले, पोस्टे दारव्हा, जि.यवतमाळ यांनी आर्थीक हव्यासापोटी जुगार खेळणारे व्यक्तीवर कार्यवाहीचा स्टंट केला. तसेच प्रकरण अंगलट येताच स्टे.डा. ला गुपचुप नोंद केल्याबाबतचा कसुरी अहवाल प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, दारव्हा यांनी सादर केला आहे.

दारव्हा येथील गजानन ठाकरे देशोन्नती पत्रकार यांनी प्रभारी अधिकारी यांना माहिती दिली की, पोळयाच्या करीचे दिवशी अंबिकानगर, दारव्हा येथे दारव्हा,पोलीस स्टेशन चे पोलीस दुधे व त्यांचे सोबत एक पोलीस कर्मचारी यांनी पत्ते खेळणाऱ्यांना पकडले, तसेच पत्ते खेळणाऱ्या सोबत वाद होऊन पोलीसांना मारहान केली. असे संपुर्ण गावात चर्चा आहे. त्यावर प्रभारी अधिकारी यांनी पोकॉ/१२४२ निखील इंगोले यांना प्रत्यक्ष बोलावून विचारपुस केली असता, तुम्ही आम्हाला सांगितले की, दि.०३.०९.२०२४ रोजी पोकॉ/७२४, सुनिल दुधे व स्वत:अंबिकानगर येथील सबस्टेशन परिसरातील मोकळया जागेत पत्ते खेळणाऱ्या व्यक्तींना पकडले असता, त्यांनी तुमचे सोबत वाद घालून धक्काबुक्की केली. पोलीस स्टेशनला परत येऊन स्टे.डा. नोंद केली असे सांगीतले.

यावरुन प्रभारी अधिकारी यांनी दि.०३.०९.२०२४ च्या स्टे.डा.चे अवलोकन केले असता नोंद क्र.२८/२०२४ वेळ १६:५९ वा. पोकॉ/१२४२, निखील इंगोले व पोकॉ/७२४, सुनिल दुधे तुम्ही बस स्टेशन चौक येथे हजर असतांना गुप्त बातमीदाराकडून विश्वसनिय खबर मिळाली की, काही ईसमांचा गोळका जमा करुन एक्का, बादशा नावाचा जुगार खेळ अंबिकानगर येथील बस स्टेशन परिसरात मोकळया जागेत खेळत आहे. अपिलार्थी यांनी खाजगी वाहनाने जाऊन दोन पंचासह त्यांच्यावर रेड केली असता, ते इसम तुम्हाला पाहुन पळून गेले त्यानंतर पुढील इसम परत आले व त्याने तुमच्याशी हुज्जतबाजी केली की, तुम्ही आज कसे काय आले? आज कर आहे. आम्हाला खेळू द्या. तुमचे कुठले पोलीस आहे? पोलीस असेल तर काय करता? असे म्हणून तुमच्याशी वाद केला व तेथून पळून गेले. त्यांची चौकशी केली असता त्यांचे नाव १) निलेश अशोकराव ढोके, २) शंकर राठोड, ३) उत्तम जाधव, ४) शुभम आढवले, ५) रवी इंगळे अशी नोंद आढळून आली.

वास्तविक पाहता प्रभारी अधिकारी, मुख्यालय येथे हजर असतांना या घडलेल्या घटनेबाबत सर्व प्रथम ठाणेदार या नात्याने प्रभारी अधिकारी, पोस्टे दारव्हा यांना माहिती देणे बंधनकारक असतांना हि प्रभारी अधिकारी यांचेपासून लपवून ठेवली. तसेच गुपचुप स्टेशन डायरीला नोंद केली. स्टेशन डायरी नोंदी मध्ये पंचासह रेड केल्याचे नमुद आहे. पोलीस शिपाई या नात्याने त्यांना रेड करण्याचे अधिकार नाहीत. दि.०३.०९.२०२४ चे डयुटी रजिस्टर ची प्रभारी अधिकारी यांनी पाहणी केली असता त्या दिवशी पोकॉ/१२४२ निखील इंगोले यांची गजानन मंदीर येथे फिक्स पॉईट डयुटी होती. आपली फिक्स पॉईट सोडून प्रभारी अधिकारी अथवा इतर दुय्यम अधिकारी तसेच डयुटी ऑफिसर यांना देखील माहिती न देता हि माहिती लपवून ठेवली. यावरुन उपरोक्त दोन्ही कर्मचारी यांनी आर्थिक हव्यासापोटी जुगार खेळणारेवर कार्यवाहीचा स्टंट केला आहे. व प्रकरण अंगलट येताच स्टे.डा. गुपचुप नोंद केली. त्याच्या या बेशिस्त वर्तनामुळे दारव्हा शहरात पोलीसांची प्रतिमा मलीन झाली आहे.

## -: कार्यवाहीचा तपशील :-

उपरोक्त कसुरीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचेकडील अंतीम आदेश दि.१२.०२.२०२५ अन्वये यातील अपीलार्थी पोशि/७२४ सुनिल दुधे व पोशि/१२४२ निखिल इंगोले यांना **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे "** हि शिक्षा देण्यात आलेली आहे.

सदर शिक्षेविरुध्द पोशि/७२४ सुनिल दुधे, व पोशि/१२४२ निखिल इंगोले यांनी या कार्यालयास दि.०१.०४.२०२५ अन्वये अपिल अर्ज विहीत मुदतीत सादर केला असुन, सदर अपिल अर्जात त्यांनी पुढील प्रमाणे मुद्दे नमुद केले आहे.

## -:अपिलार्थीचे विवेचन:-

**१)पोशि/७२४ सुनिल दुधे, नेमणुक पोस्टे दारव्हा जि. यवतमाळ यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेले मुद्दे-**

१. आम्ही सध्या पोलीस स्टेशन दारव्हा येथे पोलीस स्टेशन येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत आहे. फेब्रुवारी-२०२४ पासून दारव्हा शहरात बीट रायटर म्हणून पोलीस निरीक्षक, पोस्टे दारव्हा यांचे आदेशाने कामकाज करत होतो. वर नमुद संदर्भान्वये कारणे दाखवा नोटीस पोलीस स्टेशन दारव्हा आवक क्र.१४७/२०२५ दि.१०.०१.२०२५ अन्वये ची नोटीस दि.१७.०१.२०२५ रोजी आम्हाला बजावण्यात आली आहे.

२. सदर कारणे दाखवा नोटीसचे अवलोकन केले असता, तुम्ही दोघे दि.०३.०९.२०२४ रोजी अंबिकानगर येथील सबस्टेशन परिसरातील मोकळया जागेत खेळणाऱ्यांवर या दोन्ही पोलीस अंमलदार यांनी आर्थिक हव्यासापोटी कार्यवाहीचा स्टंट केला. तसेच प्रकरण अंगलट येताच स्टे.डा. ला नोंद केली असल्याबाबतचा विविध मजकुर नमुद आहे.

३. आम्ही खालील प्रमाणे खुलासा सादर करत आहोत. दि.०३.०९.२०२४ रोजी आम्ही व सोबत पोकॉ/१२४२, निखील इंगोले असे बस स्टॅण्ड चौकात हजर असतांना गोपनिय बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली की, अंबिकानगर, सबस्टेशन परिसरात दारव्हा येथील मोकळया जागेत काही ईसम जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. त्याबाबत आम्ही बिट जमादार पोहेकॉ/३८६, सुनिल राठोड पोस्टे दारव्हा यांना माहिती दिली. त्यानंतर आम्ही दोघेजन व बसस्टॅण्ड चौक दारव्हा येथे हजर असलेले दोन प्रतिष्ठीत ईसम यांना घटनेची थोडक्यात माहिती देऊन त्यांना पंच म्हणून सोबत चालण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी संमती दिल्याने आम्ही स्वत: तसेच पोकॉ/१२४२ इंगोले व पंच नामे १)रामा पायरोजी बोरकर वय ३५ वर्ष रा. भाग्योदय कॉलनी, दारव्हा ता. दारव्हा, २)वैभव दिनेश निमकर वय २६ वर्ष रा. दुर्गा चौक दारव्हा ता. दारव्हा जि.यवतमाळ यांचेसह खाजगी वाहनाने अंबिकानगर यांचेसह लपत छपत जाऊन पाहणी केली असता, त्याठिकाणी काही ईसम बसलेले होते. त्यामधील काही ईसमांनी आम्हाला पाहिल्यामुळे ते तेथून पळून गेले. त्यांचा आम्ही व इंगोले यांनी पाठलाग केला परंतू ते मिळून आले नाही. काही अनोळखी ईसम परत आले व ते आम्हाला म्हणाले तुम्ही कोण आहे असे म्हणून हुज्जत घातली. तुम्ही इकडे कसे काय आले याबाबत विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) निलेश अशोकराव ढोके, २) शंकर राठोड, ३) उत्तम जाधव, ४) शुभम आठवले ५) रवि इंगळे सर्व रा. दारव्हा असे होते. परंतू हेच इसम जुगार खेळत होते याबाबत साशंकता असल्यामुळे त्यांचेवर जुगार कायद्याअंतर्गत कारवाई करता आली नाही. जेणेकरुन त्यांचेवर खोटा गुन्हा दाखल होवुन त्यांचे भविष्य खराब होण्याची शक्यता होती. त्यामुळे पोलीसांची जनमाणसात प्रतिमा मलीन झाली असती. जुगार खेळणारे ईसम मिळून न आल्यामुळे आम्ही पोलीस स्टेशनला परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक कुलकर्णी (ठाणेदार) पोस्टे दारव्हा हे कॅबिनला हजर नव्हते म्हणून त्यावेळी घटनेची माहिती दिली नाही. व काही वेळाने सांगण्याचे अनावधाने विसरुन गेलो होतो. परंतू सदर घटनेबाबत आम्ही रितसर कायदेशिरपणे पोलीस स्टेशनला परत येऊन दि.०३.०९.२०२४ रोजी स्टेडा नोंद क्र.२८/२०२४ वेळ १६:५९ वा. प्रमाणे स्टेशन डायरीला घडलेल्या घटनेबाबत नोंद केली आहे. सदरचे प्रकरण अंगलट येईल म्हणून आम्ही गुपचूप नोंद केली नाही. जर तसे असते तर आम्ही स्टेशन डायरीला नोंद करण्याची गरजच नव्हती. आम्हाला आर्थिक स्वरुप प्राप्त नव्हता. त्यामुळे आम्ही पोस्टाफ असे वर नमुद पंचांन सोबत कायदेशिर प्रचलित कायद्यान्वये कारवाई करण्याकरीता गेलो होतो. अचानक मिळालेल्या माहितीवरुन आम्ही तात्काळ घटनास्थळी गेलो होतो. अनावधानाने सदर गोपनिय माहिती मा. ठाणेदार साहेब किंवा इतर दुय्यम अधिकारी यांना देऊ शकलो नाही. तसेच कारणे दाखवा नोटीस मधील मजकुर मध्ये नमूद आहे की, पोलीस शिपाई यांना रेड करण्याचे अधिकार नाही. परंतू महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१ चे कलम २(४)अन्वये कनिष्ठ दर्जाचा पोलीस अधिकारी असा अधिकारी प्रदान करण्यात आला आहे.

४. सदर प्रकरणात आम्ही कायदेशिर पंचासह कारवाई करण्याकरिता लपतछपत घरांचा आडोसा घेऊन रेड करण्यासाठी गेलो होतो. परंतू सदर जुगार खेळणारे ईसम आम्हा पोलीस स्टाफ व पंचांना पाहून ते घटनास्थळावरुन पळून गेले. त्यांचा आम्ही पाठलाग केला परंतू ते गावात लोकांच्या घरांचा सहारा घेत कोठेतरी लपून बसले ते मिळून आले नाही. आम्ही कोणत्याही प्रकारचे पोलीसांची जनमाणसात प्रतिमा मलीन होईल असे बेशिस्त व अशोभनिय कृत्य केले नाही.

५. तरी आम्हाला पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कार्यालयीन संदर्भ क्र. पोअय/कक्ष-१२(१)/कादानो/पोकॉ ७२४ दुधे+१२४२ इंगोले/२२४/२५, दि.०३.०१.२०२५ कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाल्याने आम्ही पोलीस अधीक्षक यांना खुलासा सादर केला. आशांकित कक्षात हजर राहण्याबाबत आदेशित केल्याने त्याप्रमाणे हजर झाले. त्यांना सगळी माहिती दिली. पोलीस अधीक्षक यांनी काहीही न ऐकता " पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे " ही अंतीम आदेशाव्दारे शिक्षा देण्यात आली आहे.

६. तरी महोदय, आम्हाला बजावण्यात आलेली अंतीम आदेशा मधील शिक्षेमुळे आमचे नोकरीवर परिणाम होवून भविष्य खराब होवून मोठया प्रमाणात आर्थीक नुकसान होवून कुटुंब अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आम्हाला पारित करण्यात आलेल्या अंतीम आदेशाचा सहानुभूतीपूर्वक शिक्षा माफ करण्यात यावी.

**२)पोशि/१२४२ निखिल इंगोले, नेमणुक पोस्टे दारव्हा जि. यवतमाळ यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेले मुद्दे**

१. आम्ही सध्या पोलीस स्टेशन दारव्हा येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत आहे. फेब्रुवारी-२०२४ पासून दारव्हा शहरात बीट रायटर म्हणून पोलीस निरीक्षक, पोस्टे दारव्हा यांचे आदेशाने कामकाज करत होतो. वर नमुद संदर्भान्वये पोलीस अधीक्षक साहेब यवतमाळ यांनी आम्हाला मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल ) नियम १९५६ मधील नियम ३(२)(२) मधील तरतुदीनुसार " पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे ही शिक्षा देण्यात आली आहे.

२. आम्ही पोलीस अंमलदार खालील प्रमाणे घटनेसंबधाने अपिल करत आहोत की, दि.०३.०९.२०२४ रोजी आम्ही व सोबत पोकॉ/७२४ सुनिल दुधे पोस्टे दारव्हा असे बस स्टॅण्ड चौकात हजर असतांना गोपनिय बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळली की, अंबिकानगर, सबस्टेशन परिसरात दारव्हा येथील मोकळया जागेत काही ईसम जुगार खेळत असल्याची माहिती दिली होती. व त्यानंतर आम्ही दोघेजन व बसस्टॅण्ड चौक दारव्हा येथे हजर असलेले दोन प्रतिष्ठीत ईसम यांना घटनेची थोडक्यात माहिती देऊन त्यांना पंच म्हणून सोबत चालण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी संमती दिल्याने आम्ही स्वत: तसेच पोकॉ/१२४२ इंगोले व पंच नामे १) रामा पायरोजी बोरकर वय ३५ वर्ष रा. भाग्योदय कॉलनी, दारव्हा ता. दारव्हा, २) वैभव दिनेश निमकर वय २६ वर्ष रा. दुर्गा चौक दारव्हा ता.दारव्हा जि.यवतमाळ यांचेसह खाजगी वाहनाने अंबिकानगर येथे लपत छपत जाऊन पाहणी केली असता, त्याठिकाणी काही इसम बसलेले होते. त्यामधील काही इसमांनी आम्हाला पाहिल्यामुळे ते तेथून पळून गेले. त्यांचा आम्ही व इंगोले यांनी पाठलाग केला परंतू ते मिळून आले नाही. काही अनोळखी इसम परत आले व ते आम्हाला म्हणाले तुम्ही कोण आहे असे म्हणून हुज्जत घातली. तुम्ही इकडे कसे काय आले याबाबत विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) निलेश अशोकराव ढोके, २) शंकर राठोड, ३) उत्तम जाधव, ४) शुभम आठवले, ५) रवि इंगळे सर्व रा. दारव्हा असे होते. परंतू हेच इसम जुगार खेळत होते याबाबत साशंकता असल्यामुळे त्यांचेवर जुगार कायद्याअंतर्गत कारवाई करता आली नाही. जेणेकरुन त्यांचेवर खोटा गुन्हा दाखल होवुन त्यांचे भविष्य खराब होण्याची शक्यता होती. त्यामुळे पोलीसांची जनमाणसात प्रतिमा मलीन झाली असती. जुगार खेळणारे ईसम मिळून आल्यामुळे आम्ही पोलीस स्टेशनला परत आलो. त्यावेळी पोलीस निरीक्षक कुलकर्णी (ठाणेदार) पोस्टे दारव्हा हे कॅबिनला हजर नव्हते म्हणून त्यावेळी घटनेची माहिती दिली नाही. व काही वेळाने सांगण्याचे अनावधाने विसरुन गेलो होतो. परंतू सदर घटनेबाबत आम्ही रितसर कायदेशिरपणे पोलीस स्टेशनला परत येऊन दि.०३.०९.२०२४ रोजी स्टेडा नोंद क्र.२८/२०२४ वेळ १६:५९ वा. प्रमाणे स्टेशन डायरीला घडलेल्या घटनेबाबत नोंद केली आहे. सदरचे प्रकरण अंगलट येईल म्हणून आम्ही गुपचूप नोंद केली नाही. जर तसे असते तर आम्ही स्टेशन डायरीला नोंद करण्याची गरजच नव्हती. आम्हाला आर्थिक स्वरुप प्राप्त नव्हता. त्यामुळे आम्ही पोस्टाफ असे वर नमुद पंचांन सोबत कायदेशिर प्रचलित कायद्यान्वये कारवाई करण्याकरीता गेलो होतो. अचानक मिळालेल्या माहितीवरुन आम्ही तात्काळ घटनास्थळी गेलो होतो. अनावधानाने सदर गोपनिय माहिती ठाणेदार साहेब किंवा इतर दुय्यम अधिकारी यांना देऊ शकलो नाही. तसेच कारणे दाखवा नोटीस मधील मजकुर मध्ये नमूद आहे की, पोलीस शिपाई यांना रेड करण्याचे अधिकार नाही. परंतू महाराष्ट्र पोलीस कायदा-१९५१ चे कलम २(४)अन्वये कनिष्ठ दर्जाचा पोलीस अधिकारी असा अधिकारी प्रदान करण्यात आला आहे.

३. सदर प्रकरणात आम्ही कायदेशिर पंचासह कारवाई करण्याकरिता लपतछपत घरांचा आडोसा घेऊन रेड करण्यासाठी गेलो होतो. परंतू सदर जुगार खेळणारे ईसम आम्हा पोलीस स्टाफ व पंचांना पाहून ते घटनास्थळावरुन पळून गेले. त्यांचा आम्ही पाठलाग केला परंतू ते गावात लोकांच्या घरांचा सहारा घेत कोठेतरी लपून बसले ते मिळून आले नाही. आम्ही कोणत्याही प्रकारचे पोलीसांची जनमाणसात प्रतिमा मलीन होईल असे बेशिस्त व अशोभनिय कृत्य केले नाही.

४. तरी आम्हाला मा.पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कार्यालयीन संदर्भ क्र. पोअय/कक्ष-१२(१)/कादानो/पोकॉ ७२४ दुधे+१२४२ इंगोले/२२४/२५, दि.०३.०१.२०२५ कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाल्याने आम्ही पोलीस अधीक्षक यांना खुलासा सादर केला. त्या अनुषंगाने आम्हाला प्रकरणाबाबत आज्ञांकित कक्षामध्ये हजर राहण्याबाबत आदेशित केल्याने आम्ही हजर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे आज्ञांकित कक्षामध्ये हजर राहून घटनेची ईत्भूत माहिती सांगण्यात आली परंतु पोलीस अधीक्षक यांनी आमचे काहीही न ऐकता आम्हाला मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील नियम ३(२)(५) मधील तरतुदींनुसार "पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे " ही अंतीम आदेशाव्दारे शिक्षा देण्यात आली आहे.

## -: निष्कर्ष :-

अपिलार्थी पोशि/७२४ सुनिल दुधे व पोशि/१२४२ निखिल इंगोले, नेमणुक पोस्टे. दारव्हा, जि.यवतमाळ यांना दिनांक ०५.०८.२०२६ रोजी अपील संबंधाने समक्ष सुनावणीची संधी देण्यात आली. अपिलार्थी यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यांचे व त्यावर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी सादर केलेल्या निराकरण टिप्पणीचे बारकाईने अवलोकन केले. अपिलार्थी लेखी खुलाश्या प्रमाणे मौखीक खुलासा करीत आहेत. सदर दोन्ही कर्मचाऱ्यांचा खुलासा समाधानकारक नाही. त्यांनी सादर केलेला खुलासा व त्यांचे कसुरीचा विचार करुन त्यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिनांक १२.०५.२०२५ चे आदेशान्वये दिलेल्या शिक्षेत अंशत: बदल करण्याच्या निर्ष्कषाप्रत मी आलो आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## -: अपील आदेश :-

मी, डॉ. महेश पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती याव्दारे अपिलार्थी पोशि/७२४ सुनिल दुधे व पोशि/१२४२ निखिल इंगोले यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी दिलेली " पुढील देय वार्षीक वेतनवाढ दोन (०२) **वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे** " या शिक्षेऐवजी " **पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे** " ही शिक्षा देण्यात येत आहे.

अपीलार्थी यांची इच्छा असल्यास ते सदर आदेश प्राप्त झाल्याचे दिनांकापासुन (६०) दिवसाचे आत मा. पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचेकडे योग्य मार्फतीने फेर अपील अर्ज सादर करु शकतात.

13/8/26

( डॉ. महेश पाटील )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

१)पोशि/७२४ सुनिल दुधे, २)पोशि/१२४२ निखिल इंगोले, दोन्ही नेमणुक पोस्टे. दारव्हा, जि.यवतमाळ

**प्रत व मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत अपीलार्थी यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत याकार्यालयास सादर करावी.

| | | |
|---|---|---|
| | पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.<br>एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.<br>पिन कोड : ४४५ ००१.<br>Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in | |
| क्र. पोअय/कक्ष -१२/वि.चौ/कसुरी/पोउपनि-संतोष भट/आदेश/ ८४ /२०२६ | | दिनांक - 10 SEP 2026 |

## अंतिम आदेश

**अधिकाऱ्याचे नाव:-** पोउपनि/ संतोष भट, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर, जि. यवतमाळ.

**संदर्भ :-** कारणे दाखवा नोटीस क्रं. पोअय/कक्ष-१२/पोउपनि-संतोष भट/कसुरी कादानो/५५८९/२०२६, दिनांक २५/०६/२०२६.

**थोडक्यात कसुरी :-** कर्तव्यावर गैरहजर राहणे तसेच गुन्हे तपासावर प्रलंबित असतांना निकाली निघाल्याचे भासवुन खालीलप्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

----oooo----

कसुरी,

पो.उप.नि. संतोष भाट, तुम्ही पो.स्टे. यवतमाळ शहर येथे नेमणुकीस असुन दिनांक ०१/०२/२०२६ रोजी पासुन पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथुन कुठलीही पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर आहे. प्रभारी अधिकारी यांनी तुमचे ऑनलाईन रजेबाबत माहीती घेतली असता असे दिसुन आले की, तुम्ही दिनांक २०/०१/२०२६ रोजी ऑनलाईन अर्ज केला की, दिनांक ०३/०२/२०२६ ते दिनांक २८/०२/२०२६ रोजी पर्यंत स्वताचे लग्न असल्याने २६ दिवस अर्जित रजाची मागणी केली असता आम्ही सदरची रजा नामंजुर केली होती. त्यानंतर तुम्ही पुर्नश्च दिनांक २७/०१/२०२६ रोजी दिनांक ०३/०२/२०२६ ते दिनांक १७/०२/२०२६ रोजी पर्यंत स्वताचे लग्न असल्याचे १५ दिवस अर्जित रजाची मागणी केली असता आम्ही सदरची रजा नामंजुर केली असतांना सुद्धा तुम्ही कर्तव्यावरुन दिनांक ०१/०२/२०२६ रोजीपासुन कुठलीही पुर्व सुचना न देता अनाधिकृतपणे गैरहजर आहात.

तसेच पो.उप.नि. संतोष भाट, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर तुम्ही तुमचे परिविक्षाधीन कालावधीमध्ये सुद्धा दिनांक १९/०३/२०२५ ते दिनांक २८/०४/२०२५ पर्यंत सिकवर होते. त्यामुळे तुमचा प्रशिक्षण परिविक्षाधीन कालावधी ४१ दिवस पुढे वाढविण्यात आला होता.

पो.उप.नि. संतोष भाट, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर तुमचेकडे मेन लाईन बिटचे बिट अधिकारी म्हणुन कर्तव्य देण्यात आले असतांना तुम्हाला खालीलप्रमाणे गुन्हे तपासाकरिता देण्यात आले होते.

| अ.क्रं. | अपराध क्रमांक व कलम | दोषारोपपत्र क्रमांक |
|---|---|---|
| १ | १९०/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं. १७३/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| २ | २४७/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं.१७२/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| ३ | २५१/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं.१७९/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |

| | | |
|---|---|---|
| ५ | २५३/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं. १७६/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| ६ | २५४/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं.१७४/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| ७ | २५५/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं.१६२/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| ८ | २५६/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं. १६२/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| ९ | २५७/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं.१६७/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| १० | २५९/२०२५ कलम २८५ भा.न्या.स. | दोषा.क्रं. १७७/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| ११ | २८७/२०२५ कलम ६, २४ COTPA Act. | दोषा.क्रं.१४९/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| १२ | २८६/२०२५ कलम ६, २४ COTPA Act. | दोषा.क्रं.१५५/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| १३ | २९१/२०२५ कलम ६, २४ COTPA Act. | दोषा.क्रं.१५८/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| १४ | २९४/२०२५ कलम ६, २४ COTPA Act. | दोषा.क्रं.१५७/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| १५ | २९५/२०२५ कलम ६, २४ COTPA Act. | दोषा.क्रं.१५६/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |
| १६ | २९६/२०२५ कलम १८४,१८५ M.V. Act. | दोषा.क्रं.२४३/२०२५, दिनांक २९/०५/२०२५ |
| १७ | २९८/२०२५ कलम ६, २४ COTPA Act. | दोषा.क्रं.१५३/२०२५, दिनांक ०३/०३/२०२५ |

पो.उप.नि. संतोष भाट, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर तुमचेकडे वरिल प्रमाणे गुन्हे तपासावर असतांना तुम्ही वरिल प्रमाणे दोषारोप क्रमांक घेउन गुन्हयाची निर्गती केली असल्याचे सांगुन गुन्हे रेकॉर्डवरुन कमी करुन घेतले. प्रभारी अधिकारी यांनी क्राईम शाखेमधुन मा. न्यायालयातुन प्राप्त CC.No. चा आढावा घेतला असता वरिल गुन्हयामध्ये अद्यापपर्यंत CC.No. प्राप्त नसल्याचे निदर्शनास आले. यावरुन प्रभारी अधिकारी यांनी कोर्ट मोहरर पोहेकॉ १६२ अनिल भगत यांना वरिल गुन्हयाचे CC.No. बाबत विचारपुस केली असता त्यांनी माहीती दिली की, वरिल गुन्हे हे तुम्ही अद्यापर्यंत मा. न्यायालयात दाखल केले नाही. त्यामुळे सदर गुन्हयामध्ये CC.No. प्राप्त झालेले नाही असे बयाणामध्ये सांगितले.

पो.उप.नि. संतोष भाट, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर तुम्ही सन २०२५ पासुन सदरचे गुन्हे हे निर्गती केल्याचे दाखवुन प्रभारी अधिकारी यांची तसेच वरिष्ठांची दिशाभुल केलेली असुन गुन्हयामधील आरोपी यांना निर्दोष सुटण्याकरिता एका प्रकारचे सहाय्य केले आहे. सदर गुन्हे हे भाग ६ इतर या हेड खालील असुन सदर गुन्हयाची निर्गती ही ६० दिवसामध्ये पुर्ण करणे गरजेचे असतांना सुद्धा तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करुन अद्यापर्यंत सदर गुन्हे तुमचेकडे प्रलंबित ठेवलेले आहेत. यावरुन तुम्हाला पोलीस विभागातील कर्तव्यामध्ये कुठलीही गांभिर्यता नसल्याचे दिसुन येत असुन तुम्ही तुमचे कर्तव्यमध्ये गंभिर स्वरुपाची कसुरी केली आहे तसेच कर्तव्यामध्ये बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा, आदेशाची अवहेलना, वरिष्ठांची दिशाभुल करणे असे कृत्य करीत असल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त प्रकरणी उपविभागयी पोलीस अधिकारी यवतमाळ यांनी त्यांचे अहवाल क्रं. २२२२/२०२६, दिनांक २८/०५/२०२६ अन्वये कसुरी अहवाल या कार्यालयास सादर केला असुन सदर अहवालानुसार शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात तपासी अधिकारी म्हणुन नेमुन दिलेल्या कायदयाचे व नियमांचे उल्लंघन करुन तुम्ही उपरोक्त प्रमाणे विहीत मुदतीत तपास पुर्ण करुन दोषारोपत्र न्यायप्रविष्ठ करणे आवश्यक होते. परंतु तुम्ही तुमचे कर्तव्यात बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येतं. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस अधिकारी यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस तसेच प्रशासकीय कामकाज करण्याचे कार्यप्रणालीवर बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/पोउपनि-संतोष भट/कसुरी कादानो/५५८९/२०२६, दिनांक २५/०६/२०२६ अन्वये "पुढील देय वार्षिक वेतनवाढ तिन (०३) वर्षाकरिता (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा का देण्यात येवु नये ?" याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आले. सदर कारणे

दाखवा नोटीसचे अनुषंगाने तुम्ही दिनांक २७/०८/२०२६ ला स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केल्याने तुम्हाला दिनांक ०१/०९/२०२६ रोजी आज्ञांकीत कक्षामध्येब बोलविण्यात आले असता, तुम्ही आज्ञांकीत कक्षामध्ये हजर झाले. तसेच तुम्ही सादर केलेल्य स्पष्टीकरणामध्ये सदर गुन्हयाचे तपासामध्ये त्रुटी असल्याने सदर गुन्हे अदयापही न्यायप्रविष्ठ करण्यात आलेले नाही. तसेच तुम्ही दिनांक १२/०२/२०२६ ते २३/०७/२०२६ पावेतो एकुण १६० दिवस कर्तव्यावर अनधिकृत गैरहजर असल्याने तुमचा सदरचा कालावधी हा दिनांक २४/०७/२०२६ चे आदेशान्वये विनावेतन करण्यात आला आहे. तरी तुम्हाला सुधरण्याची संधी म्हणुन प्रस्तावित करण्यात आलेली शिक्षा कमी करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

**पोउपनि/ संतोष भट, नेमणुक पो.स्टे. यवतमाळ शहर, जि. यवतमाळ यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरिता (अपरिणामकारक) रोखणे" ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे **६०** दिवसाचे आंत अपील करु शकतात.

(कुमार चिंता)
**पोलीस अधिक्षक,यवतमाळ**

प्रति,

पोउपनि/संतोष भाट,
**नेमणुक पोलीस स्टेशन यवतमाळ शहर.**

**मार्फतः- उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ.**

२/- सदर आदेशाची छायांकीत प्रत संबंधीतास अदा करुन, सदर आदेशाच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन, ती दिनांकीत स्वाक्षरीची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास सादर करावी.

**प्रत :- प्रभारी अधिकारी पो.स्टे. यवतमाळ शहर/कक्ष-१०/कक्ष-१७/कक्ष-१४ यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.**

**प्रत :- कक्ष-१०** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अधिकारी यांचे सेवापुस्तकात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छायांकीत प्रत या शाखेस सादर करावी.

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२/वि.चौ/कसुरी/पोनि-अहेरकर/आदेश/ ९१७ /२०२६ दिनांक - 10 SEP 2026

## आदेश

**अधिकाऱ्याचे नाव :- पोनि/पुरूषोत्तम अहेरकर, तत्का.नेमणुक पो.स्टे. पुसद शहर, जिल्हा यवतमाळ.**

**संदर्भ :-** कारणे दाखवा नोटीस क्र पोअय /कक्ष-१२/पोनि/पुरूषोत्तम अहेरकर /कसुरी/ज्ञापन/८०८२/२०२६ दिनांक १२/०८/२०२६

**थोडक्यात कसुरी :-** प्रतिबंधात्मक कार्यवाही न करुन खालील प्रमाणे कसुरी केल्याबाबत.

---ooo---

पो.नि. पुरुषोत्तम अहेरकर, तुम्ही प्रभारी अधिकारी म्हणुन पोलीस स्टेशन पुसद शहर येथे कार्यरत असुन तुम्हाला उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांनी घेत असलेल्या मिटींगमध्ये दारुबंदी, जुगार कायद्यान्वये प्रभावी रेड कार्यवाही करुन पो.स्टे. परिसरातील अवैद्य धंदे समुळ नष्ट करणे, पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधक कार्यवाही करणे बाबत वारंवार सुचित केले आहे. तरी सुध्दा तुमचे पोलीस स्टेशन कडुन अत्यंत मोघम व कमी स्वरुपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

पो.नि. पुरुषोत्तम अहेरकर, तुमचे कसुरी बाबतचे विवरण खालील प्रमाणे नमुद आहे.

१) उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांनी दि.२९/०७/२०२६ रोजी पुसद उपविभागातील सर्व प्रभारी अधिकारी यांची मिटींग घेवुन आपआपले पोलीस स्टेशन परिसरातील संपुर्ण अवैध धंदे समुळ नष्ट करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे बाबात सुचीत केले तेव्हा तुम्ही उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांना म्हटले की, "वरिष्ठ अधिकाऱ्यांना व पो.स्टे चे कामकाज सुरळीत ठेवण्याकरीता काही अवैध धंदे चालु राहणे आवश्यक आहे" असे बोलले तुमचे सदरचे वक्तव्य हे बेकायदेशीर असुन अवैध धंदे सुरु ठेवण्यास खतपाणी घालणारे असल्यचे दिसुन येत आहे.

२) दि.३१/०७/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांचे अधिनस्त पथकाने पो.स्टे पुसद शहर हद्दीमधील व पो.स्टे पुसद शहरा जवळ असलेल्या आठवडी बाजार या ठिकाणी मोठया प्रमाणावर जुगार खेळ खेळविणारे व खेळणारे याचेवर रेड कार्यवही करून आरोपी नामे आबिद अली शेख सौबत अली शेख, वय ३४ वर्ष, रा. उदयपुर, जि.सिध्दार्थ नगर, उत्तरप्रदेश. ह.मु पुसद +०५ ईसम यांचेवर रेड कार्यवाही केली त्यांचेकडुन ९७२०/- रु रोख, संगणक व ईतर साहित्य १,३४,५००/-रु. चा असा एकुण १,४४,२२०/- चा मुद्देमाल जप्त करून फिर्याद नोंद करून अप क्र ६९९/२०२६ कलम ४,५ म.जु.का सहकलम ४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला यावरुन तुम्हाला पो.स्टे भेटीमध्ये व उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांचेकडुन घेण्यात येणाऱ्या मिटींगमध्ये वारंवार सुचित करुन सुध्दा तुम्ही अवैध धंदे चालु ठेवल्याचे आढळुन आले आहे.

३) दि.०३/०८/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांनी पो.स्टे पुसद शहर येथे भेटीमध्ये दप्तर तपासणी घेवुन याआधी त्यांनी पो.स्टे भेटीमध्ये देण्यात आलेल्या गंभीर गुहयांच्या लेखी सुचनांची पुर्तता केली नसल्याचे आढळुन आले. तसेच तुम्ही पो.स्टे प्रभारी अधिकारी या नात्याने तपासी अधिकारी /अंमलदार यांना स्वलिखीत सुचणा देणे अपेक्षित असंताना तुम्ही काहीही सुचना दिल्याचे दिसुन आले नाही. यावरुन सदर तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे उल्लंघन करित असल्याचे दिसुन येत आहे.

४) दि. ०३/०८/२०२६ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद पुसद यांनी भेटुन त्यांचे प्राधिकृत प्रशासकीय अधिकारी हे गुन्हा दाखल करण्यास पो.स्टे पुसद शहर ला आले असता, त्यांनाच तुम्ही धमकावले, त्यांनी दिलेली तक्रार नोंद करून घेतली नाही.

तुमचेकडुन सदर तक्रार बाबत वरिष्ट अधिकारी यांना कळविणे आवश्यक असताना सुध्दा वरिष्ठ अधिकारी यांना तक्रार बाबत काहीही सांगितले नाही. तुमचे वर्तनाबाबत नगर परिषद पुसद यांनी मा.जिल्हाधिकरी यवतमाळ यांना तक्रार अर्ज केला आहे. आगामी सण, उत्सव काळात शहरामध्ये कायदा व सुव्यवस्था अबधित राखण्याचा उद्देशाने नगर परिषदेचे सहकार्य मोलाचे असणार आहे. परंतु तुम्ही अशाप्रकारे संबंध बिघडविण्याचे कृत्य केल्याचे दिसुन येत आहे. नगर परीषद पुसद यांचेकडुन प्राप्त झालेल्या तक्रारीची माहिती आम्हास देणे बंधनकारक असतांना सुध्दा माहिती दिली नाही. नगर परिषदेचे प्राधिकारी हे पो.स्टे ला येऊन सुध्दा त्यांची तक्रार नोदवुन घेतली नाही. पुसद शहर हे अतिसंवेदनशिल शहर असुन तुम्ही इतर विभागातील अधिकारी यांचेशी उध्दटपणाचे वर्तन करित असल्याचे दिसुन येत आहे.

५) दि.०३/०८/२०२६ रोजी तुम्ही अनुपस्थित असंताना सपोनि/ गजानन करेवाड, नेमणुक पो.स्टे पुसद शहर यांना पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदयांचे गोपणीय माहिती देवुन तेथे रेड करण्यास सांगितले असता, सपोनि/करेवाड नी सांगितले की, "पो.स्टे प्रभारी अधिकारी यांना विचारुन रेड करतो, ते रागऊ शकतील" असे बोलले यावरून तुम्ही पो.स्टे चे अधिकारी यांना अवैध धंदे समुळ नष्ट करण्याच्या वरिष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे बाबत सुचित करीत असल्याचे दिसुन येत आहे.

६) आम्ही plea bargaining बाबत सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना गुन्हे सभेमध्ये, व्ही.सी मध्ये वारंवार सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार आम्ही, तुम्हाला सदर बाबत विचारणा केली असता, तुम्ही कोणत्याही केस ची पाहणी केली नसल्याचे व कोणत्याही केसेस निवडल्या नसल्याचे सांगितले. यावरून तुम्ही वरीष्टांनी दिलेले आदेश, सुचना याकडे पुर्णतः दुर्लक्ष करुन वरिष्टांनी दिलेल्या आदेशास जुमानत नसल्याचे दिसुन येत आहे.

७) तुम्ही उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांना भेटुन बोलले की, "आमची पो.स्टे पुसद शहर येथे काम करण्याची इच्छा नाही, काही झाले तरी मी या पो.स्टे ला काम करत नाही" असे बोलले.

पोनि/ पुरुषोत्तम अहेरकर तुम्ही पोलीस निरीक्षक या महत्त्वाच्या व जबाबदारीच्या पदावर कार्यरत असंताना व पो.स्टे पुसद शहर या जातीयदृष्टया अतिसंवेदनशिल असेलल्या पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी म्हणुन कार्यरत असंताना सुध्दा तुम्ही तुमचे कर्तव्यामध्ये वारंवार कसुरी करीत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशाप्रकारे तुम्ही तुम्हाला सोपविण्यात आलेल्या कर्तव्यामध्ये बेशिस्त व बेजबाबदारपणा करीत असल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त प्रकरणी तुम्ही तुमचे कर्तव्यात कसुरी केल्याचे निदर्शनास येत असल्याने तुम्हाला या कार्यालायाचे ज्ञापन क्र. पोअय/कक्ष-१२/पोनि-पुरुषोत्तम अहेरकर/कसुरी/ज्ञापन/८०८२/२०२६, दिनांक १२/०८/२०२६ अन्वये "तुमचा कसुरी अहवाल मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांना का सादर करण्यात येवु नये ?" याबाबत आपणास ज्ञापन देण्यात आले आहे. सदर ज्ञापनाचे अनुषंगाने तुम्ही दिनांक २५/०८/२०२६ रोजी स्पष्टीकरण सादर केले. तसेच तुम्हाला तुमचे मौखीक म्हणने मांडणेकरीता दिनांक ०१/०९/२०२६ रोजी आज्ञांकीत कक्षामध्ये बोलविण्यात आले असता, तुम्ही अल्प कालावधीमध्ये अवैध धंदयावर प्रभावी कार्यवाही केली आहे. तसेच सदयस्थितीत तुमची इतरत्र ठिकाणी बदली झाली आहे. करीता सदर कसुरी प्रकरण **"नस्तीबध्द"** करण्यात येत आहे.

(कुमार चिंता)
पोलीस अधिक्षक यवतमाळ.

प्रति,

**पोनि/पुरूषोत्तम अहेरकर,**
**नेमणुक पो.अ. वाचक शाखा यवतमाळ.**

मार्फत :- पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ.

२/- सदर आदेशाची छायांकीत प्रत संबंधीतास अदा करुन, सदर आदेशाच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन, ती दिनांकीत स्वाक्षरीची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास सादर करावी.

**प्रत :- प्रभारी अधिकारी पो.स्टे. पुसद शहर/कक्ष-१०/कक्ष-१७/कक्ष-१४ यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.**

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२/वि.चौ/कसुरी/पोनि-अहेरकर/आदेश/ 9133 /२०२६ दिनांक - 10 SEP 2026

## आदेश

**अधिकाऱ्याचे नाव :- पोनि/पुरूषोत्तम अहेरकर, तत्का.नेमणुक पो.स्टे. पुसद शहर, जिल्हा यवतमाळ.**

संदर्भ :- कारणे दाखवा नोटीस क्र पोअय/कक्ष-१२/पोनि/पुरूषोत्तम अहेरकर/कसुरी/ज्ञापन/८३०३/२०२६ दिनांक १७/०८/२०२६.

**थोडक्यात कसुरी** :- मपोना/२१०३ पाईकराव यांचे प्राथमीक चौकशी मध्ये त्रुटी ठेवल्याबाबत.

---ooo---

पो.नि. पुरुषोत्तम अहेरकर, तुम्ही प्रभारी अधिकारी म्हणुन पोलीस स्टेशन पुसद शहर येथे कार्यरत असुन या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ./मपोना-२१०३ पाईकराव/गैरहजर/६५३५/२०२६ दिनांक १५/०७/२०२६ अन्वये म.पो.ना/२१०३ शिल्पा गंगाधर पाईकराव तत्कालीन नेमणुक उप वाहतुक शाखा पुसद हया सन २०१५ पासुन गैरहजर असल्या प्रकरणी त्यांचे कृताकृत कसुरीचे व प्रशासकीय बार्बीच्या सविस्तर प्राथमिक चौकशी करून कसुरदारचे व इतर आवश्यक संबंधीताचे जबाजबाब नोंदवुन, शासकीय दस्ताऐवज जोडुन आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्राथमिक चौकशी अहवाल ०७ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार तुम्ही म.पो.ना/२१०३ शिल्पा गंगाधर पाईकराव, नेमणुक उप वाहतुक शाखा पुसद यांचे कसुरी प्रकरणी तुमचे पोलीस स्टेशन चे जावक क्र. १४९१/२०२६ दिनांक ३१/०७/२०२६ अन्वये १५ दिवसा नंतर अहवाल या कार्यालयास सादर करण्यात आला असुन सदर अहवालाचे अवलोकन केले असता, सदर अहवालामध्ये कसुरदार यांचे व्यतिरीक्त इतर संबधीत अधिकारी व अंमलदार यांचे जबाब न नोंदविता अपुर्ण अहवाल या कार्यालयास सादर करण्यात आला आहे. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये निर्णय घेण्यास अडचण निर्माण होत असल्याने सदर अहवाल या कार्यालयाचे दिनांक ०५/०८/२०२६ चे पत्रान्वये त्रुटीची पुर्तता करुन अहवाल सादर करणेकरीता तुम्हाला परत करण्यात आला आहे. अशाप्रकारे तुमच्याकडे चौकशी अधिकारी या नात्याने सोपविण्यात आलेल्या कर्तव्यामध्ये तुम्ही कसुर केल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त प्रकरणी तुम्ही तुमचे कर्तव्यात कसुरी केल्याचे निदर्शनास येत असल्याने तुम्हाला या कार्यालायाचे ज्ञापन क्र. पोअय/कक्ष-१२/पोनि-पुरुषोत्तम अहेरकर/कसुरी/ज्ञापन/८३०३/२०२६, दिनांक १७/०८/२०२६ अन्वये " तुमचा कसुरी अहवाल मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांना का सादर करण्यात येवु नये ?" याबाबत आपणा स ज्ञापन देण्यात आले आहे. सदर ज्ञापनाचे अनुषंगाने तुम्ही दिनांक २४/०८/२०२६ रोजी स्पष्टीकरण सादर केले. तसेच तुम्हाला तुमचे मौखीक म्हणने मांडणेकरीता दिनांक ०१/०९/२०२६ रोजी आज्ञांकीत कक्षामध्ये बोलविण्यात आले असता, सदयस्थितीत तुमची इतरत्र ठिकाणी बदली झाली आहे. तसेच तुम्ही यानंतर अशाप्रकारचे वर्तणुक भविष्यात होणार नाही याबाबत हमी दिल्याने सदर प्रकरण **"नस्तीबद्ध"** करण्यात येत आहे.

(कुमार चिंता)
**पोलीस अधिक्षक यवतमाळ.**

प्रति,

पोनि/पुरूषोत्तम अहेरकर,
नेमणुक पो.अ. वाचक शाखा यवतमाळ.

**मार्फत :- पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ.**

२/- सदर आदेशाची छायांकीत प्रत संबंधीतास अदा करुन, सदर आदेशाच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन, ती दिनांकीत स्वाक्षरीची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास सादर करावी.

**प्रत :- प्रभारी अधिकारी पो.स्टे. पुसद शहर/कक्ष-१०/कक्ष-१७/कक्ष-१४ यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.**

E-office:-

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२(१)/पोशि १००० राम राठोड/अंतिम आदेश / 9256 /२०२६, दिनांक - 11 SEP 2026

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२ (१)/पोशि १००० राम राठोड/कादानो/ ८३१८/२०२६, दि.१४/०८/२०२६

**कसुरदाराचे नाव** :- **पोशि/१००० राम राठोड नेमणुक पोलीस स्टेशन, दिग्रस**

---ooo---

तुम्ही पोशि/१००० राम राटोड नेमणुक पोलीस स्टेशन, दिग्रस तुमची दि. ०२/०८/२०२६ रोजी २०/०० ते ०८/०० महाराष्ट्र शासनाने सुरु केलेली आपत्कालीन सेवा ११२ डायल येथे ड्युटी नेमण्यात आली होती. ड्युटीवर असतांना तुम्ही निष्काळजीपणा करुन डायल ११२ वर मा. नियंत्रण कक्ष यवतमाळ यांचेकडुन प्राप्त झालेल्या कॉल /CFS NO ३८५०८२६० वेळ २१/०० वा. पोलीस स्टेशनला प्राप्त झाले. सदर संदेशास पोलीस स्टेशन बाहेर येवुन ०८ मिटर वर क्लोज केला आहे, व त्यानंतर त्यास संदेशास २१/२१ वा. प्रतिसाद दिला आहे, त्यामुळे संबंधित घटनेवर तात्काळ प्रतिसाद देण्यास विलंब झाला. सदर कृत्यामुळे विभागाची प्रतिमा मलीन होण्याबरोबर नागरीकांना वेळेस मदत मिळण्यास अडथळा निर्माण झाला. तसेच तुमचा अवैध रेती तस्करी करणाऱ्या लोकांना सोबत संबंध असल्याचे प्रभारी अधिकारी यांचे निदर्शनास आले आहे. तसेच गणनेच्या वेळेस रेती तस्करी करणाऱ्या व्यक्तीशी नियमीत संपर्क असल्याचे दर्शविणारी माहीती प्रभारी अधिकारी यांना मिळाली आहे. तुमच्या या वर्तनामुळे पोलीस विभागाची प्रतिमा मलीन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्षम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त कसुरी ही ठाणेदार पो.स्टे. दिग्रस यांचे पत्र क्र.२०१४/२०२६, दि.०३/०८/२०२६ अन्वये सादर केले असून सदर प्रकरणी या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२ (१)/पोशि १००० राम राटोड/कादानो/८३१८/ २०२६, दि.१४/०८/२०२६ अन्वये **"रु. ५०००/- आर्थिक दंड"** या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. सदर कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण पो. स्टे. दिग्रस यांचे पत्र २२५१/२०२६, दि.२४/०८/२०२६ अन्वये सादर केले. त्याअनुषंगाने दि.०८/०९/२०२६ रोजी आज्ञांकित कक्षात बोलावण्यात आले. तुम्ही सदर दिवशी आज्ञांकित कक्षात हजर राहुन आपले म्हणणे म्हणणे आमचे समक्ष सादर केले. तुम्ही सादर केलेले मौखिक तसेच लेखी स्पष्टीकरणाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेत अंशतः बदल करुन तुम्हाला खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **पोशि/१००० राम राठोड नेमणुक पोलीस स्टेशन, दिग्रस** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(चार) मधील तरतुदीनुसार **"रु. ५००/- आर्थिक दंड "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

प्रति,

पोशि/१००० राम राठोड नेमणुक पोलीस स्टेशन, दिग्रस

**मार्फत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, दिग्रस (व्दिप्रतीत)**

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत** :- प्रमुख लिपीक आस्थापना/कक्ष ९-(२)/कक्ष १४/कक्ष १८/ नोंदणी लिपीक पो.अ.कार्या.यवतमाळ / यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष ९-(२) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधिक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

E-office :-

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२(१)/मपोशि ६२५ रेशमा चव्हाण/अंतिम आदेश / 9253 /२०२६, दिनांक - 11 SEP 2026

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२ (१)/मपोशि ६२५ रेशमा चव्हाण/कादानो/७४०६/२०२६, दि.०४/०८/२०२६

**कसुरदाराचे नाव :- मपोशि/५२६ रेशमा चव्हाण नेमणुक पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर**

---ooo---

मपोशि/५२६ रेशमा चव्हाण, नेमणुक पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर तुम्हाला दिनांक १६/०७/२०२६ रोजीचे २०.०० वा. ते दिनांक १७/०७/२०२६ सकाळी ०८.०० वा. पर्यंत सीसीटीएनएस स्टेशन डायरीमध्ये कर्तव्य नेमण्यात आले होते. दिनांक १६/०७/२०२६ रोजी गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार पोशि/२५२ प्रदीप कुरडकर व पोशि/२७९ पवन तडसे यांनी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दारु रेड करुन दारु विक्रेता यांचे विरुद्ध लेखी तक्रार देऊन गुन्हे दाखल करण्याकरीता २१.३० वा. पोशि/२७९ पवन तडसे यांनी तुमचेकडे देण्यात आले होते. त्यावरुन सदरचे गुन्हे तुम्ही दाखल करणे गरजेचे असतांना सदरच्या तक्रारीवरुन दिनांक १७/०७/२०२६ रोजी १) अप. क्र. ६१८/२०२६ कलम ६५(e), ६५(d) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद वेळ ०८.०५ वाजता दाखल २) अप. क्र. ६१९/२०२६ कलम ६५(e), ६५(d) म.दा.का.अन्वये गुन्हा नोंद वेळ ०८.१९ वा. दाखल व ३) अप.क्र. ६२०/२०२६ कलम ६५(e), ६५(d) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद वेळ ०८.४५ वा. दाखल करण्यात आलेला. वरील तीन गुन्ह्याचा घटनेचा वेळ हा दिनांक १६/०७/२०२६ रोजीच्या १९.०० वा. ते १९.४५ वा. च्या दरम्यान असल्याने सदरचे गुन्हे दिनांक १६/०७/२०२६ दाखल होणे गरजेचे असतांना सुद्धा तुम्ही दाखल न करता बारा तासांच्या नंतर सदरचे गुन्हे दाखल केलेले आहे. गुन्हे दाखल होण्यास विलंब का झाला असे वरीष्ठांनी स्टेशन डायरी कर्तव्यावर हजर असणारे अंमलदार यांना याबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, 'तुम्ही रात्री ०३.०० वाजता पोलीस स्टेशनमधुन निघुण गेल्या होत्या', असे सांगितले. वरीष्ठांनी याबाबत दैनंदिन अधिकारी पोउपनि/घोगरे यांना विचारले असता त्यांना 'तुम्ही कुठलीही माहीती न देता परस्पर निघुन गेल्या होत्या 'असे सांगितले.

दिनांक १६/०७/२०२६ रोजीचे २०.०० वाजता ते दिनांक १७/०७/२०२६ सकाळी ०८.०० वा. पर्यंत मपोशि/५२६ रेशमा चव्हाण तुमची सीसीटीएनएस ड्युटी असतांना सदरचे गुन्हे दाखल करणे ही तुमची प्राथमिक जबाबदारी असतांना सुद्धा तुम्ही ती जबाबदारी पार न पाडता सदरचे गुन्हे दाखल करण्यास विलंब केलेला आहे. यावरुन तुम्ही तुमचे कर्तव्यादरम्यान अतिशय बेजबाबदारपणा निष्काळजीपणा करुन गंभीर स्वरुपाची कसुरी केलेली आहेत. सदर कसुरी प्रकरणी तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व गैरवर्तन केले आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त कसुरी ही ठाणेदार पो.स्टे. यवतमाळ शहर यांचे पत्र क्र.०९/२०२६, दि.१७/०७/२०२६ अन्वये सादर केले असून सदर प्रकरणी या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२ (१)/मपोशि ६२५ रेशमा चव्हाण/कादानो /७४०६/ २०२६, दि.०४/०८/२०२६ अन्वये **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) का देण्यात येवू नये ?"** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर कारणे दाखवा नोटीसचे

स्पष्टीकरण पो. स्टे. यवतमाळ शहर यांचे पत्र ३१५६/२०२६, दि.१४/०८/२०२६ अन्वये सादर केले. त्याअनुषंगाने दि.०८/०९/२०२६ रोजी आज्ञांकित कक्षात बोलावण्यात आले. तुम्ही सदर दिवशी आज्ञांकित कक्षात हजर राहुन आपले म्हणणे म्हणणे आमचे समक्ष सादर केले. तुम्ही सादर केलेले मौखिक तसेच लेखी स्पष्टीकरणाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन कारणे दाखवा नोटीसमध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेत अंशतः बदल करुन तुम्हाला खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **मपोशि/५२६ रेशमा चव्हाण नेमणुक पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(चार) मधील तरतुदीनुसार **"रु. ५०००/- आर्थिक दंड "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(कुमार चिंता)
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**मपोशि/५२६ रेशमा चव्हाण नेमणुक पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर**

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ (व्दिप्रतीत)**

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत** :- प्रमुख लिपीक आस्थापना/कक्ष ९-(२)/कक्ष १४/कक्ष १८/ नोंदणी लिपीक पो.अ.कार्या.यवतमाळ / पो. स्टे. यवतमाळ शहर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष ९-(२) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधिक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

E-office:-

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in



क्र. पोअय/कक्ष -१२(१)/अंतिम आदेश/पोहवा-१४७ मनिष शुक्ला/ 9252 /२०२६ दिनांक - 11 SEP 2026

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२-(१)/कादानो/पोहवा-१४७ मनिष शुक्ला/७५०९/२०२६. दि.०५/०८/२०२६

कसुरदाराचे नाव :- **पोहवा/१४७ मनिष शुक्ला, नेमणुक पोलीस स्टेशन, वडगांव जंगल.**

-----ooo-----

पोहवा/१४७ मनिष शुक्ला तुम्ही पोलीस स्टेशन, वडगाव (जं) येथे कार्यरत असुन तुम्हाला पोलीस टाण्यात स्टेशन डायरी अमंलदार कर्तव्य देण्यात येते. परंतु तुम्ही दारु व्यसनाचे मोठया प्रमाणात आहारी गेल्याने कर्तव्यावर सुद्धा तुम्ही दारुचे सेवन करुन येत असल्याने तुमचे या बेशिस्त वर्तनामुळे राजकीयदृष्टया संवेदनशिल असलेल्या वडगाव पोलीसांची जनमानसात प्रतिमा मलिन होत असुन नागरीकांमध्ये पोलीस दलाबद्दल मोठया प्रमाणात नकारात्मक भुमिका तयार होत असल्याने शिस्तप्रिय पोलीस खात्याची बदनामी होत आहे.

पोलीस टाण्याच्या परिसरात चारही बाजुने शेती असुन पोलीस स्टेशनला ईमारत आणि वॉल कंपाऊंड नसल्याने जवळपास तीन एकरचे परिसरात मोठया प्रमाणात झाडे, झुडपे व गवत आहे. तसेच परिसरात ब्रिटिश कालीन बांधकाम असलेली पुर्णत: निरुपयोगी (खंडर) व पडीत वसाहत आहे. त्यामुळे पोलीस टाण्यात व परिसरात विषारी साप आणि इंगळी (विंचु) यांचा वावर मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे येथे दैंनदिन कामकाज करणे अतिशय जोखमीचे असुन या विषारी प्राण्याकडे लक्ष्य देवुनच येथे कर्तव्य पार पाडावे लागते. अशा जिवघेण्या परिस्थितीमध्ये सुद्धा तुम्ही कर्तव्य नसतांना सुद्धा दारु पिवुन दोन-दोन, तीन-तीन दिवस मुक्कामी राहुण पत्राचे शेडमध्ये झोपतात. तुम्हाला प्रभारी अधिकारी व ईतर अमंलदार यांनी वारंवार घरी जाण्याची समज देऊन सुद्धा तुम्ही घरी जाण्यास नकार देतात. अनेक वेळा तुमचे भाऊ पंकज शुक्ला व नातेवाईकांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावुन त्यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. (टाणे दैनंदिनी क्रं.१४ व १७ दि. २७/०६/२०२६ वेळ २२:०१)

प्रभारी अधिकारी यांना तुम्ही वारंवार बीट देण्याची विनंती केलेली होती. पोलीस टाणे भेटी दरम्यान मा.उप विभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे अनेक वेळा कदाचित बीट प्रभाऱ्याची संधी उपलब्ध करुन दिल्यावर तुमचे वर्तनात बदल होवुन तुम्ही एक शिस्तप्रिय पोलीस अमंलदार म्हणुन वागतील या एकमेव उद्देशाने प्रभारी अधिकारी यांनी तुमची वडगाव व मेटीखेडा बीट प्रभारी म्हणुन दि. ०१/०६/२०२६ रोजी नियुक्त केले. मेटीखेडा बीट अंतर्गत दि. २८/०६/२०२६ रोजी दाखल झालेला अप.क्रं. १९८/२०२६ कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१ (२),(३),३(५) बि.एन.एस. हा परस्पर विरोधी दाखल गुन्हयापैकी नमुदचा गुन्हा तपासास दिल्याने पुराव्याचे दृष्टीकोनातुन दाखल झाल्याचे दुसरे दिवशी या गंभिर गुन्हयाचा घटनास्थळ पंचनामा करणे अपेक्षित असतांना सुद्धा तुम्ही गैरहजर राहिल्याने प्रभारी अधिकारी यांनी तात्काळ तो गुन्हा पोहवा/२२७ विलास सुरत्ने यांचेकडे वर्ग करुन पुढील तपास केला. एकंदरित तुम्हाला तुमचेकडे दिलेल्या गंभिर गुन्हयाचे तपासाचे सुद्धा गांभिर्य नसल्याचे दिसुन आले. (टाणे दैनंदिनी क्रं. १६ दि. २९/०६/२०२६ वेळ १९:१६)

दरवर्षी पोलीस टाणे हद्दीत संपन्न होणारे सन उत्सवापैकी अतिशय संवेदनशिल व मोटा उत्सव म्हणजे गणपती विसर्जन उत्सव सन २०२४ मध्ये यवतमाळ जिल्हयातील पोलीस टाणे बिटरगाव अंतर्गत ग्राम ढाणकी येथे गणपती विसर्जन अनुषंगाने निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती पाहता अतिशय खबरदारी घेवुन सन २०२५ चे गणपती विसर्जन अनुषंगाने दि.०६/०९/२०२५ रोजी पोलीस टाणे वडगाव हद्दीतील ग्राम चिचघाट येथे तुमची बंदोबस्त ड्युटी लावली असता तुम्ही संपुर्ण दिवसभर बंदोबस्त कर्तव्यावर गैरहजर होते. एकंदरीत कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलीसांचे कर्तव्य असतांना सुद्धा तुम्हाला याबद्दल कोणत्याही प्रकारचे गांभिर्य नसल्याचे दिसुन आले. (टाणे दैंनदिनी क्रं. ०९ दि. ०६/०९/२०२५ वेळ १८:४०)

अधिनिस्त सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना रजेची आवश्यकता भासल्यास त्यांना EHRMS या अॅप्लीकेशनद्वारे रजेची मागणी करण्याच्या सुचना दिल्याने सर्व स्टॉफ त्या प्रमाणेच रजेची मागणी करत असते परंतु तुम्ही मात्र प्रभारी अधिकारी यांचे आदेशाकडे दुर्लक्ष करुन पोलीस ठाण्याचे व्हाटसअॅप ग्रुपवर हस्तलिखित रजेचा अर्ज टाकुण प्रभारी अधिकारी यांचे परवानगी शिवाय रजेवर रवाना होतात किंवा कोणतीही पुर्वकल्पना न देता गैरहजर राहतात. (ठाणे दैनंदिनी क्रं. ११ दि. ०३/०१/२०२६ वेळ १३:५६ आणि ठाणे दैनंदिनी क्रं. ०५ दि. १५/०१/२०२६ वेळ १३:५४)

पोहवा/१४७ मनिष शुक्ला तुम्ही अनेक वेळा दारु सेवनाचे नंतर कित्येक दिवस पोलीस ठाण्यात येत नाहीत किंवा स्वतःचे घरी सुद्धा राहत नाहीत. दि. ०५ जानेवारी २०२६ रोजी तुम्ही प्रभारी अधिकारी यांना यवतमाळ वरुन पोलीस ठाण्यात येत असतांना बाईकवरुन पडुन अपघातामध्ये तुमचे हाताला खरचटल्याचा फोटो व्हॉटसअॅपवर टाकल्याने प्रभारी अधिकारी यांनी तुम्हाला किरकोळ रजा देवुण उपचार घेण्यास सांगितले. परंतु त्या दिवसापासुन तुम्ही स्वतःचे घरी सुद्धा गेले नसल्याचे तुमचे भाऊ पंकज शुक्ला यांनी मोबाईलवर कॉल करुन प्रभारी अधिकारी यांना दि. ११/०१/२०२६ रोजी सांगितले. अनेक दिवस होवुन सुद्धा तुम्ही घरी किंवा पोलीस ठाण्यात न आल्याने कुटुंबातील लोक सुद्धा काळजीने जास्त प्रमाणात चिंतीत झाल्याने स्टॉफ व तुमचे भावाचे मदतीने यवतमाळ मध्ये तुमचा शोध घेतला असता तुम्ही जिल्हा रुग्णालयाचे पाठीमागील परिसर वाघापुर रोडवर तुमचे भावाला मिळुण आले. तुम्ही शासकीय नोकर असल्याने तुम्ही दारु पिवुन कुठेही थांबता. तुमचे हे वर्तन शासकीय नोकरांना विशेषतः पोलीस दलाचे शिस्तीला न शोभणारे आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक २०२६ अनुषंगाने डोंबविली महानगरपालिका बंदोबस्त करीता पोलीस स्टेशनचे ईतर अमंलदारास व तुम्हाला दि. ११/०१/२०१६ रोजी रवाना करण्यात आलेले होते. तुम्ही त्या ठिकाणी सुद्धा मोठया प्रमाणात दारुचे सेवन केल्याने व सतत दारुचे सेवनामुळे तुम्हाला बी.पी. वाढल्याचा असहय त्रास झाल्याने तुम्हाला त्या ठिकाणी दवाखान्यात अॅडमिट करावे लागले. त्या नंतर तुम्ही वैदयकीय रजेवर रवाना होवून ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस स्टेशनचे कर्तव्यावर हजर झाले. एकंदरीत सरकारी लोकसेवकांना अतिशय निष्पक्ष व निष्कलंक आणि पारदर्शकपणे निवडणुक कर्तव्यपार पाडणे आवश्यक असते. परंतु त्याबद्दल सुद्धा तुम्हाला कोणत्याही प्रकारचे गांभिर्य नसल्याचे दिसुन आले. (ठाणे दैनंदिनी क्रं. १४ दि. ११/०१/२०२६ वेळ १९:५५)

पोहवा/१४७ मनिष शुक्ला तुम्ही यवतमाळ येथे राहुन स्वतःचे मोटार सायकलवर ये जा करुन पोलीस ठाण्याचे कर्तव्य निभावत असतात. यवतमाळ ते वडगाव हा सर्व प्रकारचे वाहणांचा, जंगल व मोठया प्रमाणात वळण असलेला रहदारीचा रस्ता आहे. अशा रहदारीचे रस्त्यावरुन तुम्ही दारुचे सेवन करुन मोटार सायकल चालवित येत असल्याने तुमचेकडुन एखादा गंभिर स्वरुपाचा अपघात होवुण तुम्ही ईतरांचे किंवा स्वतःचे दुर्घटनेस जबाबदार होणार यात कोणतीही शंका नाही. (दि.०५/०१/२०२६ रोजी कर्तव्यावर येतांना त्यांचा अपघातसुद्धा झालेला आहे.)

एकंदरीत वरील सर्व घटनांचा उल्लेख पाहता पोहवा/१४७ मनिष शुक्ला तुम्हाला गंभिर गुन्हयाचे तपासाचे गांभिर्य नसल्याने तपासावर चुकीचा परिणाम होवुन आरोपी निर्दोष सुटण्यास अप्रत्यक्ष मदत होणे, कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन गणपती विसर्जन व निवडणुक बंदोबस्त कर्तव्य दरम्याणसुद्धा निष्काळजी व बेभानपणे मनमानीपणे वागणे, स्वतःचे जिवाची परवा न करता दारुचे नशेत सरपटणारे प्राण्यांच्या परिसरात तासनतास झोपुन राहणे ज्यामध्ये दुर्दैवाने विपरीत घटना घडल्यास पोलीस स्टेशन आणि पोलीस दलाबद्दल समाजात चुकीचे गैरसमज पसरण्यास कारणीभुत होणे, घरातील कुटुंब प्रमुख व पालक म्हणुन पत्नी व मुलांची काळजी घेण्याचे सोडुन पत्नीला त्रास देणे, पोलीस ठाणे वडगावचा परिसर राजकीयदृष्टया अतिशय संवेदनशील असुन येणारा तक्रारदार किंवा आरोपी हा कोणत्या ना कोणत्या राजकीय पक्षांशी आणि लोकांशी जोडलेला असतोच त्यामुळे तुम्ही मात्र दारु पिवुन तक्रारदार व आरोपी यांचे संपर्कात येत असल्याने राजकीय दृष्टीकोनातुन पोलीस दलाची प्रतिमा मलीन करुन नकारात्मक वातावरण तयार होण्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या कारणीभुत होत आहेत. ज्यामुळे आगामी काळात येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्राम पंचायत निवडणुक अनुषंगाने पोलीस दलास अनावश्यक आवाहन निर्माण होणार आहे. तुमचेमुळे पोलीस दलाची शिस्त बिघडत असल्याने त्याला वेळीच आवर घालणे गरजेचे आहे अन्यथा तुमचेकडे पाहुन ईतर अमंलदार सुद्धा तसेच मनमानी पद्धतीने वागायला लागले तर सर्वांना शिस्तीत आणने जिकरीचे होईल आणि शिस्तप्रीय पोलीस दलाला अशा बेशिस्त अंमलदारांमुळे कलंकीत व्हावे लागत आहे.

उपरोक्त प्रकरणी कसुरीच्या अनुषंगाने तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असुन तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, व गंभिर स्वरुपाचे असल्याचे निदर्शनास येत आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्षम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा तसेच गैरवर्तवणुक केली आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२-(१)/कादानो/पोहवा-१४७ मनिष शुक्ला/७५०९/२०२६, दि.०५/०८/२०२६ **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ? "** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस स्विकारुन स्पष्टीकरण दि.२४/०८/२०२६ रोजी या कार्यालयास सादर केले आहे. तसेच तुम्हाला अंतिम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी दि.०८/०९/२०२६ रोजी आमचे समक्ष बोलावण्यात आले असता तुम्ही कारणे दाखवा नोटीस संदर्भातील सादर केलेले स्पष्टीकरण व आज्ञांकित कक्षातील मौखिक निवेदन हे असमाधानकारक दिसुन आल्याने कारणे दाखवा नोटीसमध्ये दिलेली प्रस्तावित शिक्षा कायम करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

**पोहवा/१४७ मनिष शुक्ला, नेमणुक पोलीस स्टेशन, वडगांव जंगल** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(पाच) मधील तरतुदीनुसार **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखणे "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

पोहवा/१४७ मनिष शुक्ला.
नेमणुक पोलीस स्टेशन, वडगांव जंगल.

मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ.

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत** :- प्रमुख लिपीक आस्थापना/कक्ष-९ (१)/कक्ष १४/कक्ष १८/ नोंदणी लिपीक पो.अ.कार्या./प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, वडगांव जंगल यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष -९ (१) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधिक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

E-office :-


पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in


क्र. पोअय/कक्ष -१२(१)/अंतिम आदेश/मपोशि-९९६ पुष्पा धावडे/ 9248/२०२६ दिनांक - 11 SEP 2026

## अंतिम आदेश

**संदर्भ :-** या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष-१२(१)/कादानो/मपोशि-९९६ पुष्पा धावडे/कादानो/ ३३६७/२०२६, दिनांक २३/०४/२०२६.

कसुरदाराचे नाव :- **मपोशि/९९६ पुष्पा धावडे, नेमणुक पोलीस मुख्यालय, यवतमाळ.**
(तत्का.नेम. पोलीस स्टेशन, नेर)

----ooo----

मपोशि/९९६ पुष्पा धावडे, तुम्ही पोलीस स्टेशन, नेर येथे नेमणुकीस असतांना तुम्हाला जनरल ड्युटीचे कामकाज देण्यात आले होते. तुम्हाला यापुर्वी तुमच्या बेशिस्त व बेजबाबदार वर्तणुकीसंबंधाने मा. उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा यांचे मार्फतीने पोलीस स्टेशन नेर गो.जा. क्र. २१/२०२६ दि. ०२/०२/२०२६ अन्वये कसुरी अहवालाच्या अनुषंगाने तुमच्यावर कार्यवाही करण्यात येवूनही तुमचे वर्तणुकीत कोणतीही सुधारणा झाल्याचे दिसून आले नाही.

तुम्ही दिनांक २८/०३/२०२५ ते दिनांक ०१/०४/२०२६ पर्यंत अर्जित रजेकरीता ऑनलाईन अर्ज सादर केला. प्रभारी अधिकारी यांनी ड्युटी मदगार महीला अंमलदार मपोशि/२०९९ सुवर्णा मेश्राम ह्यांचे कडून माहीती घेतली असता तुम्ही यापुर्वीच १३ दिवस अर्जित रजा उपभोगली असुन तुमची ०२ दिवस अर्जित शिल्लक असल्याचे सांगितले. प्रभारी अधिकारी यांनी तुमचा ऑनलाईन सुट्टीचा अर्ज रद्द केला व मा. पोलीस अधीक्षक साहेब यांचेकडुन वाढीव १५ दिवस अर्जित रजेकरीता अर्ज करुन मंजूर करुन घ्यावा व त्यानंतर वाढीव अर्जित रजा मिळणेकरीता ऑनलाईन अर्ज करावा किंवा ०५ दिवस नैमित्तीक रजेकरीता अर्ज करायला सांगा असे सांगितले. ड्युटी मदतगार मपोशि/२०९९ सुवर्णा मेश्राम हिने पोकॉ/१२८६ प्रदीप राठोड यांना तोंडी सांगितल्यावरुन प्रदीप राठोड यांनी तुमच्या रजेबाबत स्टे. डा. ला कोणतीही नोंद टाकलेली नसताना ड्युटी रजिस्टरवर मपोशि/९९६ पुष्पा धावडे तुमची ०५ दिवस सुट्टीची नोंद केली व दिनांक २८/०३/२०२६ रोजीचे ड्युटी रजिस्टरचा फोटो पोलीस स्टेशन व्हॉट्सॲप ग्रुपवर शेअर केला. नंतर प्रदीप राठोड यांना मपोशि/९९६ पुष्पा धावडे तुमच्या सुट्टीची कोणतीही नोंद स्टे. डा. ला घेण्यात आली नसल्याचे लक्षात आल्याने त्यांनी अगोदर टाकलेला ड्युटी रजिस्टरचा फोटो डीलीट केला व परत सुधारीत फोटो ग्रुपवर शेअर केला.

ग्रुपवरील फोटो पाहुन तुम्ही १२/४९ वा. ग्रुपवर पोस्ट केली ती याप्रमाणे, "विनाकारण मला मानसिक त्रास देऊ नका... तुम्हाला हात जोडुन विनंती ... इतर लोकांना ३० दिवस सुट्टी दिली जाते माझी तब्येत ठीक नसुन मला ५ दिवस सुट्टी देत नाही आहे. माझ्या जिवाला कमी जास्त झाल तर याला सर्वस्वी जबाबदार PI साहेब, ड्युटी मदतगार, LHC/२०९९ सुवर्णा मेश्राम आणि साहेबांचा जवळचा चमचा पोकॉ/१२८६ प्रदीप राठोड हे राहतील... माझ्या जिवाला काही झालं तर माझे मिस्टर एकालाही सोडणार नाही हे लक्षात ठेवा." १२.५० वा. माझ्या मागे माझ्या दोन लहान मुली आहे याचा ही विचार केला जात नाही आहे." अशी पोस्ट केली. याबाबतची नोंद पोकॉ/१२८६ प्रदीप राठोड यांनी स्टे. डा. ला साना क्र. २३/२६ वेळ १३/०४ दि. २८/०३/२०२६ अन्वये घेतली आहे. तसेच ड्युटी मददगार मपोशि/२०९९ सुवर्णा मेश्राम हिला सुद्धा तिने व्हॉट्सॲप पोस्ट केली. ती याप्रमाणे "मी नाही उद्या पो. स्टे. मध्ये poision pein तर ky राहील." अशी पोस्ट केली. याबाबतची नोंद LHC/२०९९ सुवर्णा मेश्राम हिने स्टे. डा. ला साना क्र. ३१/२६ वेळ १४/३१ दि. २८/०३/२०२६ अन्वये घेतली आहे.

तुम्ही ठाणेदार यांनी दिलेला आदेश पाळत नाही. नेहमी कर्तव्यावर गैरहजर राहण्याच्या व उद्धट बोलण्याच्या सवयीची आहे. स्वत:चे जिवाचे बरेवाईट करुन पोलीस खात्याला वेठीस धरण्याची तसेच वरिष्ठांना धमकी देत आहे. ही गंभीर बाब असुन तुमची वागणुक/वर्तन/आचरण पोलीस खात्याला अशोभनीय व निदंनीय आहे.

सदर कसुरी प्रकरणी तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्षम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व गैरवर्तन केले आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त प्रकरणी मपोशि/९९६ पुष्पा धावडे, नेमणुक पोलीस मुख्यालय, यवतमाळ तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष-१२(१)/कादानो/मपोशि-९९६ पुष्पा धावडे/कादानो/३३६७/२०२६, दिनांक २३/०४/२०२६ अन्वये 'पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?' या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने तुम्ही दिनांक १४/०८/२०२६ अन्वये कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर केले. त्याअनुषंगाने अंतिम निर्णय घेण्यापुर्वी तुम्हाला स्वत:ची बाजू मांडण्यासाठी आमचे समक्ष दि.०८/०९/२०२६ रोजी बोलाविण्यात आले असता, सदर दिवशी तुम्ही आमचे समक्ष हजर राहुन आपले मौखिक निवेदन सादर केले. तुम्ही सादर केलेल्या मौखिक निवेदनाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन कारणे दाखवा नोटीसमध्ये दिलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये बदल करुन आपणास **'ताकीद'** देण्यात येत आहे. अशा प्रकारची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(सदर शिक्षेविरुद्ध अपिल अनुज्ञेय नाही.)**

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

प्रति,

मपोशि/९९६ पुष्पा धावडे,
**नेमणुक पोलीस मुख्यालय, यवतमाळ.**

**मार्फत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ.**

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करु न दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

प्रत :- प्रमुख लिपीक आस्थापना/कक्ष ९ (२)/कक्ष- १४/कक्ष- १८/नोंदणी लिपीक पो.अ.कार्या.यवतमाळ/प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, नेर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

E-office:-

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२(१)/अंतिम आदेश/पोशि - २५१९ अजय शेंडे/ 9249 /२०२६ दिनांक - 11 SEP 2026

## अंतिम आदेश

संदर्भ :- या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष-१२(१)/कादानो/पोशि-२५१९ अजय शेंडे/कादानो/६२०२/२०२६, दिनांक ०८/०७/२०२६.

**कसुरदाराचे नाव :- पोशि/२५१९ अजय किसनराव शेंडे, नेमणुक पोलीस स्टेशन, राळेगांव.**

----ooo----

पोशि/२५१९ अजय किसनराव शेंडे तुम्ही पोलीस स्टेशन, कळंब येथे दैनंदिन डयुटी करुन समन्स वारंटचे कामकाज करित आहे. प्रभारी अधिकारी हे पोलीस स्टेशन गणणेवर डायल ११२ डयुटी करणा-या अंमलदार यांना वेळोवेळी डायल ११२ वर आलेल्या कॉलला कमीत कमी वेळेत कॉल क्लोज करणेबाबत व घटनास्थळी भेट देणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. तरी सुध्दा पोशि/२५१९ अजय किसनराव शेंडे तुमची दि. १५/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशनला सकाळी ०८.०० ते २०.०० वा. पावेतो डायल ११२ डयुटी असतांना सिस्टीम जनरेट रिपोर्ट नुसार CFS क्रमांक ३७४०६९४७ हा.०९.४८ वा. Dail ११२ प्रणालीवर कळंब (YTL-KALAMB-MOB-७) वर कॉल प्राप्त झाला होता. परंतु पोशि/२५१९ अजय शेंडे तुम्ही सदर कॉल क्लोज करण्यासाठी व कॉलला प्रतीसाद साठी २७/ मिनीटे ११ सेकंद वेळ लावला होता. सदर कॉल उशिरा क्लोज केल्याने वरिष्ठांनी नाराजी व्यक्त केली. त्याबाबत प्रभारी अधिकारी यांनी खुलासा मागितला असता तुम्ही समाधानकारक खुलासा दिला नाही.

तसेच दि. २३/०६/२०२६ रोजी १६.३० वा. दरम्यान विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी पोलीस स्टेशन, कळंबला भेट दिली असता तुम्ही डायल ११२ वर डयुटीवर कर्तव्यावर असतांना तुम्हाला बोलावले व डायल ११२ वर कॉल आला का? अशी विचारणा केली. तेव्हा तुम्ही एक कॉल आला असून क्लोज केल्याबाबत सांगितले. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती यांनी कुठला कॉल होता ? व किती वेळात क्लोज केला ? याबाबत विचारले असता, तुम्ही मौजा तांबा, ता. बाभुळगाव येथील कॉल असल्याबाबत सांगितले. व कॉलर यांना पुन्हा डायल ११२ वर कॉल करुन तुमचा कॉल पोलीस स्टेशन, बाभुळगाव येथे फारवर्ड करण्याबाबत कॉलर यांना सांगितले. तसेच कॉल ०८ मिनिटात क्लोज केल्याबाबत सांगितले तेव्हा मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती यांनी तुम्हाला घटनास्थळावर का गेले नाही? असे विचारणा केली, तेव्हा तुम्ही समाधानकारक उत्तर न देता उडवा उडवीचे उत्तरे देउन बेशिस्त व बेजबाबदारपणाचे वर्तन केले आहे.

सदर कसुरी प्रकरणी तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व गैरवर्तन केले आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त प्रकरणी पोशि/२५१९ अजय किसनराव शेंडे, नेमणुक पोलीस स्टेशन, राळेगांव तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष-१२(१)/कादानो/पोशि-२५१९ अजय शेंडे/कादानो/६२०२/२०२६, दिनांक ०८/०७/२०२६ अन्वये 'पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?' या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने तुम्ही दिनांक १७/०८/२०२६ अन्वये कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर केले. त्याअनुषंगाने अंतिम निर्णय घेण्यापुर्वी तुम्हाला

स्वतःची बाजू मांडण्यासाठी आमचे समक्ष दि.०८/०९/२०२६ रोजी बोलाविण्यात आले असता, सदर दिवशी तुम्ही आमचे समक्ष हजर राहुन आपले मौखिक निवेदन सादर केले. तुम्ही सादर केलेल्या मौखिक निवेदनाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन कारणे दाखवा नोटीसमध्ये दिलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये बदल करुन आपणास **'ताकीद'** देण्यात येत आहे. अशा प्रकारची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(सदर शिक्षेविरुद्ध अपिल अनुज्ञेय नाही.)**

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

प्रति,

**पोशि/२५१९ अजय किसनराव शेंडे,**
**नेमणुक पोलीस स्टेशन, राळेगांव.**

**मार्फत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, राळेगांव.**

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करु न दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत** :- प्रमुख लिपीक आस्थापना/कक्ष ९ (६)/कक्ष- १४/कक्ष- १८/नोंदणी लिपीक पो.अ.कार्या.यवतमाळ/प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, राळेगांव यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

E-office

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२(१)/पोहवा २२४६ राजु गुजर/अंतिम आदेश / ९२५१/२०२६, दिनांक - 11 SEP 2026

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२ (१)/पोहवा २२४६ राजु गुजर/कादानो/ ६६५५/२०२६, दि.१५/०७/२०२६

**कसुरदाराचे नाव :- पोहवा/२२४६ राजु गुजर, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी.**

---ooo---

पोहवा/२२४६ राजु गुजर, नेमणुक पोलीस स्टेशन, अवधुतवाडी येथे नेमणुकीस असून तुमच्याकडे १० वर्षापेक्षा कमी शिक्षा असलेले खालीलप्रमाणे ०३ गुन्ह्यामध्ये ६० दिवसाचे मुदतीचा कालावधी होवुन सुद्धा तपासावर प्रलंबीत आहे.

| अ.क्र. | अपराध क्रमांक | कलम | दाखल तारीख | ६०/९०दिवस मुदत संपल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ०१. | ४००/२०२६ | ३०३(२)भा.न्या.सं. | ०७/०४/२०२६ | ०६/०६/२०२६ |
| ०२. | ४११/२०२६ | ८५,३५१ (२),३५२,३(५) भा.न्या.सं., | ११/०४/२०२६ | १०/०६/२०२६ |
| ०३. | ४५६/२०२६ | ८५, ३(५), भा.न्या.सं., | २१/०४/२०२६ | २०/०६/२०२६ |

उपरोक्तप्रमाणे गुन्हयाचे तपास हा ६० दिवसाचा कालावधी होऊन सुद्धा पोलीस स्टेशन ला प्रलंबीत असल्याबाबत या कार्यालयाकडुन मासिक गुन्हे आढावा चर्चे दरम्यान तसेच पो. स्टे. भेटी दरम्यान तपासी अंमलदार तुम्हाला सुचना दिल्यानंतरही तुम्ही सदरहु गुन्हे हे कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा करुन तपासावर प्रलंबीत ठेवले आहेत.

पो. स्टे. ला दाखल गुन्हयामध्ये विहीत कालावधीत दोषारोपपत्र/अंतरीम दोषारोप दाखल करणेबाबत मा.पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र प्राप्त आहे. त्यानुसार पोलीस संशोधन आणि विकास ब्युरो (BPR&D), भारत सरकार गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांनी क्रमांक ६५/Trg/NCL/NCL Misc.Matter(E- २२४७३), दि.निरंक/ऑगस्ट/२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे की, ज्या प्रकरणात ६० दिवस व ९० दिवसांत दोषारोपपत्र दाखल करणे शक्य नसेल अशा प्रकरणात तपासी अधिकारी/अंमलदार यांनी अंतरीम दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करावे व नंतर गुन्हयाचा पुढील तपास करुन पुरवणी दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करावे. असे वरिष्ठांचे आदेश आहेत.

सदरहु तपासी अंमलदार तुम्हाला उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन भेटीचे वेळी दप्तर तपासणी दरम्यान वारंवार तोंडी व लेखी सुचना देऊन सुद्धा तुम्ही सदरचे गुन्हे विनाकारण तपासावर प्रलंबित ठेवुन कर्तव्यात हलगर्जीपणा केलेला आहे. या कार्यालयाचे वतीने १० वर्षापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्हयात ६० दिवसात व १० वर्षापेक्षा अधिक शिक्षा असलेल्या गुन्हयात ९० दिवसात दोषारोपपत्र / अंतरिम दोषारोपपत्र दाखल करावे व गुन्हे पोलीस स्टेशनला विनाकारण प्रलंबित ठेवुन नये, प्रलंबित गुन्हयाचे निर्गतीबाबत त्वरीत कार्यवाही करण्यासंबंधाने यापुर्वीच सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच यासंबंधाने उपरोक्तप्रमाणे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश असतांना सुद्धा तुम्ही सदर बाबीकडे हेतुपरस्पर दुर्लक्ष करुन, कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे दिसुन येत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे.

पोलीस दलातील व्यक्ती ही कर्तव्यावर असतांना तिची वर्तणुक योग्य असावी, ती कार्यतत्पर असावी इत्यादी नियम बंधनकारक असतांना सुद्धा नमुद अधिकारी यांनी आपले कायदेशीर कर्तव्य टाळुन, कर्तव्यात कामचुकारपणा करुन, वारंवार सुचना देऊनसुद्धा गुन्हे निर्गतीकडे तसेच वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाकडे उददेशपुर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसुन येत आहे. प्रशासकीय दृष्टया ही अत्यंत गंभीर बाब आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त कसुरी ही उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांचे पत्र क्र.२६०९/२०२६, दि.२०/०६/२०२६ अन्वये सादर केले असून सदर प्रकरणी या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२ (१)/पोहवा २२४६ राजु गुजर/कादानो/ ६६५५/२०२६, दि.१५/०७/२०२६ अन्वये **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) का देण्यात येवू नये ?"** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण पो. स्टे. अवधुतवाडी यांचे पत्र ३५७५/२०२६, दि.१७/०८/२०२६ अन्वये सादर केले. त्याअनुषंगाने दि.०८/०९/२०२६ रोजी आज्ञांकित कक्षात बोलावण्यात आले. तुम्ही सदर दिवशी आज्ञांकित कक्षात हजर राहुन आपले म्हणणे म्हणणे आमचे समक्ष सादर केले. तुम्ही सादर केलेले मौखिक तसेच लेखी स्पष्टीकरणाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन तुम्हाला खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **पोहवा/२२४६ राजु गुजर, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(चार) मधील तरतुदीनुसार **"रु. ५०००/- आर्थिक दंड "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**पोहवा/२२४६ राजु गुजर, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी**

मार्फत :- **उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ (व्दिप्रतीत)**

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत** :- प्रमुख लिपीक आस्थापना/कक्ष ९-(५)/कक्ष १४/कक्ष १८/ नोंदणी लिपीक पो.अ.कार्या.यवतमाळ / पो. स्टे. अवधुतवाडी यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष ९-(५) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधिक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

E-office :..

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष -१२(१)/अंतिम आदेश/पोहवा-१८७३ अश्विन पवार/ 9250 /२०२६ दिनांक - 11 SEP 2026

## अंतिम आदेश

**संदर्भ :-** या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष-१२(१)/कादानो/पोहवा-१८७३ अश्विन पवार/कादानो/७४०३ /२०२६, दिनांक ०४/०८/२०२६.

**कसुरदाराचे नाव :- पोहवा/१८७३ अश्विन पवार, नेमणुक पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर.**

----ooo----

पोहवा/१८७३ अश्विन पवार, नेमणुक पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर येथे नेमणुकीस असुन सध्या तुम्ही जनरल कर्तव्य करीत असुन तुम्हाला सरकारी दवाखाना बिटमध्ये कर्तव्य करणेबाबत वरीष्ठांनी आदेशित करण्यात आले होते. त्यानंतर सरकारी दवाखाना बिटमध्ये दिनांक ०७/०७/२०२६ रोजी शासकीय रुग्णालय यवतमाळ येथे मृतक नामे मनिष दिवाकर वाघमारे वय ५२ वर्ष रा. खोजा कॉलणी, वंजारी फैल यवतमाळ याची Brought Dead झालेली असल्याने पोलीस स्टेशनला कलम १९४ भा. ना. सु. सं. -२०२३ अन्वये अकस्मात मृत्यु क्रमांक ५४/२०२६ दाखल करण्यात आलेला आहे. सदर मर्गचा तपास करणेबाबत तुम्हाला दिनांक ११/०७/२०२६ रोजी आदेशित केले असता तुम्ही सदरचा मर्ग घेण्यास नकार दिलेला आहे. याबाबत क्राईम अंमलदार पोहवा/६६५ अलताफ यांनी प्रभारी अधिकारी यांचे आदेशान्वये स्टे.डा. नोंद क्रमांक ५८/२०२६ वेळ २२.०७ वाजता नोंद घेण्यात आलेली आहे.

पोहवा/१८७३ अश्विन पवार तुम्ही पोलीस स्टेशनमधील कुठलीही कर्तव्य पार पाडण्यास नकार देत असुन तुमच्या या वागणुकीमुळे इतर पोलीस अंमलदार यांचेवर कामाचा अतिरीक्त ताण पडत आहे. तुमच्या कर्तव्यादरम्यान केलेल्या कसुरीवरुन असे निदर्शनास येते की, तुम्हाला पोलीस विभागामधील कर्तव्याप्रती कुठलीही गांभीर्यता राहीलेली नसुन कर्तव्याप्रती तुमच्यामध्ये उदासिनता, निष्काळजीपणा, बेशिस्त वर्तवणुक व वरीष्टांच्या आदेशाची अवहेलना करणे हा तुमचा नित्यक्रम झालेला आहे.

सदर कसुरी प्रकरणी तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व गैरवर्तन केले आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त प्रकरणी पोहवा/१८७३ अश्विन पवार, नेमणुक पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष-१२(१)/कादानो/पोहवा-१८७३ अश्विन पवार/कादानो/७४०३/२०२६, दिनांक ०४/०८/२०२६ अन्वये 'पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?' या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने तुम्ही पो. स्टे. यवतमाळ शहर यांचे पत्र जा. क्र. ३१७०/२०२६, दिनांक १६/०८/२०२६ अन्वये कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर केले. त्याअनुषंगाने अंतिम निर्णय घेण्यापुर्वी तुम्हाला स्वतःची बाजू मांडण्यासाठी आमचे समक्ष दि. ०८/०९/२०२६ रोजी बोलाविण्यात आले असता, सदर दिवशी तुम्ही आमचे समक्ष हजर राहुन आपले मौखिक निवेदन सादर केले. तुम्ही सादर केलेल्या मौखिक निवेदनाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन कारणे दाखवा नोटीसमध्ये दिलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये बदल करुन आपणास **'ताकीद'** देण्यात येत आहे. अशा प्रकारची पुनरावृत्ती पुन्हा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(सदर शिक्षेविरुद्ध अपिल अनुज्ञेय नाही.)**

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

**पोहवा/१८७३ अश्विन पवार,**
**नेमणुक पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर.**

मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ.

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करु न दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

प्रत :- प्रमुख लिपीक आस्थापना/कक्ष ९ (४)/कक्ष- १४/कक्ष- १८/नोंदणी लिपीक पो.अ.कार्या.यवतमाळ/प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.

# भाग - ०५

# शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती

## भाग - ०६

# प्रशिक्षण व इतर

निरंक